# विद्यापीठ अनुदान आयोग

(UNIVERSITY GRANTS COMMISSION)

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

अंतर्गत

## लघुसंशोधन प्रकल्प

(MINOR RESEARCH PROJECT REPORT)

विषय

# ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**(विशेष संदर्भ आदर्श गाव झाडा, ता. धामणगांव रेल्वे)**

**Gram SakshamikarnatGrampanchayatichiBhumikaEkVishleshnatmakAdhyayan (VisheshSandarbhaAadarshGaonZada) Tq. Dhamangaonrailway, Dist. Amravati**




संशोधक

**प्रा.डॉ. विभा प्रविण देशपांडे**

**(एम. ए. पीएच. डी.)**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

**कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा,**

**ता.तिवसा, जि. अमरावती (म. रा.)**

# प्रस्तावना

भारतात स्थानिक स्वराज्य संस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्यांनी राष्ट्राच्या, सामाजिक व अर्थिक विकासात महत्वाचे योगदान दिलेले आहे. ग्रामपंचायत मध्ये असे स्वयंशासित घटक अनादी काळापासून अस्तित्वात असलेले दिसून येतात. वेद काळात 'ग्राम' एक संस्थाच होती आणि कुटूंबानंतर तिला महत्व होते. गावाचा प्रमुखाला 'ग्रामिणी' असे म्हणत होते तो नागरी तथा सैनिकी बाबतीत ग्रामाचा नेता होता व राज्य स्तरावर गावाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व व जतन करीत असे. प्राचीन काळात ग्राम पंचायतची स्थापना कोणत्या ही कायद्यानुसार झालेली नव्हती तर ती गावांच्या गरजेतून निर्मिण झाली. महाभारतातील 'संभापर्व' ,'जातककथा' ,कौटिल्याचे अर्थशास्त्र, मॅगेस्थेनिसचे 'इंडिका' अशा ग्रंथामध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. प्राचीन काळात गावं आणि ग्रामपंचायती स्थानिक शासनाच्या दृष्टीने स्वावलंबी व स्वयंपूर्ण होत्या. राजेशाहीतील राजा म्हणजे, तत्कालीन मध्यवर्ती सत्ता ग्रामपंचायतच्या माध्यमातून आपला राज्यकारभार करीत असे. ग्रामपंचायती राज्यकारभारच्या दृष्टीने सोयीस्कर असल्याने राजे त्यांच्या दैनंदिन कार्यात हस्तक्षेप करीत नव्हते.

महाभारतातील शांती पर्वात ग्रामीण शासन व्यवस्थेचे वर्णन आहे. या काळात ग्राम शासन व्यवस्थेची जबाबदारी एक ग्राम प्रमुखावर होती त्याला 'ग्रामिक' म्हणून ओळखले जात होते. भारतात बहुतांश गावांत ग्राम प्रमुखाचे पद असले तरी वेगवेगळ्या राज्यात त्याला वेगवेगळ्या नावांने ओळखले जात असे. उत्तर प्रदेशात ग्राम प्रमुखाला 'गावंडा' म्हणून ओळखले जात होते. तर महाराष्ट्रात त्याला 'पट्टलिका' (ग्राममुकुटा) म्हणून ओळखले जात होते.

वैदिक काळात ग्रामप्रमुखाला 'ग्रामिणी' म्हणून तर मौर्य काळात 'ग्रामिका' म्हणून ओखळले जात होते. गावातील स्थानिक जबाबदाऱ्या बरोबरच ग्रामसंरक्षणाची जबाबदारी त्याचावर होती. ग्राम संरक्षणाचा तो प्रमुख असायचा गावांतील जनता आणि राजा यांच्यात मध्यस्थेची भूमिका म्हणून त्याला अनेक कार्ये करावी लागत होती. यामध्ये ग्राम सभेची बैठक बोलावणे, अध्यक्ष स्थान भूषविणे, चोर, लुटारू पासून गावाचे संरक्षण करणे, गावाची लोकसंख्या शेतजमीन, जमीन महसूल व मालकी, हस्तांतरणासाठीच्या नोंदी ठेवणे इत्यादी कार्ये वैदिक काळात ग्रामप्रमुखाची निवड गावांतील जनतेकडून केली जात असे. पुढे ग्राम प्रमुखाचे पद वंशपरंपरानुसार देण्याची प्रथा सुरू झाली. योग्य वारसा नसल्यास राजा ते पद दुसऱ्या

कुटूंबाकडे हस्तांतरित करीत होते. चौदा ते सतराव्या शतकात दक्षिण भारतात ग्राम प्रमुखाला 'पाटील' म्हणून ओळखले जात होते. भारतीय इतिहासात ग्राम प्रमुख हा वेगवेगळ्या नावाने ओळखला गेला असला, तरी ह्याची कार्ये मात्र समानच होती. पूर्वी ग्रामीण स्थानिक शासन व्यवस्थेत ग्राम सभेला जे महत्व होते ते आज ग्राम पंचायतीला आहे आणि ग्राम प्रमुखाला जे महत्व होते ते आज सरपंचला आहे.

परकीय आक्रमण, अनेक वर्षे परकीयांचे राज्य इत्यादी गोष्टी मुळे भारतीय राजकीय व्यवस्थेवर दुरगामी परिणाम झाले असले तरी ग्रामीण भागातील ग्रामपंचायती, न्याय पंचायती व आदिवासी क्षेत्रातील समूह पंचायती या मात्र टिकून राहिलेल्या आढळतात. ब्रिटिशांनी निर्माण केलेली शासन व्यवस्था व न्याय व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर ही अशा तृणमूल (Grass-Root) संस्था स्वायत व कार्यरत राहिल्या असे दिसून येते. इतकेच नव्हे तर ब्रिटिशांनी जे विविध सामाजिक कायदे केले ते शहरी भागातील नागरिकांना लागू झाले असले तरी ग्रामीण व आदिवासी भागातील परंपरागत रीतीरिवाज व प्रथांना बदलण्याचा प्रयत्न त्यात दिसून येत नाही. विशेषतः विवाह, घटस्फोट, वारसाहक्क इत्यादींच्या बाबत ग्रामीण समुहांसाठी एकात्मिक स्तराला राज्याची तीन्ही (शासकीय, विधिविषयक, न्यायविषयक) कार्ये या संस्था पार पाडत असल्या तरी त्या आजच्या अर्थाने राजकीय नव्हत्या तर अ-राजकीय होत्या आणि त्यांच्यात राजकारणाचा अभाव होता. त्या काळात निवडणुकी पेक्षा जनमान्यतेवर व एकमताने निर्णय घेण्यावर भर होता. वयस्क अनुभवी लोकांनाच अशा पंचायतीमध्ये पाठविले जात होते. त्यातूनच या पदाधिकाऱ्यांना अधिमान्यता प्राप्त होत असे. जनहितबुद्धी, सद्सद विवेकबुद्धी या गोष्टीना प्राधान्य होते. कदाचित त्यातूनच पाचमुखी परमेश्वर ही म्हण उद्भवली असावी. पुढे ब्रिटिश काळात गावातील प्रश्नांची सोडवणूक ब्रिटीश अधिकारी करु लागल्याने गावांतील ग्रामपंचायतीचे महत्व हळूहळू कमी झाले. ब्रिटिशांनी स्थानिक प्रशासनाचा घटक खेड्या ऐवजी जिल्हा हा केला. ग्रामीण भागतील स्थानिक कार्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी जिल्हा समित्या स्थापन केल्या. कर व उपकर वसूल करण्याची जबाबदारी या समित्यांकडे होती.

मुंबई प्रांतात सन १८६० मध्ये अशा समित्या स्थापन झाल्या. स्थानिक निधी गोळा करण्याचे कार्य या समित्यावर सोपविण्यात आले. सन १८६९ मध्ये या समित्यांना कायदेशीर दर्जा देण्यात आला. जिल्हा समित्यांची स्थापना सरकारकडून केली जात असे. जिल्हाधिकारी या समितीचा अध्यक्ष होता. जिल्हा व तालुका स्तरावर सात सभासदांची तालुका समिती असे. या समित्यांना सार्वजनिक आरोग्य व स्थानिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य होते. पुढे

या संस्थांचे स्वरुप बदलत गेले व ब्रिटिशांनी या संस्थांना सरकारी खात्याचे स्वरुप दिले. यात लोक निर्वाचित प्रतिनिधी ऐवजी सरकार नियुक्त सभासदांचे प्रमाण जास्त असे.

भारतात हॉबहाऊस यांच्या अध्यक्षतेखाली सन १९०७ साली नेमलेल्या रॉयल विकेंद्रीकरण आयोगाने ग्रामीण स्थानिक शासनाला दिशा देण्याच्या दृष्टीने सन १९०९ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला व आपल्या शिफारशीत त्यानी सांगितले की, खेडे हा स्थानिक शासनाचा आधारभूत घटक आहे व प्रत्येक खेड्यासाठी 'ग्रामपंचायत' स्थापन करण्याची शिफारस केली व अशी ही सूचना केली की, ग्रापंचायतींना लोकाभिमुख करण्यासाठी त्यांच्यात निर्वाचित सदस्यांचे बहुमत असावे. जिल्हा बोर्डाचे अध्यक्षपद गैरसरकारी असावे. जिल्ह्याचा ५० टक्के निधी तालुका बोर्डाला द्यावा. इत्यादी शिफारशी केल्यात या ठरावाला अनुसरून भारत सरकारने १९१५ मध्ये स्थानिक शासनाबाबत एक ठराव पास केला. या ठरावानुसार भारतात सर्व प्रांतात ग्रामपंचायती स्थापन कराव्यात. पण या ठरावाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

लॉर्ड चेम्सफोर्ड १९१६ साली गव्हर्नर जनरल झाले. त्यांनी भारतातील ग्रामीण स्थानिक संस्थाचा विकास करण्यासाठी एक प्रस्ताव सादर केला व स्थानिक संस्थांच्या विकासाला चालना मिळाली. सन १९१९ च्या कायद्याच्या निर्देशानुसार भारतातील विविधप्रांतांनी स्थानिक शासन संस्था संबंधी कायदे संमत केले व त्यानुसार मुंबई प्रांतात सन १९२० चा मुंबई ग्रामपंचायत कायदा संमत झाला. सन १९१९ ते १९२६ या काळात ग्रामपंचायतीच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

१५ ऑगष्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्थानिक स्वराज्य संस्थावरील परकीय नियंत्रण नष्ट झाले. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अमलात आली. भारताला सार्वभौमत्व प्राप्त झाले. राज्यघनेतील राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्वामध्ये कलम ४० अंतर्गत ग्रामस्तांवर ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधी तरतुद केली. सन १९५७ मध्ये श्री. बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने लोकशाही विकेंद्रीकरणासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका किंवा गट स्तरावर पंचायत समिती आणि ग्राम स्तरावर, ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधी घटक राज्यांना स्वतंत्र कायदे करुन या संस्थांची स्थापना करण्याचे आवाहन केले. त्या नुसार त्यात थोडा बहुतबदल करुन राज्याची त्रिस्तरीय योजना व्यवस्था सुरू केली. पंचायत राज संस्थेची सुरवात करण्याचा पहिला मान राजस्थान राज्याला प्राप्त झाला. या राज्यात २ ऑक्टोंबर १९५९ रोजी पंचायत राज व्यवस्था सुरू झाली. या नंतर अनेक राज्यात पंचायत राज व्यवस्थेची सुरूवात झाली.

पंचायत राज संस्थांना पुरेसे अधिकारदेण्यासाठी, सर्व घटक राज्यातील पंचायत राज संस्थेमध्ये एकसुत्रता व समानता आणण्याच्या उद्देश्याने केंद्र सरकारने ७३ वी घटना दुरूस्ती विधेयक मांडले. २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने तर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने या विधेयकाला संमती दिली. १० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींच्या संमतीने या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होऊन पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. भारतीय संविधानात अकारावे परिशिष्ट नव्याने समाविष्ट करून कलम २४३ अंतर्गत पंचायत राज व्यवस्थेची तरतुद करण्यात आली. २४ एप्रिल १९९३ पासून ७३ वी घटनादुरूस्तीची अंमल बजावणी झाली.

सामुहिक विकास कार्यक्रम हे दृष्टी समोर ठेवून. श्री. बलवंतराय मेहता समितीने ही त्रीस्तरीय योजना मांडली (ग्रास पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) भारत सरकारने श्री. बलवंतराय मेहता समितीची मूळ प्रेरणा लक्षात घेऊन प्रत्येक राज्यांना आपल्या भौगोलिक व राजकीय परिस्थितीनुसार थोडाफार बदल करण्याचे अधिकार दिले. या आधारे महाराष्ट्र सरकारने श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने अभ्यास करुन आपला अहवाल महाराष्ट्र सरकारला सादर केला. महाराष्ट्र सरकारने त्या शिफारशी स्वीकारून मुंबई जिल्हा परिषद पंचायत समिती कायदा सन १९६१ मध्ये मंजूर केला.

७३ वी घटनादुरूस्तीनुसार ग्राम विकासाला अत्यधिक महत्व प्राप्त झाले आहे. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की,"भारताचे खरे दर्शन खेड्यामध्ये होते आणि ग्राम हा भारताचा आत्मा होय." हा विचार आज ही खरा आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांचे शिक्षण असेल, ग्रामस्थानाचे आरोग्य असेल किंवा गावातील स्वच्छता असेल अशा विविध सकारात्मक बाबी ग्रामीण समाजाच्या विकासासाठी आहेत. ग्रामीण भाग आता शासनाच्या नव-नवीन योजनांमुळे विकासाकडे अग्रेसर होत आहेत.

राज्यानेराबविलेली अनेक योजनांपैकी एक प्रमुख विकास योजना म्हणजे "आदर्श ग्राम योजना"आहे. ही योजना १९९२ साली महाराष्ट्र शासनाने गावांचा परिपूर्ण विकास व्हावा पर्यायाने महात्मा गांधीजीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच निमार्ण केली आहे. ग्रामीण विकास ही बहुमुखी व गुणात्मक संकल्पना आहे. ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक, मानसिक व सर्वच क्षेत्रातील विकास त्यात अपेक्षित आहे. हे अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचा क्रियात्मक सहभाग व त्यासाठी ग्रामीण जनतेचा निर्णय प्रक्रियेतील, सत्तेतील सहभाग अत्यंत आवश्यक असतो. एकंदरीत नैसर्गिक परिस्थिती, शेती,

जमीनीचे प्रकार, जमीन धारणा पद्धती शेती, जमीनीचा आकार, जल सिंचन यांत्रिकीकरण शेती, उपकरणे व सुधारित अवजारांचा वापर करणे, शेतमजूर, कारागीर, ग्रामीण उद्योग, पशुपालन, पर्यावरण ग्रामपंचायत जंगले, नैसर्गिक मानवी संसाधनाच्या विकासाचे कार्यक्रम इत्यादींचा ग्रामीण विकासात समावेश होतो. आज भारत सरकारद्वारे कोट्यावधी रूपये ग्रामीण विकासावर खर्च केले जातात तरी आपले खेडे "जैसे थे" असेच दिसत आहेत. फारच थोडे खेडे आहे की, ज्यांनी सरकारी योजनांचा पुरेपुर फायदा घेवून आपल्या गावाचा विकास केला. या पैकी एक गांव म्हणाजे 'झाडा' ता. धामणगांव रेल्वे जिल्हा अमरावती, या गावाच्या ग्रामपंचायतीचे कार्य, उल्लेखनीय आहे.

'झाडा' या गावातील सर्व नागरिक, महिला, विद्यार्थी, विद्यार्थिनी स्थानिक स्तरावरील सर्व पदाधिकारी, सहकारी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, स्थानीय कर्मचारी, अधिकारी, सर्व शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका हे सर्व लोक ग्रामपंचायतच्या समोरील पटांगणामध्ये एकत्रित झाले व त्यांनी संकल्प केला की,'आम्ही सर्व गावकरी आज दि. १७/१०/२००१ रोजी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियांनांतर्गत गांव, घर, परिसर, सार्वजनिक इमारती, शाळा स्वच्छ ठेवण्याचा सन १९८९ पासून सातत्याने करीत असलेल्या कामात सातत्य ठेवून पुढे ही, काम सुरू ठेवण्याचा दृढ संकल्प करीत आहोत.' फक्त संकल्पच केला नाही तर त्या दिशेने जोरदार वाटचाल करीत 'झाडा' गावाला आदर्श गावाचा पुरस्कार प्राप्त करुन दिला. येवढेच नाही तर शासनाद्वारे ग्राम विकास सक्षमीकरण करण्यासाठी जेवढे पुरस्कार जाहीर केले ते सर्व पुरस्कार (सन २०१४) पर्यंत १०० च्या वर 'झाडा' गावाला मिळाले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने विशेष आदेशान्वये 'झाडा' या गावाला 'अदर्श यशवंत ग्राम' व ग्राम पंचायतीला 'राज्य स्तरीय सेवाभावी (स्वयंसेवी) संस्थेचा दर्जा बहाल केलेला आहे. म्हणून हे गांव अभ्यासासाठी निवडलेले आहे. या गावाने आपला विकास कसा केला; त्या करीता कोणत्या कार्यपद्धतीचा अवलंब केला. या सर्वबाबींचे अध्ययन यात करण्यात आले आहे. या अध्ययनामुळे दिशा व आदर्श मार्गदर्शन अन्य गावाला मिळेल.

या लघुशोध प्रबंधात संशोधकाने ६ प्रकरण लिहीले आहेत.सर्व प्रकरणातून आदर्श ग्राम'झाडा'ने गावांच्या सक्षमीकरणाकरिता कोण-कोणत्या उपाययोजना केल्या याची माहिती व तसेच गावाच्या लोकांची प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत व माहिती घेऊन त्या आधारावर संपूर्ण 'झाडा' गावाच्या ग्रामसक्षमीकरणाचे अध्ययन केले आहे. जे की, अन्य गावाच्या विकासासाठी प्रेरणादायी ठरतील.

## १.१ उद्दिष्टे :

संशोधनाचे तत्कालीन हेतू ग्रामसक्षमीकरण करणे ही कल्पना भारताला नवीन नाही. मोहोंजोदडो संस्कृतीचे ते एक वैशिष्ट्य होते. पण आधुनिक जगात या विचार प्रणालीचे श्रेय अमेरिकन विचार पद्धती आणि उपक्रमांना जाते. गाव सक्षमीकरण करणे म्हणजे समाजाच्या सर्व अंगाचा व स्तरांचा विकास असतो. कारण व्यक्तिचे हित समाजाच्या हितामध्ये उत्क्रांत होत असते. प्रादेशिक हित राष्ट्रीय हितामध्ये उत्क्रांत होत असते. अर्थात गावं सक्षमीकरण करणे म्हणजे गावांचा सामुहिक विकास करणे या सामुहिक विकास शब्दात ग्रामीण भागातील अनेक जाती, धर्म, पंथ, समाज आणि अर्थ, व्यवस्थेशी निकडीत असलेल्या सर्व ग्रामीण पैलुंचा विकास व प्रेमसमावलेले आहे. म्हणूनच ग्रामीण भागातील लोकांचा विकास म्हणजेच ग्रामीण विकास, ग्राम सक्षमीकरण असे म्हणता येईल.

सामुहिक विकासाचा केंद्र बिंदू मनुष्य आहे. त्याच्या कर्तव्याला जागरूक करणे व प्रयत्ना मुळे विविध भागाचा विकास घडवून आणणे हे ग्राम सक्षमीकरणाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. लोकशाही राज्यात हे सहज शक्य आहे. शासनातर्फे विकासाचे नियोजन करण्यात येते. त्यासाठी तांत्रीक सेवा व पैसा उपलब्ध करून देण्यात येतो. या पैशाचा उपयोग पूर्णपणे करुन घेणे आवश्यक आहे. यासाठी नवीन उत्साही, विकासाची बांधीलकी असलेल्या नेतृत्वाची एक महत्वपूर्ण गरज आहे.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर खेड्यांचा विकास अपरिहार्य आहे. ही जाणीव गांधीजींनी लोकांना पटवून दिली आणि निती निर्देशक तत्वामध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख करण्यात आला. राज्य सरकारला सांगण्यात आले की, राज्यात ग्रामपंचायतीची स्थापना करुन त्यांना सक्षम बनवा. भरपूर अधिकार देऊन काम करण्यासाठी त्यांना संधी द्या. त्याला अनुसरुन कायदे तयार केले.

प्रत्येक माणसाची इच्छा असते की, आपले जीवन शांततामय, व सुखी व्हावे, आपल्या जीवनावश्यक गरजा म्हणजे, अन्न, वस्त्र, निवारा आणि ज्ञान या पूर्ण व्हाव्यात. हे ग्राम सक्षमीकरणाचे, विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामपंचायतच्या माध्यमातून जनतेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक विकास व्हावा, स्थानिक नेतृत्वाला चालना देऊन सत्तेच्या लोकशाही विकेंद्रीकरणाने राजकीय प्रक्रियेत सहभागी होणे, ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे, ग्रामीण जनतेला स्वतःच्या हक्काची व कर्तव्याची जाणीव करुन देणे, नवीन राजकीय नेतृत्व निर्माण करणे, ग्राम सक्षमीकरणाचे महत्व, विविध सरकारी योजना, कायदे इत्यादी बाबी

संबंधी लोकांना माहिती मिळवून देणे, स्थानीक लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव देणे, इत्यादी विविध उद्देश्य समोर ठेवून प्रस्तुत विषयांची निवड करण्यात आली.

**१.२ संशोधन पद्धती :**

संशोधनाचे कार्य प्रामुख्याने दोन प्रकारे केले जाते. पहिला म्हणजे समुहाच्या सर्व सदस्यांशी संपर्क स्थापित करुन तथ्ये संकलित करणे आणि दुसरा प्रकार म्हणजे समुहाच्या सर्व सदस्याऐवजी त्यांच्यातील एक प्रतिनिधी निवडून त्यांच्याशी संपर्क साधून माहिती गोळा करणे. समुहाच्या सर्व सदस्यांशी संपर्क प्रस्थापित करुन माहिती गोळा करणे या पद्धतीला जणगणना पद्धती (Census Method) असे म्हणतात पण ही पद्धती लहान समूह असेल तरच शक्य असते. दुसऱ्या पद्धतीत समुहाचे प्रतिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून माहिती मिळविणे व ती माहिती संपूर्ण समुहाची आहे असे मानणे. या पद्धतीला नमुना निवड पद्धती असे म्हणतात. सामान्य जीवनात ह्याच पद्धतीचा वापर होतो.

**१.३ नमुना निवड पद्धती (Sampling) :**

**गुड आणि हॅट :** नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.

**श्रीमती यंग :** एक सांख्यिकीय नमुना म्हणजे संपूर्ण समुहाच्या किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय.

सामाजिक संशोधनात नमुना निवड प्रणालीचे एक महत्वाचे स्थान आहे. नमुना निवड पद्धतीचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी संशोधन कर्त्यांनी प्रतिनिधी निवडण्याची (Possibility of Representive Selection) पद्धतीचा उपयोग केला आहे. ह्या पद्धतीत समग्र समुहातून काही एकक समग्राचे प्रतिनिधीत्व करणारे निवडले जातात. हा निवडलेला नमुना समग्राचे विशेष व्यक्त करतो, पणहे एकक निवडतांना शास्त्रशुद्ध पद्धतीने ही निवड केली जाते. उदा. लॉटरी पद्धत, कार्ड अथवा तिकीट प्रणाली इत्यादि.

नमुना पद्धतीचा उपयोग करतांना संशोधकाने काही काळजी घेणे आवश्यक आहे.

१. नमुना निवड करण्यापुर्वी समग्राचा विचार करुन त्यातील सर्व एककांची सष्ट सूची तयार करणे.

२. एककांची निवड स्वतंत्रपणेच झाली पाहीजे. म्हणजे नमुना निवडतांना कोणत्याही दबावाखाली निवडू नये.

३. एकक असे निवडावेत की, ज्यांच्याशी संपर्क स्थापन करता येईल.

सामाजिक संशोधनात (सॅम्पल) नमुना प्रणालीचे एक महत्वपूर्ण स्थान आहे. त्यापैकी अध्ययनासाठी संशोधकांनी उद्देशपूर्ण नमुना (purposive sampling) चा उपयोग केला आहे. जेव्हा संशोधक कोणतातरी विशेष उद्देश्य समोर ठेऊन काही एककांची निवड करतो तेव्हा त्या नमुना निवडीला उद्देशपूर्ण नमुना म्हणतात. ह्या प्रकारच्या नमुन्याचा मुख्य आधार म्हणजे ह्यात संशोधक समग्राची लक्षणे माहित करुन घेतो व नंतर विस्तृतपुर्वक एककाची निवड करतो. हे उद्देश्यानुकूल व प्रतिनिधिक असतात. उद्देश्य हे मार्गदर्शक असतात. अर्थात एककांची निवड करतांना सम्पूर्णपणे वस्तुनिष्ठता (Objective) व शास्त्रीय पद्धती (Scientific Method) चा आधार घेतला गेला.

वरील पद्धतीने अध्ययन करण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली या प्रश्नावलीत आदर्श गांव 'झाडा' याची सम्पूर्ण विकासाची माहिती प्राप्त व्हावी या उद्देश्याने प्रश्न तयार करून त्यांना विचारण्यात आले. हे प्रश्न ग्राम पंचायतच्या पदाधिकारी, गावातील नागरिक, नोकरीपेशा तरुण मुले, मुली, विद्यार्थी इत्यादिंना विचारण्यात आले व त्यांच्या द्वारे प्राप्त माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले.

**१.४ प्राथमिक स्त्रोत, दुय्यम स्त्रोत :**

प्रस्तुत लघुशोध प्रबंधात संशोधकाद्वारे आदर्श गाव 'झाडा' ता. धामणगांव रेल्वे या गावातील 'ग्राम पंचायतीचे' विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी दोन प्रकारे सामग्री संकलीत केली गेली. (अ) प्राथमिक स्त्रोत (ब) दुय्यम स्त्रोत.

**(अ) प्राथमिक स्त्रोत :**

आदर्श ग्राम पंचायत 'झाडा' येथील ग्रामपंचायत पदाधिकारी, गावातील नागरिक, नोकरी पेशा तरुण मुले, मुली, विद्यार्थी इत्यादि विकास उपक्रमात कार्यरत असलेल्या लोकांची प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत घेऊन उद्देश्यपूर्ण नमुना पद्धतीने अध्ययन करण्यात आले.

**(ब) दुय्यम स्त्रोत :**

तथ्य संकलनात दुय्यम स्त्रोतांचा वापर करुन माहिती मिळविणे सुविधाजनक झाले. त्यामध्ये नियतकालिके, ग्रामपंचायत अहवाल, शासकीय दस्ताऐवज, स्मरणिका इत्यादि मुळे जी माहिती प्राप्त झाली त्याने संशोधन कार्य करने सुविधाजनक झाले.

**१.५ विषय निवडीची आवश्यकता व महत्व :**

भारतात ७० टक्यापेखा अधिक लोकसंख्या खेड्यात राहत असल्यामुळे भारत हा देश खेड्याचा देश म्हणून ओळखला जातो. ग्रामीण क्षेत्रातील जीवनस्तर उंचावल्या शिवाय देशाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही. स्थानिक स्वशासन व्यवस्था ही शासन व जनता या दोघांसाठीही काळाची गरज आहे. महाराष्ट्र हे शहरीकरणाचे प्रमाण अधिक असलेले राज्य असले तरी अद्यापही त्याचे ग्रमीण व कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत शेतीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग व पूरक उद्योग ठळकपणे दिसतात; परंतु ग्रामीण विकासाची मूळ व खरी जबाबदारी ग्रामविकास विभाग व त्यात कार्यान्वित असलेल्या पंचायत राज्य व्यवसथेतील यंत्रणेची आहे. ग्रामीण भागत उपलब्ध असलेल्या मानवी संसाधनाचा महत्तम उपयोग केल्यास ग्रामोद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. देशात ग्रामीण विकासाच्या नावावर गेल्या अनेक वर्षापासून करोडो रुपये खर्च झाले. परंतु ग्रामीण भागातील परिस्थिती फारशी बदलेली नाही. आज खेड्यांमध्ये पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मानवी वस्तींचे स्थानांतरण शहराकडे होत आहे, हे थांबविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक योजना शासनाने राबविल्या, परंतु ह्या योजना गावाच्या लोकांपर्यंत पोहचत नाही. ही फार खेदाची बाब आहे. याचा अर्थ विकास योजनांबाबत माहिती ग्रामीण भागातील सर्व माणसापर्यंत पोहचत नाही. पाच-दाहा टक्के गावे सोडली तर बाकीची खेडी अज्ञातवासातच राहिली. ग्रामीण विकास योजनेअंतर्गत - विविध उपक्रमाची माहिती लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. लोकसहभागातून एकात्मिक बालविकास, जलस्वराज्य प्रकल्प, सम्पूर्ण ग्रामीण रोजगार योजना, महिला व बालविकास विभागातील वैयक्तिक लाभाच्या योजना, यशवंत ग्राम समृद्धी योजना, केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम, महिला व बालविकास अंतर्गत विविध योजना, अनाथालये, महिला राज्यगृहे व संरक्षण गृहामधील निराश्रीत मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य, सावित्रीबाई

फुले बहुउद्देशीय महिला केंद्रे, महिला सक्षमीकरण योजना, बचत गट इत्यादि विविध उपक्रम शासनाद्वारे राबविल्या जात आहेत. ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक व सर्वच क्षेत्रातील परिवर्तन त्यात अपेक्षित आहे. हा अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचा निर्णय प्रक्रियेतील, सत्तेतील सहभाग अत्यंत आवश्यक असतो. तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होऊ शकतो. या सर्व योजनांची ग्रामीण जनतेला माहिती व्हावी त्यांचा ही सत्तेत, विकास कार्यात सहभाग व्हावा म्हणून आपले कर्तव्य आहे की, अश्या संशोधन कार्याच्या माध्यमातून व आदर्श गावाचे अध्ययन करुन त्याची माहिती अन्य गावाच्या लोकांपर्यंत पोहचविणे आणि प्रत्येक गाव आदर्श गाव कसा बनेल या करीता प्रयत्न करणे, जर गावातील प्रत्येक नागरिकाने मनात आणले तर ग्राम सक्षमीकरण होण्यास वेळ लागणार नाही.शहराकडे जाण्याचे आकर्षण थांबेल व प्रत्येक गाव एक गणराज्यासारखे होईल. ग्राम सक्षमीकरण होणे फार महत्वाचे आहे. नाहीतर आमची ग्रामीण संस्कृती नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे प्रस्तुत विषयाचे महत्व अनन्य साधारण स्वरुपाचे आहे.

**१.६ ग्राम सक्षमीकरण म्हणजे काय ?**

पंचायत राज म्हणजे विकेंद्रीकरण आणि त्या विकेंद्रीकरणातून विकास! विकास म्हणजेच गाव सक्षम करणे. स्वतः आपल्या पायावर उभे राहणे. स्वतः आपला विकास करण्यास समर्थ असणे. आपल्या गरजा आपल्या गावात पूर्ण होणे, ग्राम पंचायत स्तरावर जास्तीत जास्त लोकाभिमुख व पारदर्शक काम होणे ! यातुन स्थानिक जनतेला राजकीय शिक्षण, त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास, ग्रामीण विकास इत्यादि ध्येये साध्य करणे म्हणजेच ग्राम सक्षमीकरण करणे होय. या साठीच पंचायत राज संस्था म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाहीच्या प्रशिक्षण शाळा ठरल्या आहेत. पंचायत राज व्यवस्था ही संकल्पना फार प्राचीन म्हणजे वैदिक काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अस्तित्वात होती. परंतु खऱ्या अर्थाने पंचायत राज व्यवस्थेची संकल्पना महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेतून पुढे आली आहे. गांधीजी ग्रामसक्षमीकरणावर फार भर देत होते. त्यांच्या मते गावांच्या समस्या गावातच सोडविल्या गेल्या पाहिजेत प्रत्येक गाव हे एका

गणराज्या सारखे असायला पाहिजे. स्वकष्टावर आधारीत ग्राम व्यवस्था असायला पाहिजे आपल्या गावाचे पालन पोषण गावातील लघु कुटीर उद्योग धंद्याच्या माध्यमातून व्हायला पाहिजे असे गांधीजीला वाटत होते. गांव हे सक्षम असायला पाहिजे. म्हणजे महात्मा गांधीजीच्या रामराज्यातील खेड्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, न्यायिक, शैक्षणिक आदि स्वरुपाच्या गरजा गावातूनच पूर्ण व्हायला पाहिजे. परिणामी स्वावलंबी, व्यक्ती व स्वालंबी समाजातून, स्वावलंबी ग्राम हे महात्मा गांधीजींच्या रामराज्याची विचारधारा होती.

ग्रामसक्षमीकरण करण्याची मुळ व खरी जबाबदारी पंचायत राज व्यवस्था व ग्राम विकास विभाग या यंत्रणेची आहे. संविधानाच्या ७३ व्या दुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्था म्हटल्या जाणाऱ्या प्रशासकीय एककाचे सक्षमीकरण व सबलीकरण झाले. जिल्हा परिषदेमार्फत राज्य पुरस्कृत योजना व केंद्र पुरस्कृत योजना या राबविल्या जातात. त्यामध्ये इंदिरा आवास योजना, स्वर्ण जयंती, ग्रामीण स्वयंरोजगार योजना, राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना इत्यादि योजनांची अंमलबजावणी पंचायत राज व्यवस्था करतांना दिसत आहे. लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी व कार्यक्षमपणे विकास कामाला गती येण्यासाठी "यशवंत ग्राम समृद्धी योजना" राज्य शासनाने आखली आहे. या शिवाय संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवून अनेक गावांनी प्रगतीच्या दिशेने पावले उचलेली आहे. गाव पातळीवरील सर्व सरकारी कार्यालय एकाच ठिकाणी आणणे, लोकांचा वेळ आणि पैसा वाचविणे शारीरिक व मानसिक त्रास कमी करणे, राज्यातील ग्रामपंचायती नेटवर्कींग द्वारे जोडणे इत्यादीसाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहे. या सर्व धोरणांद्वारे पंचायत व ग्रामसभांना अधिकार देवून महिला व गरीब वर्गाचा रोजगार आणि स्वयंरोजगारासंबंधी विकास साध्य करण्याचा प्रयत्न पंचायत राज व्यवस्थे मार्फत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्यापक जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी राज्य सरकार द्वारे पंचायत राज व्यवस्थेला व्यापक अधिकार देण्यात आले आहे. परंतु ग्राम सक्षम करणे म्हणजे केवळ पायाभूत सोयींची निर्मिती नाही, तर ग्रामीण लोकांची मानसिकता बदलून ती परिवर्तनाला, आधुनिकीकरणाला अनुकूल करणे आणि त्यांच्या मनात समाज विकासाची भावना सजविणे, त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा लोकाभिमुख करणे,

अंमलबजावणीच्या प्रक्रियेत लोकसहभागी करणे, अंमलबजावणीची दिशा व गती देणारे नेतृत्व लोकभिमूख आणि व्यावसायिक करणे या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

लोकशाही विकसीत करण्यासाठी पंचायत राज व्यवस्था ही शाळा आहे असे म्हणतात येईल. शासनाच्या प्रत्येक योजना चांगल्या आहेत. पण त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन, लोक प्रतिनिधी, नौकरशाही, जनता यांच्यामध्ये समन्वय व सहकार्याची आवश्यकता आहे. तसेच ग्रामपंचायतीला जास्त अधिकार देवून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्याची गरज आहे. खेड्यामध्ये असणाऱ्या समस्यांचे निराकरण नियोजन ही बहुमुखी व गुणात्मक संकल्पना आहे. ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक मानसिक व सर्वच क्षेत्रातील परिवर्तन त्यात अपेक्षित आहे. आणि हा अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी पंचायत राज्य व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीणजनतेचा क्रियात्मक सहभाग व त्यासाठी ग्रामीण जनतेचा निर्णय प्रक्रियेतील. सत्तेतील सहभाग अत्यंत आवश्यक असतो. एकंदरित नैसर्गिक परिस्थिती, शेती जमीनीचे प्रकार जमीन धारणा पद्धती शेती जमीनीचा आकार, जल सिंचन यांत्रिकीकरण, शेती उपकरणे व सुधारित अवजारांचा वापर करणे, शेतमजूर कारागीर ग्रामीण उद्योग पशुपालन पर्यावरण ग्राम पंचायत जंगले नैसर्गिक व मानवी संसाधनाच्या विकासाचे कार्यक्रम इत्यादिंचा ग्राम सक्षमीकरणात समावेश होतो.

ग्रामसक्षमीकरणासाठी केंद्र सरकर व राज्य सरकारचह कोण-कोणती योजना आहे. याचे विवरण पुढील प्रकारणात आहेत.

# ग्राम सक्षमीकरणासाठी केंद्रसरकार व राज्य सरकारच्या योजना

१ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र सरकार ने पंचायतराज व्यवस्था निर्माण करण्यासाठी २७ जून १९६० रोजी तत्कालीन महसूल मंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्याअध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. श्री बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरण आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून केलेल्या सर्व शिफारशींचा अभ्यास करून आपला अहवाल तयार केला. श्री. वसंतराव नाईक समितीने २२६ शिफारशींचा आपला अहवाल १५ मार्च १९६१ रोजी महाराष्ट्र सरकारला सादर केला.

या अहवालातील शिफारशींच्या आधारे महाराष्ट्र सरकारने १ एप्रिल १९६१ रोजी 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा' संमत केला. ५ मार्च १९६२ रोजी भारताच्या राष्ट्रपतीकडून या कायद्याला संमती मिळाली. १ मे १९६२ रोजी या कायद्यानुसार महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद व तालुका स्तरावर पंचायत समिती स्थापन झाली. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत स्थापन करण्याची तरतुद या पूर्वीच १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमात करण्यात आली होती. अशाप्रकारे महाराष्ट्रात पंचायतराजची त्रिस्तरीय व्यवस्था अस्तित्वात आली. संशोधनकर्त्याचा संशोधनाचा विषय 'ग्राम सक्षमी करणात ग्राम पंचायतीची भूमिका' हा असल्यामुळे 'ग्रामपंचायत' ची रचना थोडक्यात पाहणे आवश्यक आहे.

**ग्राम पंचायत :**

पंचायतराज (स्थानिक शासन) व्यवस्थेतील प्रत्येक राज्यात ग्रामपंचायात स्थापने संबंधी वेगवेगळे कायदे अस्तित्वात आले. शिवाय वेगवेगळया नावांनी वेगवेगळ्या राज्यांत त्या ओळखल्या गेल्या. १९९२ साली संमत झालेल्या ७३ वी घटनादुरुस्ती कायद्याने ग्रामपंचायतीला घटनात्मक दर्जा देण्यात आला.

**ग्राम पंचायतीची स्थापना :**

ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासाठी श्री.बलवंतराय मेहता समितीने गावाची लोकसंख्या ५०० एवढी सांगितली होती तर महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या श्री.वसंतराव नाईक समितीने गावाची लोकसंख्या १००० एवढी सांगितली होती. महाराष्ट्र सरकारने मात्र

राज्याच्या सपाट भूप्रदेशातील ज्या गावाची लोकसंख्या ६०० एवढी असेल त्या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायतची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. शिवाय दोन किंवा दोन पेक्षा अधिक गावांची एकत्रित लोकसंख्या ६०० एवढी भरत असेल तर अशा गावासाठी 'गट' ग्रामपंचायत राज्य सरकार निर्माण करू शकते. डोंगरी प्रदेशात लोकसंख्या ३०० एवढी असेल तर त्या गावासठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन केली जाते.

**ग्राम पंचायतीची रचना :**

ग्रामपंचायत क्षेत्राची भौगोलिक रचना आणि ग्रामपंचायत क्षेत्रातील गावांची लोकसंख्या विाारात घेऊन ग्रामपंचायतीची रचना केली जाते. गावातील एकूण लोकसंख्येवरून ग्रामपंचायतीची एकूण सभासद संख्या निश्चित केली जाते. ग्रामपंचायतीची एकूण सदस्य संख्या आणि गावाची भौगोलिक रचना यावरून ग्रामपंचायतीचे प्रभाग (वार्ड) निर्माण केले जातात. निवडणूकी करिता मतदारांचे जे गट पाडले जातात त्यांना प्रभाग असे म्हटले जाते. ग्रामपंचायतीच्या एका प्रभागातून कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन सभासद ग्रामपंचायतीवर निवडून जातात. म्हणून एका प्रभागातून जेवढे सदस्य निवडून जातात तेवढीच मते देण्याचा अधिकार ग्रामपंचायतीच्या मतदाराला प्राप्त होतो. एकावेळी एका उमेदवाराला एकच मत देता येते. ग्रामपंचायतीचे प्रभाग निश्चित करण्याचा व आवश्यक तेव्हा प्रभागाच्या सदस्य संख्येत बदल करण्याचा अधिकार राज्यशासनाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यास असतो.

२४ एप्रिल १९९४ पासून महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग, महिला वर्ग, अशा प्रकारे वेगवेगळ्या वर्गासाठी ग्रामपंचायतीमध्ये राखीव जागा ठेवल्या जातात. या राखीव जागेतून त्याच जातीतील स्त्री-पुरुषांना निवडणूक लढविता येते.

**निर्वाचन पद्धत :**

ग्रामपंचायतीच्या सर्व सभासदांची निवड ज्याच्या वयाला १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत अश्या सर्व स्त्री-पुरुषांना (प्रौढ नागरिक)  गुप्त मतदान पद्धतीनुसार मतदान करता येते. आणि ज्याच्या वयाला २१ वर्षे पूर्ण झाले आहेत व ग्रामपंचायत क्षेत्रातील मतदार यादीत त्यांचे नाव

नोंदलेले आहेत तसेच सरकारी कर्मचारी नाही व कायद्याद्वारे निश्चित केलेली पात्रता विषयक अटी तो पूर्ण करीत असेल तो निवडणूकीस उभा राहू शकतो.

**ग्रामपंचायतीचा व तिच्या सभासदांचा कार्यकाल :**

सन १९९२ पुर्वी भारतातील विविध घटकराज्यांमध्ये ग्रामपंचातीच्या कार्यकालात भिन्नता होती. काही राज्यांच्या ग्रामपंचातीचा कार्यकाल ३ वर्षे, तर काहींचा ४ वर्षे. महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, पंजाब व मध्यप्रदेश राज्यांमध्ये ५ वर्षाचा होता. सन १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार देशातील सर्व राज्यांमध्ये ग्रामपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षाचा करण्यात आला.

**ग्राम पंचायतीचे पदाधिकारी :**

ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची निवड केले जाते. त्यांना सरपंच आणि उपसरपंच म्हणतात. ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेचा अध्यक्ष तहसीलदार असतो. तोच सरपंच आणि उपसरपंचाची निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करून निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहतो. सरपंच, उपसरपंचाचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. सरपंच पदासाठी अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासप्रवर्ग, महिला वर्ग, इत्यादी विविध वर्गाला आरक्षण असते.

ग्रामपंचायत सरपंच आणि उपसरपंचाचा कार्यकाला पाच वर्षाचा असला तरी हा कार्यकाल संपण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे निर्वाचित सभासद त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडू शकतात. कायद्याने मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करणे, कर्तव्य पालन न करणे, ग्रामपंचायतीची बैठक न बोलावणे, ग्रामपंचायतीने संमत केलेल्या ठरावांची अमंलबजावनी न करणे, इत्यादी विविध कारणासाठी सरपंच व उपसरपंचावर अविश्वासाचा ठराव मांडण्याचा अधिकार १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील कलम ३५ नुसार ग्रामपंचायत सभासदांना आहे.

ग्रामपंचायतीच्या एकूण निर्वाचित सभासदांपैकी १/३ सभासद सरपंच किंवा उपसरपंचावरील अविश्वास ठरावाची नोटीस स्वतःच्या सहीनुसार तहसीलदाराकडे द्यावी लागते. या ठरावाची नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत तहसीलदार ग्रामपंचायत

सभासदांची विशेष सभा बोलावतात. या सभेचा अध्यक्ष तहसीलदार किंवा त्याने नियुक्त केलेला अधिकारी असतो. या बैठकीत अविश्वासच्या ठरावावर चर्चा होते. एकूण ग्रामपंचायत सभासदांपैकी २/३ सभासदांनी हा ठराव संमत केल्यास सरपंच किंवा उपसरपंचाला राजीनाम द्यावा लागतो. हा ठराव फेटाळला गेल्यास १२ महिन्या पर्यंत सरपंच किंवा उपसरपंचावर अविश्वासचा ठराव मांडता येत नाही. सरपंच पदावर महिला असेल तर त्यांच्यावर अविश्वसाचा ठराव पास होण्यासाठी ३/४ बहुमत आवश्यक असते.

शिवाय गैरवर्तन, भ्रष्टाचार इत्यादी कारणांवरून सरपंच आणि उपसरपंचाला पदावरून काढून टाकण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीला असतो. पण त्या करिता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सरपंच आणि उपसरपंचाची चौकशी करून त्या संबंधीचा अहवाल स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक असते.

**ग्रामसक्षमीकरणासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या योजना :**

आजच्या आधुनिक युगातील पंचायतराजचे स्वरुप हे प्राचीन किंवा ब्रिटीश कालीन भारतातील पंचायतीपेक्षा पुर्णपणे भिन्न आहे काही निवडक विभागातून प्रायोजिक योजना म्हणून इ.स. १९५२ मध्ये सामूहिक विकास योजनेला सुरुवात झाली. एकूण तीन लाख लोकवस्तीच्या तीनशे खेड्यांचा त्यात समावेश झाला होता. सामूहिक विकास योजनेचा आशय कार्यक्रम व संघटन पद्धती, भिन्न-भिन्न खात्यांच्या यंत्रणामध्ये एकसुत्रीकरण कसा आणावा, कामाचा वेग कसा वाढवावा, स्थानिक लोकांचा सक्रिय पाठींबा कसा मिळवावा आणि इतर बाबींचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने १९५६ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. २४ नोव्हेंबर १९५७ रोजी समितीने आपला अहवाल सादर केला. यात काही शिफारशी देण्यात आल्या होत्या. त्या शिफारशी राष्ट्रीय विकास मंडळाने १२ जानेवारी १९५९ च्या बैठकीत स्विकारल्या आणि राज्यसरकारांना असे सुचविले की, त्या शिफारशी स्थानिक परिस्थितीत लक्षात घेवून आवश्यक असेल तर थोडेफार बदल करून राज्यसरकारने पंचायत राज प्रशासना संबंधी कायदे करावेत. नाईक समितीच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्रामध्ये १९६२ मध्ये त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. या व्यवस्थेमधील जिल्हा परिषद व पंचायत समित्या ह्या जिल्हा परिषदेचा एक घटक म्हणून काम पाहतात. पंचायत

समित्यांना ग्रामपंचायती सारखे स्वतंत्र अस्तित्व नाही. तथापि ७३ वी घटनादुरुस्ती नंतर पंचायत समित्यांना थोडे अधिक स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पुरातन काळापासून भारतात खेड्यांचा विकास घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केलेल्या दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील खेड्यांची स्थिती दयनीय स्वरूपाची झाली होती याची जाणीव भारतीय नेत्यांना होती. म्हणून भारतीय संविधानात असे निर्देश देण्यात आले की, ग्रामपंचायत विशिष्ट उपायांची निर्मिती करेल. त्यांना एवढे अधिकार दिले जातील की, ग्रामपंचायत स्वशासनाची निर्मिती करतील.

सन १९६२ मध्ये पंचायत राज संस्थेची निर्मिती झाल्यानंतर १९७२ पर्यंत या संस्थानी चांगले काम केले. सन १९७२ नंतर जिल्हा नियोजन व विकास समितीची निर्मिती झाल्यावर गाव पातळीवरील मूलभूत सोयीसुविधा आणि विकास कामाबाबत नियोजन शासनाने करायचे आणि जिल्हा परिषदाची शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी करायची असे सुत्रच ठरले होते. ७३ वी (१९९३) घटना दुरुस्ती होईपर्यंत वरील प्रमाणे कामाचे नियोजन व्हायचे. पण ७३ वी घटना दुरुस्ती नुसार या परिस्थितीत बदल झालेला आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर मानवी समाजाची शहरी व ग्रामीण अशी विभागणी झाली. वाढत्या शहरीकरणामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. ग्रामीण भागातून शहरीकरणाकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरन होऊ लागले. याचे महत्वाचे कारण होते शहरी विकासाचे आकर्षण. शहरी विकासाचे सकारात्मक परिणाम झाले तसेच दुष्परीणाम ही दिसू लागले. ग्रामीण जनता नोकरी, व्यवसायासाठी शहराकडे वळू लागली. त्यामुळे शहराच्या व्यवस्थेवर ताण निर्माण झाले. याचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व्यवस्थेवर परिणाम झाला. तो दोन्ही दृष्टीने चांगला आणि वाईट. त्यामुळे शहरीकरणाचा वेग रोखून महात्मा गांधीजींचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकारण्यासाठी तसेच राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी पंचायत राज्य व्यवस्था यशस्वी होणे आवश्यक होते. म्हणून ७३ वी घटनादुरुस्ती (१९९३)ची कलम ग्रामीण विकासाशी निगडीत असून त्यात २९ विषय आहेत. तर ७४ वी घटनादुरुस्ती नगर विभागाशी संबंधित असून त्यात १८ विषय समाविष्ट केले आहे.ग्राम अथवा नगर नियोजन, सामाजिक आर्थिक विकास पायाभूत सुविधा कृषि विकास,

जलव्यवस्थान, सांडपाणी निर्मुलन, अपारंपारिक उर्जा विकास,सेवासुविधा, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरण सवंर्धन, सांस्कृतिक विकास इत्यादी विषय सोपविलेले आहेत.

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार घटनेत ११ वे परिशिष्ट समाविष्ट करण्यात आले. त्यात ग्रामीण भागाच्या मूलभूत सुविधांच्या विकासासाठी पुढील विषयांची नोंद करण्यात आली आहे. (१) कृषी आणि कृषी विस्तार, (२) भू-विकास, भू-सुधारणा, तुकडे जोड मृदसंधारण, (३) छोटे पाटबंधारे जलव्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास, (४) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, (५) मासेमारी, (६) सामाजिक वनीकरण आणि शेती वनीकरण, (७) किरकोळ जंगल उतपन्न, (८) लघुउद्योग, अन्नप्रक्रिया उद्योगासह, (९) खादी ग्रामोद्योग व कुटीर उद्योग, (१०) ग्रामीण गृह निर्माण, (११) पिण्याचे पाणी, (१२) इंधन व गुरांना चारा, (१३) रस्ते, नाले, पुल, जलवाहतुक, जलमार्ग, आणि अन्य दळणवळणची साधने, (१४) ग्रामीण विद्यूतीकरण व वितरण, (१५) अपारंपारिक उर्जा स्त्रोत , (१६) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, (१७) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, (१८) तांत्रिक प्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण, (१९) प्रौढ शिक्षण, औपचारिक शिक्षण, (२०) ग्रंथालय, (२१) सांस्कृतिक कार्यक्रम, (२२) बाजार व जत्रा, (२३) आरोग्य व स्वच्छता, रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने, (२४) कुटुंब कल्याण, (२५) स्त्रिया व शिशु विकास, (२६) समाज कल्याण व मतीमंद व्यक्ती कल्याण, (२७) दुर्बल घटकांचे कल्याण, अनुसूचित जाती-जमातींचे कल्याण, (२८) सार्वजनिक वितरण व्यवस्था, (२९) सामाजिक ठेवीचे जतन.

जन्म मृत्यू नोंदणीपासून स्मशानभूमी व्यवस्था करणे ही सर्व कामे केन्द्र - राज्य सरकारने स्थानिक शासनाकडे सोपविलेली आहेत. प्रसूतीगृहे, रूग्णसेवा, प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, व्यापार केंद्र सेवा, अग्नीशामक सेवा, सार्वजनिक उद्याने, करमणूक, सांस्कृतिक केंद्रे इत्यादी महत्वपूर्ण ऐच्छिक कार्ये स्थानिक शासनाकडून केली जात आहेत. या संस्था अलिकडे जास्त स्वायत्त बनविल्या जात आहेत. परंतु आर्थिक साधनांच्या मर्यादित उपलब्धतेमुळे त्यांना अपेक्षित कार्य पार पाडणे अशक्य होत चालले आहे. केंद्र व राज्य सरकारने अनेक योजना गावांच्या विकासासाठी संचालित केल्या आहेत. या योजनांचे क्रियान्वयन पंचायत राज याच्या माध्यमातूनच शक्य

आहे. पंचायत राज या संस्थांच्या माध्यमातून प्रथमच विकासाची फळे ग्रामीण पातळी पर्यंत पोहोचले आहे. जेथे प्रभावी नेतृत्व आणि जास्त सेवाभावी संस्थाची जोड मिळालेली आहे तेथे हे बदल ठळक पणे जाणवतात. कृषी सुधारणा, जलव्यवस्थापन, जोडरस्ते व इतर वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, शाळा व त्यांच्या इमारती समाजकल्याण कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमातून ग्रामीण जनजीवनात बदल घडून येत आहे. एकात्मिक ग्रामीण विकास योजना ही ग्रामीण विकासातील विविध क्षेत्रांना एकत्रित गुंफणारी यंत्रणा असून गरीबांना देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, जीवनात सामावून घेणे व त्यांच्या अस्तित्वाला नवा अर्थ प्राप्त करून देण्याच्या उद्देश्याने कार्यकरत आहे.ग्रामसक्षमीकरणासाठीकेंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना पुढील प्रमाणे :

१) **समुदाय विकास कार्यक्रम :**२ ऑक्टो १९५७ साली सुरुवात झाली याचा उद्देश्य ग्रामीण भागाचा विकास करणे - ही ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणलेली राष्ट्रीया पातळीवरील पहिली योजना आहे.

२) **सहाय्यक अनुदान योजना :** १९६० साली सुरुवात झाली. लोकसंख्या वाढ नियंत्रण व स्थिरतेस सहाय्य करणे, याचा लाभ - स्वच्छेने कुटुंब नियोजन पद्धती स्वीकारलेल्या व्यक्ती घेऊ शकतात. ही योजना १००% केंद्र पुरस्कृत आहे.

३) **ग्रामीण भागातील पाणी पुरवठा कार्यक्रम :** १९७२-७३ साली सुरुवात झाली. या योजनेचा उद्देश्य पेयजलाची अधिक भागात उपलब्धता वाढविणे याचा लाभ ग्रामीण भागातील लोक व वाळवंट क्षेत्रातील जनावरे यांच्यासाठी आहे. प्रत्येक २५० व्यक्तींसाठी हातपंप उभारणे, प्रत्येक व्यक्तीस किमान ४० लिटर पाणी प्रतिदिन पुरविणे.

४) **महाराष्ट्राची कापूस एकाधिकार योजना :** ऑगस्ट १९७२ पासून सुरु करण्यात आली. कापसाला रास्त भाव देणे, याचा लाभ कापूस उत्पादक शेतकरी घेऊ शकतात. या योजनेचे वैशिष्ट्य असे की राज्यशासनाने खासगी संस्थाना सुद्धा शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करण्यास परवानगी दिली आहे.

**५) समादेशित क्षेत्र विकास कार्यक्रम :** १९७४-७५ ही केंद्र सरकारची योजना आहे. याचा उद्देश्य सिंचन क्षेत्रातील तफावत भरून काढणे सध्या ही योजना राज्य योजना म्हणून राबविली जाते. (ADP व वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम एकत्रित करण्यात येणार आहेत.)

**६) दलित वस्ती सुधार योजना :** १९७४-७५ साली अमलात आणल्या गेली ही महाराष्ट्र शासनाची योजना असून याचा उद्देश्य दलित वस्तीचा सर्वांगीण विकास करणे. याचा लाभ अनुसूचित जाती व नवबौद्ध घेऊ शकतात. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे दलित वस्तीत स्वच्छता विषयक सोई करणे.

**७) किमान गरजा कार्यक्रम :** १९७४-७५ साली ही योजना सुरु करण्यात आली ही महाराष्ट्र शासनाची योजना असून, मागास व अपेक्षित वर्गाचा सामाजिक व आर्थिक विकास साधणे. या योजनेचा लाभ ग्रामीण भाग, शहरी झोपडपट्ट्या, भूमिहीन मजूर घेऊ शकतात. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही सेवा प्रथम दुर्लक्षित भागात पुरविणे. यात ग्रामीण आरोग्य, पाणी पुरवठा, विद्युतीकरण कडे लक्ष देणे.

**८) बालसंगोपण योजना :** १९७५ साली अमलात आणल्या गेली. ही यंत्रणा महिला व बालविकास अधिकाऱ्याकडे आहेत. याचा उद्देश्य अनाथ, निराधार, बेघर इत्यादी मुला, मुलींचे संगोपन करने. (०-१८ वयोगटातील मुले-मुली) या योजने अंतर्गत पालनकर्त्या पालकास अनुदान दिले जाते.

**९) एकात्मिक बाल विकास योजना :** २ ऑक्टोंबर १९७५ साली ही योजना अमलात आली. या योजनेचा उद्देश्य ०-६ वयोगट बालकांचा विकास करणे, बालमृत्यू दर, कुपोषण प्रमाण कमी करणे, याचा लाभ BPL कुटुंबातील ICDS सेवा लाभार्थी १५०-४०० लोकांमागे १ मिनी अंगणवाडी, तसेच ४००-८०० लोकांमागे १ अंगणवाडी केंद्र असावे. ही राज्य सरकारची पुरस्कृत योजना आहे.

**१०) ट्रायसेम योजना :** १५ ऑगस्ट १९७९ ला या योजनेची सुरुवात झाली. केंद्र सरकारची ही योजना असून ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देने. (१८-३५ वयोगटातील तरुण) हे या योजनेचे उद्दीष्ट असून प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने आहे.

**११) एकात्मिक ग्रामीण विकास योजना :** २ ऑक्टोंबर १९८० ला ही योजना अमलात आली. केंद्र सरकारची ही योजना असून हिचा उद्देश्य ग्रामीण विकास करणे याचा लाभ SC/ST स्त्रिया, अपंग घेऊ शकतात. या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील गरीब लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आहे.

**१२) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :** (१९८१-८२) ही योजना अमलात आली. शिक्षण विभागाद्वारे ही योजना अमलात आणली जाते. माध्यमिक स्तरावरील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी तसेच याचा लाभ ग्रामीण गरीब, हुशार विद्यार्थी घेऊ शकतात. १ एप्रिल २००७ ला ही योजना बंद करण्यात आली.

**१३) ग्रामीण क्षेत्रातील महिला व मुलांचा विकास :** १९८२-८३ ला केंद्र सरकार द्वारे ही योजना अमलात आणल्या गेली. ग्रामीण भागातील गरीब स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावणे या उद्देश्यानी ही योजना अमलात आणल्या गेली. याचा लाभ ग्रामीण भागातील गरीब स्त्रिया घेऊ शकतात. ही योजना १९९९ ला स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार मध्ये विलिन करण्यात आली.

**१४) इंदिरा आवास योजना :** (प्रधानमंत्री आवास योजना) १९८५-८६ साली ही योजना अमलात आणल्या गेली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारा, या योजनेचा उद्देश्य असा की, घरे बांधून देण्यास वित्तीय सहाय्यता करणे याचा लाभ अनुसूचित जाती व जमाती (SC/ST) घेऊ शकतात. २०१५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना म्हणून पुर्नरचना करण्यात आली.

**१५) CAPART :** १६ सप्टेंबर १९८६ साली ही योजना अमलात आणली ग्राम विकास मंत्रालयाद्वारा, या योजनेचे उद्दिष्ट असे की, स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते यांना ग्रामीण भागात कार्य करण्यास मदत करणे याचा लाभ SC/ST भूमिहीन कामगार घेऊ शकतात. CAPART जनजागृतीसाठी प्रयत्न करते. ग्रामीण दारिद्र्य, आर्थिक दुर्बल घटक, विकल्प यांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

**१६) खडू - फळा मोहिम :** सन १९८७-८८ मध्ये केंद्र सरकारद्वारा पुरस्कृत ही योजना आहे. याचा उद्देश्य प्राथमिक शाळांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, याचे

वैशिष्ट्य असे की, प्राथमिक शाळेला किमान दोन पक्क्या वर्ग खोल्या, व शालेय साहित्य पुरविणे.

**१७) राष्ट्रीय साक्षरता मिशन :** ५ मे. १९८८ ला ही योजना प्रौढ शिक्षण संचालनालयाद्वारे अमलात आणल्या गेली. याचा उद्देश्य प्रौढ शिक्षणाची तीव्रता वाढविणे. १५ ते ३५ वयोगटातील निरक्षर व त्या पेक्षा वरील वयाचे निरक्षर लोकांमध्ये व्यावहारिक साक्षरता वाढविणे.

**१८) जवाहर रोजगार योजना :** १ एप्रिल १९८९ साली ही योजना पंचायत राज संस्था अतंर्गत अमलात आणल्या गेली दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मितीला प्राधान्य तळागाळातील जनतेचा प्रशासानात सहभाग हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. ग्रामीण भागातील सर्व नागरिक याचा लाभ घेऊ शकतात. ही ७ वी पंचवार्षीक योजना सुरु करण्यात आली. १९९९ पासून JGSY मध्ये विलीन करण्यात आली.

**१९) दशलक्ष विहीर योजना :** सन १९८८-८९ साली ही योजना अमलात आली. SC/ST लहान शेतकरीया योजनेचा लाभ घेऊ शकतात. ही योजना स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत विलीन करण्यात आली.

**२०) महिला समस्या योजना :** (१९८८-९९) महिला सशक्तीकरणासाठी ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा स्वविकास व समाज विकासामध्ये सहभागी करणे.

**२१) ग्रामीण कामगारांना सुधारित औजारांचा पुरवठा :** ३ जुलै १९९२ साली या योजनेची सुरुवात झाली. ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत आहे. ग्रामीण कारागीर, विणकर, विडी कामगार यांची तांत्रिक कुशलता वाढविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. यात SC/ST ला ५०% आरक्षण देण्यात आले आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत विलीन ग्रामीण कारागीरांना TRYSEM अतंर्गत प्रशिक्षण दिले जाई.

**२२) महिला समृद्धी योजना :** (२ ऑक्टोंबर १९९३) ग्रामीण महिलासाठी ही योजना आहे. याच लाभ १८ वर्षावरील महिला घेऊ शकतात यासाठी किमान ठेव ४ रु. ते ४ च्या पटीत कामाला ३०० पर्यंत.

**२३) राष्ट्रीय महिला आयोग :** (१९९२) भारत सरकार द्वारा निर्माण करण्यात आले. या आयोगाद्वारे भारतीय महिलांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व केले जाते. सर्व महिला संबंधी उपायांच्या चौकशीसाठी आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहे.

**२४) पशुधन विमा योजना :** (१९९३-९४) हे केंद्राची योजना राज्य महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळची यंत्रणा द्वारे चालविली जाते. पशुधारक व्यक्ती याचा लाभ घेऊ शकतात. प्रती पशुपालन दोन दुधारू जनावरांचा विमा या द्वारे उतरविला जातो.

**२५) प्रधानमंत्री रोजगार योजना :** (२ ऑक्टोंबर १९९३) केंद्र शासना द्वारे संचालित ही योजना ग्रामीण शहरी युवकांना रोजगार (१८ ते ३५ वयोगटातील गरजू बेरोजगार युवकांसाठी) उपलब्ध करून देते. २२.५% SC, २७% ST यांच्यासाठी आरक्षणची व्यवस्था करण्यात आली.

**२६) सांसद स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम :** (२३ डिसेंबर १९९३) खासदार यांच्या मतदार संघात सुधारणा करण्यात प्रोत्साहित करणे हे उद्दिष्ट या योजनेचे आहे. ५ कोटी रू. चा निधी २ टप्यात दिला जातो. १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे.

**२७) राज्याचे महिला धोरण :** (१९९९, २००१, २०१३-१४) राज्य शासनाची ही योजना आहे. महिलांचे सशक्तीकरण व विकास व्हावे हे उद्दिष्ट समोर ठेवून ही अमलात आणली. महाराष्ट्रातील महिला जे की असंघटित क्षेत्रावरील महिला आहे त्यांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे.

**२८) इंदिरा महिला योजना :** (१५ ऑगस्ट १९९५) महिलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संस्थात्मक पाया निर्माण करणे हे या योजनेचेउद्दिष्ट आहे. आदिवासी भागातील १५ जिल्ह्यां करिता ही योजना आहे. तसेच यांचा करिता नव संजीवनी योजना (२३ जून १९९५-९६) कार्यान्वित करण्यात आली. या योजनेत आदिवासी भागातील १५

जिल्ह्यांसाठी मातृत्व अनुदान आयोग, दाई बैठक योजना, भरारी पथक योजना इत्यादी आहेत.

**२९) मध्यान्ह भोजन योजना :** (१५ ऑगस्ट १९९५) केंद्र सरकार पुरस्कृत ही योजना आहे. प्राथमिक शाळेतील बालकांना दुपारी शिजविलेले अन्न (प्रत्येकी १०० ग्रॅम) देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य भाग आहे. काही शाळामंध्ये शिजविलेले अन्न न देता प्रत्येकाला प्रतिमाह तीन किलो धान्य (१० महिने) दिले जाते. या अन्नधान्याचा व वाहतुक खर्चाचा भार केंद्र सरकार ने स्वीकारलेला आहे. अश्या शिक्षणासाठी विविध योजना करण्यात आल्या.

**३०) अहिल्याबाई होळकर योजना :** (१९९६-९७) विद्यार्थीनींना महामंडळ बस मधून मोफत पास (५ ते १० वी पर्यंत विद्यार्थीनी प्रवास सवलत) देणे या साठी राज्य शासनाने ही योजना कार्यान्वित केली.

**३१) बालिका समृद्धी योजना :** (१९९७ WCD मंत्रालय) मुलींच्या जन्माविषयी, दृष्टीकोण बदलविणे हा उद्देश्य समोर ठेवून ही योजना अमलात आणली. याचा लाभ BPL कुटुंबातील मुली (१५ ऑगस्ट १९९७ नंतरच्या) जन्मा नंतर अनुदान ५०० रु. दिले जाते.

**३२) गंगा कल्याण योजना :** (१ फेब्रुवारी १९९७) केंद्र सरकार ची योजना आहे. भूगर्भातील पाण्याचा शोध लावणे हा उद्देश्य लाभ लहान सीमांत शेतकरी घेऊ शकतात. ही योजना स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत विलीन केली.

**३३) राजराजेश्वरी महिला कल्याण विमा योजना :** (१२ मार्च १९९९) १० ते ७५ वर्षाच्या सर्व महिला १५ रू. वार्षिक प्रिमियम २५००० हजार रूपयाने विमा कव्हर. महिलांना आर्थिक सुरक्षा पुरविण्यासाठी ही योजना आहे.

**३४) भाग्यश्री बाल कल्याण योजना :** (१९ मार्च १९९९) पालकांचे किंवा पालकांपैकी एकाचे अपघाती निधन झाल्यास १२०० ते २४०० वार्षिक मुलींच्या शिक्षणासाठी १८ वर्षा पर्यत मिळणार. पालकांचे वय ६० पेक्षा जास्त नसलेल्या १८ वर्षाखालील मुली.

**३५) दीनदयाल अपंग पुनर्वसन योजना :** (१९९९) अपंग व विकल्प व्यक्तीसाठी १० व्या पंचवार्षिक योजनेत ३३५ कोटी अनुदानाची व्यवस्था.

**३६) समग्र आवास योजना :** (१९९९-२००० गृहनिर्माण) ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, घर निर्मिती बरोबर दारिद्र्य निर्मूलन कमी करने.

**३७) सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना :** (१ एप्रिल १९९९) केंद्र सरकारची ही योजना पायाभूत सुविधा निर्माण करने, दारिद्र्य निर्मूलन, याचा लाभ ग्रामीण भागातील गरीब कुटुंब घेऊ शकतो. यात  सूक्ष्म लघुउद्योगावर भर, लाभार्थी मध्ये महिला SC/ST, अपंग यांना निश्चित वाटा.

**३८) वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम :** (१९९६-९७) कृषी मंत्रालय यंत्रणा अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्यांना आर्थिक मदत पुरविणे. ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत AIBP अंतर्गत राज्य सरकारांना ५५४१६ कोटी कर्जसहाय्य देण्यात आले. मध्यम व मोठे प्रकल्प.

**३९) राष्ट्रीय कृषी विमा योजना :** (१९९९-२००० केंद्रशासन) नैसर्गिक आपत्तीने पिकांची हानी झाल्यास अधिक मदत, सर्व शेतकरी साठी ही योजना राज्यासाठी ऐच्छिक.

**४०) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना :** (२००० केंद्रसरकार) अपंगाना मासिक निवृत्ती वेतन देणे. १८ ते ६५ वयावरील दारिद्र्य रेषेखालील ८० पेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना ५००रु. दरमहा.

**४१) अंत्योदय अन्न योजना :** (२५ डिसेंबर २०००) भूक मुक्त भारत निर्माण करणे याचा लाभ ग्रामीण व नागरी कुटुंब घेऊ शकतात. ३५ किलो ग्रॅम धान्य मोफत देणे.

**४२) एकलव्य इंग्रजी माध्यम शिवाजी शाळा :**(२०००-२००१ केंद्र सरकार पुरस्कृत) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी CBSC पॅटर्न नुसार ६ ते १२ चे वर्ग सुरू करणे. याचे लाभ ५वी उत्तीर्ण आदिवासी विद्यार्थी घेऊ शकतात. महाराष्ट्रात पालघर, नाशिक, अमरावती, नागपूर या जिल्ह्यात या शाळा सुरू आहेत.

**४३) भारत निर्माण योजना :** (१६ डिसेंबर २००५) केंद्र सरकार ग्रामीण विकास मंत्रालय द्वारा संचालित. ग्रामीण भागाला स्वावलंबी बनविणे हे उद्दीष्ट असून ग्रामीण भागात गृहनिर्माण, रस्ते, वीज, दूरसंचार, पेयजल व जलसिंचन करणे.

**४४) स्वजलधारा :** (२५ डिसेंबर २००० शासन व जनतेचा सहभाग) याचा उद्देश्य ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकास किमान पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, अर्थ पुरवठा, डिझेल, पेट्रोलवरील  अधिभरातील वाटा.

**४५) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :** (२५ डिसेंबर २००७ संचालित ग्रामीण विकास मंत्रालय) देशातील सर्व खेडी वस्त्या बारमाही रस्त्याने जोडणे. ज्या गावांतील लोकवस्त्या ५००० पेक्षा अधिक अर्थपुरवठा, डिझेल, पेट्रोल वरील अधिभारातील वाटा.

**४६) राष्ट्रीय महिला सबलीकरण :** (२० मार्च २००१ केंद्र सरकार) महिलांच्या प्रगती संबंधी त्या सोबतच स्वयं सिद्धा योजना (१ फेब्रुवारी २००१ ते मार्च २००७).

**४७) स्वाधार :** (२००१-२००२ राज्यशासनाचा महिला व बाल विकास सामाजिक कल्याण विभाग संचालित) संकटात सापडलेल्या महिलांचे पुनर्वसन करणे उद्दीष्ट आहे. निराधार महिला लाभ घेऊ शकतात. स्त्रियांसाठी हेल्पलाईन, कुपोषित गरीब, अशिक्षित महिलांना फायदेशीर खाजगी व सरकारी दवाखान्यात दर महिन्याला मोफत तपासणी.

**४८) सर्व शिक्षा अभियान :** (२००१ पासून राज्य सरकार पुरस्कृत) ६ ते १४ वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण, गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे.

**४९) ग्रामीण भंडारण योजना :** (१ एप्रिल २००१ केंद्र सरकार कृषी मंत्रालय पुरस्कृत) गोदामे बांधण्यासाठी अनुदान. याचा लाभ पदवीधर शेतकरी सहकारी व शासकीय कोठार संघटना घेऊ शकते.

**५०) अन्नपूर्णा योजना :** (१ एप्रिल २००१ स्थानिक स्वराज्य संस्था) ६५ वयावरील स्त्री - पुरुष लाभार्थीची निवड तहसीलदार मार्फत.

**५१) संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी :** (२५ सप्टेंबर २००१ स्थानिक स्वराज्य संस्था) ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार मिळवून देणे. १ एप्रिल २००८ मध्ये मनरेगा योजनेत विलीन.

**५२) संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान :** (२००१-२००२ ग्रामविकास मंत्रालय द्वारे) ग्रामीण स्वच्छतेच्या कार्यास अधिक चालना देणे हे उद्दीष्ट असून हे अभियान २ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर असे ३ महिने राबविले जाते.

**५३) संपूर्ण स्वच्छता अभियान :** (मार्च २००२ केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय) ग्रामीण भागात वैयक्तिक स्वच्छता, शिक्षणावर भर, व्यक्तिगत परिसर स्वच्छ ठेवणे, घराघरात शौचालय बांधण्यास प्रयत्न करणे.

**५४) हरियाली योजना :** (२७ जानेवारी २००३ ग्रामीण विकास संस्था) ग्रामीण भागासाठी ही योजना आहे. दर हेक्टरसाठी ६००० रु. वित्तपुरवठा केला जातो.

**५५) निर्मल ग्राम पुरस्कार :** (२ ऑक्टोंबर २००३ केंद्रीय ग्राम विकास मंत्रालय) संपूर्ण स्वच्छता अभियानाला चालना देणे, याचा लाभ तालुका, जिल्हा, राज्य स्तरावर घेता येतो. पुरस्कार १ हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीस ५००० रु.

**५६) National Program for Education of girls at Elementry level:** (जुलै २००३ केंद्र सरकार पुरस्कृत) याचा उद्देश्य शाळा बाह्य मुलींपर्यंत पोहचण्याचा आहे. मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी अनुदान दिले जाते.

**५७) वंदे मातरम आरोग्य योजना :** आरोग्य योजना (९ फेब्रुवारी २००४, खाजगी व सरकारी दवाखाने) नवजात बालके, गरोदर स्त्री, मृत्युदर नियंत्रीत करण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला मोफत तपासणी.

**५८) श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना :** (२००४ महाराष्ट्राशासन) ६५ पेक्षा जास्त वयाच्या वृद्ध, निराधार लोकांना निवृत्ती वेतन दर महा ६०० रु.

**५९) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना :** (जून २००४ महाराष्ट्रशासन) दारिद्र्य रेषेखालील लोकांना जमीन वाटप. SC लोकांना करिता ४ एक्कर कोरडवाहू, २ एक्कर बागायत जमीन दिली जाते.

**६०) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम :** (२००३ पासून केंद्रीय आरोग्य मंत्रालय) क्षयरोग नियंत्रणाखाली आणने क्षयरोगी करिता डॉट्सप्लस प्रोजेक्ट प्रणाली.

**६१) कृषी संजीवनी योजना :** (२००३-०४ राज्याचा उर्जा विभाग) शेतकऱ्यांकडील थकीत वीज बीलाची वसुली सुधारणे.

**६२) कृषी श्रमिक सामाजिक विमा योजना :** (१ जुलै २००१ कृषी मंत्रालय) ६० वर्षे पूर्ण कृषी मजुरांना सुविधा देणे.

**६३) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन अभियान :** (२००५-०६ राज्यांचा कृषी विभाग) विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्येचा प्रश्न हाताळण्यासाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ग्रस्त जिल्हे (अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा).

**६४) राष्ट्रीय फलोत्पादन अभियान :** (२००५-०६ केंद्रीय कृषी मंत्रालय) फलोत्पादन संस्थेला अनुदान राज्यातील २५ जिल्हे.

**६५) राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना :**(४ एप्रिल २००५ राज्य सरकार) सर्व गावे रस्त्याचे विद्युतीकरण BPL घटकाला अल्पदरात वीज कनेक्शन.

**६६) राजमाता जिजाऊ - बाल आरोग्य पोषण मोहिम :** (११ मार्च २००५ राज्य सरकार) ६ वर्षा खालील बालकांचे कुपोषण कमी करणे. गर्भवती स्त्रिया व ० ते२ वर्ष वयोगटातील बालके याचा लाभ घेऊ शकतात. मुख्यमंत्रीच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती.

**६७) राजीव गांधी ग्रामीण निवास योजना :** (नोव्हेंबर २००५) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा. SC/ST अपंग याचा लाभ घेऊ शकतात लाभार्थीचे आर्थिक उत्पन्न २०,००० (वार्षिक) असावे.

**६८) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन :** (एप्रिल २००५ केंद्र सरकार) ग्रामीण भागासाठी आहे. दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करने.

**६९) सुधारित माहेर योजना :** (२६ ऑक्टोंबर २००५ राज्यशासन) निराधार महिला पुनर्वसन करने हे उद्दिष्ट, १६ ते ६० वय असलेला निराधार महिला याचा लाभ घेऊ

शकतात. व्यावसायिक प्रशिक्षण, एक वर्षासाठी लाभार्थींना दरमहा २५० रु. देण्यात येतात.

**७०) शुभमंगल सामुहिक विवाह योजना :** (२००६ आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय) सामुहिक विवाहास निधी दिला जातो. वय वधू १८, वर २१ विवाह आयोजन वर्षातून २ वेळा.

**७१) जननी सुरक्षा योजना :** (डिसेंबर २००६ केंद्र सरकार) अनु. जाती व जमाती माता लाभ घेऊ शकतात. सिझेरियन शस्त्रक्रियेसाठी १५०० रु. धनादेश द्वारे.

**७२) प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना :** (२००६ केंद्र सरकार ची योजना) वैद्यकीय सेवेतील तफावत दूर करणे. शहरी, ग्रामीण जनता याचा लाभ घेऊ शकतात.

**७३) मनरेगा :** (२ फेब्रुवारी २००६ केंद्र सरकार पुरस्कृत) ग्रामीण भागा कडून शहराकडे होणारे स्थलांतरण रोखणे. ग्रामीण भागातील लोकांनी कोणती कामे करावयाची याचा अधिकार ग्रामसभेस आहे.

**७४) राजीव गांधी राष्ट्रीय बालसंगोपन (शिशुगृह) योजना :** (१ जानेवारी २००६ उच्च शिक्षण विभाग ) १२ हजार पेक्षा कमी उत्पन्न (मासिक) असणाऱ्या कुटुंबातील मुलांना डे केअर सेवा पुरविणे बालसंगोपन केंद्राला वार्षिक ४२३८४ इ. अर्थ सहाय्य दिला जातो.

**७५) Central Sector Scheme of Schoarship for College and University Students :**(२००७-२००८ उच्च शिक्षण विभाग) उच्च शिक्षणासाठी १८ ते २५ वयोगटातील कमी उत्पन्न कुटुंबातील विद्यार्थी यांना मदत प्रतिवर्ष ८२,००० नवीन शिष्यवृत्या.

**७६) सावित्रीबाई फुले कल्याण पारितोषिक योजना :** (१ एप्रिल २००७ राज्य शासन योजना) दारिद्र्य रेषेखालील जोडपे यांना कुटुंब नियंत्रण शस्त्रक्रिया योजनेसाठी जे कुटुंब नियोजन करून घेण्यास तयार असतात त्यांना.

**७७) आम आदमी विमा योजना :** (२ ऑक्टोंबर २००७ LIC) १८ ते ५९ वयोगटातील कुटुंब प्रमुख, अपघाती मृत्यू झाल्यास ७०,००० रु.

**७८) राष्ट्रीय आरोग्य विमा योजना :** (१ ऑक्टोंबर २००७ केंद्र सरकारचे श्रम व रोजगार मंत्रालय द्वारा) असंघटित क्षेत्रातील BPL कुटुंबातील कामगार लाभ घेऊ शकतात. स्मार्ट कार्ड वर आधारित कॅशलेस आरोग्य विमा योजना.

**७९) संजय गांधी निराधार अनुदान योजना :** (१ ऑगस्ट २००८ जिल्हाधिकारी कार्यालय) निराधार व्यक्ती अनाथ मुले अपंग इत्यादी लाभ घेऊ शकतात. कुटुंबातील १ लाभार्थी असल्यास ६०० रु.

**८०) प्रधानमंत्री रोजगार निर्मिती :** (३१ मार्च २००८ केंद्र स्तरावरील खादी ग्रामोद्योग) ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगार लोकांना रोजगार मिळवून देणे २०१०-११ मध्ये एकूण ३८९८ प्रकल्पांना ५५.३३ कोटी निधी उपलब्ध.

**८१) रमाई आवास योजना :** (१५ नोव्हें २००८ ग्रामीण व शहरी भागातील घरकुल योजना) अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाचे राहणीमान उंचावणे घर बांधणीसाठी लाभ ग्रामीण क्षेत्र ७० हजार, नफा -१.५० लाख, महानगरपालिका - २ लाख.

**८२) राष्ट्रीय कृषी विकास योजना :** (२००७ पासून १००% केंद्र सरकार पुरस्कृत) कृषी व संलग्न क्षेत्रातील विकास दर वाढवणे. या योजने अंतर्गत ९ विशेष उपाययोजना राबविल्या जात आहे.

**८३) राष्ट्रीय शाश्वत कृषी अभियान :** (२००८ कृषी व पणन विभाग) कृषी उत्पनाच्या वाढीवर भर, नवनवीन कृषी तंत्रज्ञाने अवलंबणे, शेती स्तरावर पाण्याचे नियोजन करणे.

**८४) धनलक्ष्मी योजना :** (३ मार्च २००८ केंद्र सरकार) मुख्य उद्देश्य बालिका जिवंत ठेवणे, ०७ राज्यांमध्ये कार्यान्वित आहे. बालिकेचे १८ वर्षापर्यंत विवाह न करणे.

**८५) तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम :** (जुलै २००७ महिला आर्थिक विकास महामंडळ पुरस्कृत) SC, ST, NT, OBC महिला बचत गट बळकटीकरण उपजीविका विकास महिला सक्षमीकरण व सामाजिक समानता वित्तीय पुरवणाऱ्या घटकावर भर देणे.

८६) **प्रारूप शाळा योजना :** (नोव्हें २००८ केंद्र राज्य सरकार संचालित) ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण देणे.

८७) **National means Cum Merit Scholor Ship Scheme :** (२००८-०९ केंद्र सरकार पुरस्कृत )वार्षिक उत्पन्न रु. १५००० /- पेक्षा कमी गटाला ही १,००,००० शिष्यवृत्ती, १ जानेवारी २०१३ पासून.

८८) **राजीव गांधी LPG वितरण राजीव गांधी ग्रामीण LPG वितरक योजना :** (१६ ऑक्टोंबर २००९ पेट्रोलियम मंत्रालय) ग्रामीण भागात LPG उपलब्ध करून देणे. LPG वरील सबसिडी आधारकार्ड माध्यमातून दिली जाईल. वितरक परवाना पति-पत्निच्या संयुक्त नावे.

८९) **राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान :** (२००९ HRD मंत्रालय) शैक्षणिक मागास ग्रामीण मुले-मुली यांना रहिवासापासून योग्य अंतरावर माध्यमिक शिक्षण पुरविणे.

९०) **साक्षर भारत अभियान :** (८ सप्टेंबर २००९ पंचायतराज संस्था संचालित) महिला साक्षरता १५ वयापेक्षा ज्यादा सर्व प्रौढ.

९१) **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना :** (२०१० ऑक्टोंबर) महिला व बाल विकास मंत्रालय.

९२) **एकात्मिक बाल संरक्षण योजना :** २००९-१० WCD मंत्रालय.

९३) **महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना :** (२६ जून २०१० सामाजिक विकास मंत्रालय) SC/नवबौद्ध यांना घरगुती नळ व शौचालयासाठी अनुदान. ९०% अनुदान राज्यशासन द्वारे.

९४) **पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम विकास योजना :** (२०१०-११ केंद्र शासन पुरस्कृत) ग्रामपंचायती साठी आहे. पर्यावरणीय संतुलन राखून गावाचा शाश्वत विकास करने.

९५) **यशवंतराव मुक्त वसाहत योजना :** (२०१२ कृषी मंत्रालय) विमुक्त जाती व भटक्या जमाती या लाभार्थी कुटुंबाचे राहणीमान उंचावणे.

९६) **पाळणाघर योजना :** (२ जाने. २०१२ जिल्हाधिकारी नियंत्रणात ग्रामपंचायत मार्फत) प्रतिबालक (० ते ३ वयोगट) प्रतिदिन ८ रु. तरतुद.

**९७) मनोधैर्य योजना :** (२ ऑक्टोबर २०१३ राज्यशासन कॅबिनेट नुसार) लैंगिक अत्याचार पीडित महिलाच्या पुनर्वसना साठी मदत.

**९८) नई रोशनी :** (२०१२-१३ NGO) अल्पसंख्यक महिला विकास, स्त्री शिक्षण.

**९९) सांसद/खासदार आदर्श ग्राम योजना :** (११ ऑक्टोंबर २०१४ केंद्र सरकार पुरस्कृत) मतदार संघातील ३ खेड्यातील पायाभूत सुविधांचा विकास करणे. ३ ते ५ हजार लोकसंख्येच्या ग्रामपंचायती निवड करणे.

**१००) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना :** (२१ नोव्हें. २०१३, महाराष्ट्र शासन नॅशनल इन्शुरन्स कंपनी) BPL, APL यांना वैद्यकीय सेवा पुरविणे.नवीन स्वरूपात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना म्हणून सुरू.

**१०१) राष्ट्रीय गोकुळ अभियान :** (२८ जुलै २०१४ केंद्रीय कृषी पशुसंवर्धन व दुग्धोत्पादन मंत्रालय) गायीच्या देशी वाणांचा वैज्ञानिक आणि केंद्रीय पद्धतीने संवर्धन व विकास याचा लाभ शेतकरी, गुरे पाळणारे घेऊ शकतात. १२ व्या पंचायत योजनेत ५०० कोटीची तरतुद.

**१०२) राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम :** (६ फेब्रुवारी २०१३ WCD मंत्रालय) शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी (० ते १८ वयोगट) १ एप्रिल २०१३ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यात स्वच्छता क्षेत्राचा सहभाग.

**१०३) जीवन अमृत योजना :** (२०१४ महाराष्ट्र शासन) दुर्गम भागात सर्जरी व वैद्यकीय क्रिया असणारे रूग्ण याचा लाभ घेऊ शकतात.

**१०४) सुकन्या :** (१ जाने. २०१४ महाराष्ट्र शासन) स्त्रीभ्रूण हत्या रोकणे. भाग्यश्री सुकन्य योजनेत रूपांतरित.

**१०५) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम :** (७ ऑक्टोंबर २०११ केंद्र सरकार पुरस्कृत) राज्यातील ग्रामीण व नागरी भाग येथील गरोदर मातेस आरोग्य सुविधा पुरविणे. मोफत प्रसूती, सिझेरियन, शस्त्रक्रिया.

**१०६) राजीव गांधी खेल अभियान :** (खेलो इंडिया) (२१ फेब्रुवारी २०१४ युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय) ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन, खेळ साहित्यांसाठी १५ लाख रुपये.

**१०७) दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना :** (२५ सप्टेंबर २०१४ केंद्र सरकार पुरस्कृत) १५ ते ३५ वयोगटातील ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कमीत-कमी १६० तासांचे प्रशिक्षण.

**१०८) शाळा अस्मिता योजना :** (२५ सप्टेंबर २०१४ मनुष्य बळ विकास मंत्रालय) १ ली ते १२ वी १५ लाख शाळा व २५ कोटी विद्यार्थी यांची माहिती ऑनलाईन डाटाबेस सिस्टीम द्वारे काढणे.

**१०९) प्रगती व सक्षम योजना :** (११ नोव्हेंबर २०१४ मनुष्यबळ विकास मंत्रालय) तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी मुलींना मदत, ६ लाख पेक्षा कमी उत्पन्न.

**११०) ज्ञानज्योत सावित्रीबाई फुले 'लेक शिकवा' अभियान :** (२०१४) शाळा बाह्य मुलींना शिक्षण प्रवाहात आणणे. दत्तक पालकत्व स्वीकारण्यावर भर देण्यात येणार.

**१११) बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना :** (२२ जानेवारी २०१५ ३ मंत्रालय आरोग्य, महिला बालविकास) देशातील १०० जिल्हे व महाराष्ट्रातील जिल्हे.

**११२) भाग्यश्री सुकन्या योजना :** (८ मार्च २०१५ महाराष्ट्र महिला व बालविकास खाते)लाभ राज्यातील मुलींना ज्यादा जन्मदर असणाऱ्या गावाला ५ लाख बक्षिस.

**११३) इंद्रधनुष्य अभियान :** (७ एप्रिल २०१६ केंद्र शासन पुरस्कृत) दोन वर्षाचे बालक, गरोदर माता लसीकरण राज्यातील ७ जिल्हे २०२० पर्यंत हे सार्वजनिक लसीकरण.

**११४) जन औषधी योजना :** (१ जुलै २०१५ भारतीय औषध विभाग ) रूग्णांसाठी ही योजना आहे. औषधाच्या वाढत्या किंमतीचा पेशंटला दिलासा देणे, सरकारी हॉस्पिटलमध्ये हा ब्रँड वापरणे सक्तीचे.

**११५) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना :** (ऑक्टो. २०१५ ग्राम विकास मंत्रालय) या योजनेचा उद्देश्य गांवे पक्क्या रस्त्याने जोडणे, ग्रामीण भागातील रस्ते बांधणे.

**११६) आमदार आदर्श गाव योजना :** (ऑगस्ट २०१५ ग्राम विकास विभाग) गावाचा सर्वसमावेशक विकास करणे, महाराष्ट्रातील गावे ग्रामपंचायती.

**११७) दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना :** (२०१५ केंद्रीय ऊर्जा मंत्रालय) याचा उद्देश्य ग्रामीण भागात सतत वीज पुरवठा करणे, प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वीजपुरवठा करणे.

**११८) प्रधानमंत्री कौशल्य विकास :** (२१ मार्च २०१५ राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ) प्रामाणीकरणास चालना देऊ. कौशल्य नोंदणी निर्माण करणे. १० वी व १२ मधून शाळा सोडलेले, प्रत्येक उमेद्वाराला ८०००/- प्रमाणे पुरस्कार.

**११९) निरांचल प्रकल्प :** (ऑक्टो. २०१५ जागतिक बँक व केंद्र सरकार) प्रत्येक शेतात पाणी हे उद्दीष्ट. देशातील ८ राज्याचा सुद्धा यात समावेश, जागतिक बँकेच्या सहकार्याने.

**१२०) मृदा आरोग्य कार्ड :** (१९ फेब्रुवारी २०१५ कृषि मंत्रालय) देशातील शेतकरी लाभ घेऊ शकतात. मृदा सुपीकता मोजण्याची समान मानके तयार करणे.

**१२१) परंपरागत कृषी विकास योजना :** (२०१५-२०१६ कृषी मंत्रालय) सेन्द्रीय शेती करण्यास प्रोत्साहन ३ वर्षात १०,०० गट तयार करून ५ लाख एकर शेती सेन्द्रीय करणे.

**१२२) प्रधानमंत्री कृषी सिंचन :** (२०१५-२०१६ केंद्र सरकार कृषी मंत्रालय) देशातील शेतकऱ्या साठी शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे.

**१२३) शाळा दर्पण योजना :** (७ जानेवारी २०१५ केंद्र सरकार) ग्रामपंचायती, नगरपालिका क्षेत्रातील शाळेतील  विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारणे. महाराष्ट्रात ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरू महाराष्ट्रात यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात राबविण्यात येणार आहे.

**१२४) स्मार्ट दलित गाव :** (२२ डिसेंबर २०१५ केंद्र सरकार) गावांत सुवर्ण दलित यांच्या सलोख्याचे वातावरण निर्माण करणे. याचा लाभ ज्या गावात सर्वाधिक लोकसंख्या

आहे ते घेऊ शकतात. गावाला पाणी, वीज, अभ्यासिका, समाज मंदिर, तंत्रज्ञान या सेवा उपलब्ध करून देणे.

**१२५) ग्राम उदय ते भारत उदय अभियान :**(१४ एप्रिल २०१६ केंद्रीय पंचायतराज मंत्रालय) सर्व ग्रामपंचायतां मध्ये सामाजिक एकोपा, वृद्धिंगत करणे, सर्व ग्रामपंचायती लाभ घेणे.

**१२६) प्रधानमंत्री उज्वला योजना :** (मार्च २०१६ पेट्रोलियम मंत्रालय) बी.पी.एल महिलेस गॅसचे मोफत कनेक्शन पुरविणे.

**१२७) वृक्षयुक्त महाराष्ट्र अभियान :** (१ जुलै २०१६ वन मंत्रालय) लोक सहभागातून १ कोटी वृक्ष लागवड

**१२८) शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्य योजना :** (५ जुलै २०१६ केंद्र शासन) शेतकऱ्यांना अल्प दराने कर्ज उपलब्ध करून देणे.

**१२९) वाश योजना :** (२०१५-२०१६ महाराष्ट्र शासन) आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य अबाधित ठेवणे या कार्यक्रमासाठी राज्यसरकारला युनिसेफचे सहकार्य.

**१३०) डिजिटल ग्राम योजना :** (मे २०१६ राज्यशासन) येत्या ३ वर्षात राज्यातील सर्व ग्राम पंचायतींना 'डिजीटल' करणे.

**१३१) मुख्यमंत्री फेलोशिप योजना :** (२० मे २०१६ राज्यसरकार पदावीधर तरूणांना) (२१ ते २५ वय) राज्याच्या प्रशासनाचा अनुभव यावा यासाठी त्यांना ११ महिने राज्याच्या प्रशासनात काम करण्याची संधी देणे.

**१३२) अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनाची शिष्यवृत्ती योजना :** (२०१६-१७ महाराष्ट्र शासन) पालकाचे उत्पन्न १ लाख पेक्षा जास्त नसावे एका कुटुंबातील २ विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ मिळू शकतो.

**१३३) सुवर्ण जयंती शिष्यवृत्ती योजना :** (२०१६-१७ LIC गोल्डन जुबली फाऊंडेशन) याचा लाभ मागास गटातील विद्यार्थी घेऊ शकतात. अर्जदार विद्यार्थ्यांचे पालकांचे

उत्पन्न १ लाख पेक्षा जास्त नसावे. (१०-१२ मध्ये) ६०% गुण आणावे मागास गटातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे.

**१३४) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान :** (४ नोव्हेंबर २०१६ केंद्र सरकार पुरस्कृत) माता व अर्भक मृत्यूदर कमी करणे म्हणून मोफत प्रसवपूर्व देखरेख सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ग्रामीण व शहरी गर्भवती स्त्रियांना.

**१३५) प्रधानमंत्री युवा योजना :** (९ नोव्हेंबर २०१६ केंद्र सरकार) येणाऱ्या ५ वर्षात ७ लाख विद्यार्थ्यांना उद्योजकता शिक्षण व प्रशिक्षण देणे, ग्रामीण व शहरी विद्यार्थी.

ग्रामसक्षमीकरण व्हावे या दृष्टिने केंद्र व राज्य सरकारने वरील प्रमाणे अनेक योजना अमलात आणल्या आहेत. या पैकी अभ्यासाच्या दृष्टीने जे उपयुक्त आहेत त्याचा समावेश करण्यात आला आहे. बाकी अनेक योजना आहेत पण त्या सर्वांचे वर्णन करने इथे अशक्य आहे. म्हणून 'ग्राम सक्षमीकरण' हे उद्दीष्ट दृष्टी समोर ठेवून वरील प्रकारे केंद्र व राज्य सरकारच्या योजना सांगण्यात आल्या आहेत. या सर्व योजनांचा लाभ गावातील, शहरातील लोकांनी, पुढाऱ्यांनी घेतला तर प्रत्येक गाव पूर्ण सक्षम झाल्या शिवाय राहणार नाही. आणि मग खऱ्या अर्थाने म्हणता येईल की 'गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास'.ग्रामसक्षमीकरणात 'झाडा' ग्रापंचायतची भूमिका कोणती याचे विवेचन पुढील प्रकरणात आहे.

# ग्रामसक्षमीकरणात 'झाडा' ग्राम पंचायतीची भूमिका

'झाडा' हे गाव धामणगाव रेल्वे स्टेशन पासून १५.०० किमी अंतरावर आहे. ह्या गावाची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार १८५४ होती व १९९१ च्या जनगणने नुसार १४९६ होती. २०११ च्या जनगणने नुसार १३६९ इतकी आहे. 'झाडा' हे गाव पंचायत समिती धामणगाव रेल्वेमधील अमरावती जिल्ह्यातआहे.

'झाडा' ग्राम पंचायतीची स्थापना १९४९ मध्ये झाली, या गावाला स्वतंत्र्य ग्राम पंचायत अस्तित्वात आलेली आहे. झाडा या गावाची निर्मिती ३७० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या हेमाडपंथीय शिवमंदिरा पासून क्रमशः  १६८० नंतर झाडा हे गाव अस्तित्वात आले असावे. वैराग्य मुर्ती श्री संत गाडगे बाबा व वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी अनेक वेळा या गावाला भेटी देवून या महापुरूषांच्या पदस्पर्शाने झाडा हे गाव पावन झाले.

'झाडा' या गावाचे क्षेत्रफळ १० हेक्टर २० आर एकुण व जमीनचे क्षेत्रफळ - (अ) एकूण जमीन -६६५.६२ हेक्टर (ब) लागवडी खालील जमीन - ५२८.७४ हेक्टर (क) पडित जमीन - ११८.०१ हेक्टर (ड)  पोट खराब जमीन - १८.७८ हेक्टर इतके आहे.

या गावात मुख्य पीक, कापूस, सोयाबीन, गहूँ, ज्वार, तुर होते. १९४९ पासून तर १९८९ पर्यंत हे गाव अविकसीत होते. कुठला ही विकास या गावाचा झाला नव्हता. १९८९ ला श्री. विजयराव नामदेवराव उगले सरपंच झालेत. यांची निवड अविरोध झाली. निवडणुकीच्या आधी गावात कॉलराची लागवण झाली. त्या पैकी ८० लोक वाचले ४ लोक मृत पावले. यानंतर निवडणुकीसाठी झाडा या गावाच्या देवळात लोकांची मिटिंग भरली. भलावी नावाची आदिवासी बाई त्यात उभी झाली व म्हणाली की पाण्यात ब्लिचिंग पावडर न टाकल्यामुळे माझा नवरा वारला बाकी ३ महिलापण उभ्या झाल्या व म्हणाल्या ग्राम पंचायतीच्या चुकीमुळे ४ लोक मृत्यू मुखी पावले, मग कशाला निवडणूक ? ग्राम पंचायत काय करते. श्री. विजयराव उगले यांनी पर्याय ठेवला की आपण मतदान घेऊन निवडणूक करू. त्या वेळेला श्री. विजयराव उगले खरीदी-विक्री संघाचे अध्यक्ष होते. या निवडणुकीत श्री. विजयराव उगले यांनी लोकांना एकच

आश्वासन दिले की दैनंदिन पाण्यात ब्लिचिंग पावडर टाकले जाईल आणि ९७% लोकांनी त्यांना मतदान केले व ते निवडून आलेत. त्यानंतर सरपंच म्हणून ही माझी निवड केली गेली. असे श्री. विजयराव उगले यांनी मुलाखात घेत असतांना  सांगितले. नंतर श्री विजयराव उगले यांनी झाडा गावाच्या विकासाचा ध्यास घेतला आणि संकल्प केला. (दि. १७-१०-२००१ रोजी)पुढे श्री. विजयराव उगले यांच्या लक्षात आले कि गावातील लोक कर भरत नाही, त्याकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधले. १००% कर वसूली सुरू केली. प्रथम गावातील महिलांनी आप-आपसात संघटन करून दारूबंदी करण्याचा प्रयत्न केला. नंतर रात्र शाळा (प्रौढ निरक्षर लोकांसाठी) व लोक अभियान, लोकशिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, गावातील युवकांचा शैक्षणिक दर्जा व मूलभूत प्रश्न, सोडविण्याचा प्रयत्न केला. सर्वात महत्वाचे गावाच्या विकासा करिता हे कि अंगनवाडी निर्माण करणे, आणि त्या माध्यमातून गर्भवती स्त्रियांची, मुलांची देखभाल करणे, प्रसूतीपूर्व व पश्चात माता नवजात बालके यांना प्राथमिक आरोग्य केंद्रच्या माध्यमातून आरोग्य विषयक शिक्षण देण्यासाठी परिसंवाद व चर्चा आयोजित करणे हे सुरू केले. नंतर हळू-हळू लसीकरण व गर्भवती महिलांची घ्यावयाची काळजी या पर्वाला सुरूवात झाली. गावात महिन्याच्या दुसऱ्या गुरूवारी प्राथमिक आरोग्य केंद्र चे डॉ. यायचे सरपंच व ग्रामपंचायतचे सदस्य त्यांन घरोघरी घेऊन जावायचे तर घरातील लोक समोरच्या पडवीत (बैठक) मुल असली तर ते मूल उचलून आत न्यायचे कारण गावात येवढी अंधश्रद्धा पसरली होती की त्यांना असे वाटत होते की अंगारे, धुपारे इत्यादी ने मुले चांगले होतात. १ वर्ष सुरूवातीला सरपंच श्री. विजयराव उगले व ग्रापंचायत सदस्ययांना फार त्रास झाला. पण विकासाचा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यांनी डॉक्टरांना सांगितले की, यांना दृश्य परिणाम दाखवा की, लस न दिल्यास बालकांना अपंगत्व येते आणि त्याचा परिणाम असा झाला, एक दोन महिन्यात लोक हळू-हळू लसीकरण करायला तयार झाले. नंतर तीसऱ्या वर्षी तर आई स्वतः मुलाला घेऊन यायची व सांगायची की मुला/मुलीला ही लस द्यावयाची आहे.

स्वच्छता अभियान अंतर्गत खासदार धंगारे यांनी प्रचार दरम्यान गावकरी लोकांना म्हटले होते की तुम्ही लोक मला मतदान करा मी जिंकून आलो तर तुमच्या गावाचा रोड बनवून देईल. आणि झाडा गावातील सर्व नागरिकांनी त्यांना आश्वासन दिल व ते विजयी झाले.

जिंकल्यानंतर २ महिन्याने गावात आले गावात लोकांना एकत्रित करून बैठक घेतली, आणि लोकांना म्हणाले की तुम्हाला दिलेल्या आश्वासना प्रमाणे मी विकास काम करायला फंड द्यायला तयार आहो, कोणते कार्य करावयाचे आहे ते सांगा? लोकांनी रोड, नाल्या सांगितल्या सरपंच श्री विजयराव उगले यांनी विचारले की तुम्ही किती फंड द्याल? ते म्हणाले की पूर्ण खडीकरण, माती, डांबरीकरण आणि साढे सात ते आठ लाख रु. खर्च बियाणसी ऑफीसने सांगितले आहेत. तेवढे मी देतो आणि त्यांनी १ रोड तयार करून दिला. त्या रोड ला त्यांचे नाव देण्यात आले आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर झाडा गावाच्या विकासाकरिता कम्युनिष्ट पक्षाचे खासदार भाई रामचंद्र धंगारे हे खाजदार निधी मधून साडेसात लक्ष्य रुपये देणारे पहिले लोकप्रतिनिधी ठरले. अशा प्रकारे विकास कामाला सुरुवात झाली. १९९०-९१ मध्ये फरस, व रोड बांधकाम केले. तसेच १९९१-९२ मध्ये फरस ४५ मी. ३६५ मी. नाली बांधकाम झाले. १९९२-९३ मध्ये बंधारा, नाली, रोड बांधण्यात आले. १९९३-९४, ९४-९५ यात ही रोड नाली तयार करण्यात आल्या. १९९५-९६ मध्ये शाळा ब्लॉक, १९९५-९६ नाली रपटा १९९६ मध्ये कोंडवाडा बांधण्यात आला. संपूर्ण बांधकाम जवाहर रोजगार योजने अंतर्गत करण्यात आले.

झाडा या गावाचे उत्पन्न वाढविण्यासाठी सरपंच विजयराव उगले यांनी उच्च न्यायालयाला अपील करून कोंडवाडचे दर वाढवून घेतले. अशा प्रकारे उच्च न्यायालयकडे विशेष मागणी करून झाडा या गावाचे उत्पन्न भरपूर वाढले. कोंढवाड्यात गाय आत गेल्या बरोबर ७१५ रु. मग रात्र भर कोंडवाड्यात गाय राहिल्या वर ३०० रु. असे दर रोज जुर्माना वाढत जाते. त्यामुळे या गावाला भरपूर उत्पन्न मिळाले व ८ दिवस जर जनावर कोणी घ्यायला नाही आले तर जनावर हर्रास केले जायचे. आजु-बाजुच्या गावातील लोक झाडा या गावात जनावर आणून कोंडवाड्यात टाकायचे. इथला कोंडवाडा धामणगाव रेल्वे तालुक्यात प्रसिद्ध होता, आहे.नंतर सरपंच श्री. विजयराव उगले यांनी गावाला आदर्श बनविण्यासाठी ध्यास घेतला केली.

दि. १२-०२-२००१ पासून स्वच्छता कार्यक्रमाला सुरूवात केली व गावातील जनावरांची पशु वैद्यकीय अधिकाऱ्या कडून आरोग्य तपासणी करून घेवून जनावरे धुण्यात येवून जनावरे स्वच्छता कार्यक्रम राबविला यात १७९ नागरिक सहभागी झाले.

दि. १३-२-२००१ गावातील शौचकुपाची सफाई व मुत्रीघर ची सफाई २२१ नागरिकांना घेऊन केली. दि. १४-२-२००१ ला २९६ नागरिकांना सोबत घेऊन गावातील प्रत्येक घराचे भिंतीवर राष्ट्रसंत/गाडगे बाबा/ महात्मा गांधी व इतर मान्यवरांचे सुविचार लिहिण्यात आले, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजना/आरोग्य शिक्षणावरील विचार, स्लोगन लिहुन गाव, शाळा इमारती, बोलक्या करण्यात आल्या. यामध्ये गावकरी महिला व विशेषतः युवकांचा सहकार्य लाभला, गावातील नाल्यांची साफ-सफाई करण्यात आली, तसेच गटारे शोषखड्डे साफ करण्यात आले व प्रत्येक घराची स्वच्छता (६-१०-२००१), सजावट, रांगोळी, घराला रांगोळी व रंगरंगोटी व परिसराची स्वच्छता प्रत्येक कुटुंबा द्वारे केली, पाण्याची शुद्धता, शाळेतील मुलांची, अंगणवाडी मधील लाभार्थ्यांची तसेच गावातील प्रत्येक नागरिकांची वैयक्तीक स्वच्छता करण्यात आली. १९-२-२००१ रोजी संपूर्ण गावकरी मंडळीनी (४७६ नागरिक) यांनी प्रभाग क्र. १ मधील इंदिरा आवास घरकुल वस्ती मध्ये नवीन नाल्या, रस्ता तयार करण्यात आले.

वैराग्य मुर्ती श्री संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान २००१, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता ग्राम स्पर्धा २००१-२००२, मध्ये भाग घेवून संपूर्ण ग्राम स्वच्छता करण्यात आली. व त्या सोबतच प्रत्येक कामाची नोंदवही तयार करण्यात आली. तसेच लोकांनी वर्गणी करून (१०%) जलकुंभ बांधले. पुरक नळ पाणी पुरवठा योजना ही अमलात आणल्या गेली. संपूर्ण गावाची आरोग्य तपासणी करण्यात आली. पाणी शुद्धीकरण करण्यात आले. दि. ३१-३-२००१ पर्यंत तसेच सुवर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत क्रांतीबा महात्मा ज्योतीबा फुले बाजार, ग्राम पंचायत झाडा रोड सह ३ बाजार ओटे, २ गार्डन, सुरक्षा भिंत, अंतर्गत रस्ते बांधण्यात आले. मुलभूत सुविधा योजने अंतर्गत १० दुकाने, बांधण्यात आली. श्रमदान व लोकवर्गणीतुन 'सावित्रीबाई फुले पसायदान माहिती मंडळ कार्यालय' बांधण्यात आले. जवाहर रोजगार योनने अंतर्गन(१९९५) शाळा ब्लॉक-२ बांधण्यात आले, (१९९६) ला कोंडवाडा बांधल्या गेला.१९८९ ते २००१ पर्यंत कृषी विषयक विविध योजनांचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला. तसेच जनावरांच्या रोगांवर प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या, पाणी अडवा पाणी जिरवा हे कार्यक्रम राबविले. दि. २-१०-२००० ते १७-१०-२०००/ दि.२-१०-२००१

ते दि.१७-१०-२००१ पर्यंत संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आले. यात राष्ट्रीय कार्यक्रम, राष्ट्रीय नेत्यांनी स्मृतीदिन (इयत्ता १ ते ७ वर्गातील मूलांनी) तसे विद्यार्थी सुरक्षा बीमा योजना, ४ अपंग विद्यार्थ्यांना सायकल वितरीत, शिष्यवृत्ती, विविध खेळ स्पर्धा, साक्षरता अभियान कार्यक्रम, शाळा स्वच्छता अभियान आठवड्याच्या दर शनिवारी.

केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत ३०२ शौचालये बांधण्यात आले, बालिका समृद्धी योजने अंतर्गत १०३ बालिकांना लाभ, २८ गर्भवती महिलांना प्रसूती कालीन अर्थ सहाय्य योजनेतून लाभ देण्यात आला. ३६ निराधार वृद्धांना इंदिरा गांधी वृद्ध पेन्शन योजना दिली, विधवा माता (५) संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला, समाजकल्याण व महिला बालकल्याण योजने अंतर्गत शैक्षणिक सवलत. १९९० ते २००१ मध्ये राबविण्यात आली, ३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन ७ जोडपे, दलित वस्ती सुधार योजना दलित वस्ती मध्ये राबविण्यात आली, समता सप्ताह दरवर्षी पाळला गेला. राज्यशासनाचे प्रथम पारितोषिक समता सप्ताह करिता मिळाले या नंतर झाडा या ग्राम पंचायतीने शासनाच्या विविधयोजना अमलात आणल्या त्या पुढीलप्रमाणे.-

- **एकात्मिक बालविकास योजना सन २०००-०१, २००१ ते २००२ :** पल्स् पोलिओ कार्यक्रम, नेत्रपेढी/नेत्रदान कार्यक्रम, १०० व्यक्तीने नेत्रदान संकल्प कार्ड भरले, रक्तगट तपासणी कार्यक्रम, संपूर्ण आरोग्य तपासणी, शाळेत ही सावित्रीबाई दत्तक पालक योजना, पुस्तकपेटी, शालेय पोषण आहार, वैयक्तिक परिसर स्वच्छता इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम दरवर्षी सर्वेक्षण करण्यात येत आहे. (१९९३-९४ ला ४ रूग्ण आढळले होते) एड्स नियंत्रण वर शिबिरे परिसंवाद फिल्म इत्यादी दाखविण्यात आली, राष्ट्रीय नारू निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय आयोडिन न्युनता कार्यक्रम, परिसर स्वच्छता व साथी रोग नियंत्रक कार्यक्रम, व्यसन मुक्ती कार्यक्रम, शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम.
- **राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम :** २१ जोडप्यांनी नियोजन केले त्या पैकी १ मुलावर नियोजन करणारी ३ जोडपी व १ मुलीवर नियोजन करणारी ५ जोडपी होती.

- **माता बाल संगोपन कार्यक्रम :** हा कार्यक्रम ग्रामपंचायत पसायदान ग्रामीण मंडळ, अंगणवाडी झाडा यांच्या संयुक्त प्रयत्नान माता बाल संगोपन कार्यक्रम राबविण्यात आला. या मध्ये वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य विषयक उपक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन, लसीकरण, वजन/श्रेणी, पोषण आहार, शारिरीक वैद्यकीय तपासणी इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले. २०००-०१ मध्ये १३३, लाभार्थी व २००१-२००२ १५६ लाभार्थी.

- **सार्वजनिक लसीकरण कार्यक्रम :** सन १९८९-२००१ या कालावधी मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र निंबोली यांचे कडून महिण्याच्या पहिल्या गुरूवारला लसीकरण करण्यात येत असे तसेच अतिरिक्त पल्स् पोलिओ मात्रा सन १९९५ पासून देण्यात येत आहे. १००% उपस्थिती होती.

- **राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम :** १९८९ पासून तर २००१ पर्यंत ४१९ रक्त नमुने घेण्यात आले. त्याचप्रमाणे सार्वजनिक फवारणी करण्यात आली.

- **राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम :** यात शारिरीक तपासणी करून जीवनसत्वाचे डोज व गोळ्या देण्यात आल्या. गर्भवती मातेची काळजी घेणे इत्यादी त्यामुळे तत्सम विकाराचे रूग्ण निरंक आहे. या शिवाय दरवर्षी डोळ्यांची तपासणी मोतीबिंदु/काचबिंदु, नंबरचे चष्मे देणे ही कामे, लॉयन्स क्लब, जैन असोसिएट, मैत्रहकल असोसिएशन, धामणगांव रेल्वे, यांचे मार्फत शल्य चिकित्सा विना मुल्य वर्षातून दोन वेळा करून दिल्या जात होती. प्रत्यक्ष ५४ रूग्णांनी लाभ घेतला.

- **राष्ट्रीय हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रम :** वेळोवेळी आरोग्य विभागाकडून चाचण्या घेण्यात आल्या. १९८९-२००१ एक ही रूग्ण आढळला नाही.

- **ग्रामीण भागातील महिला व बाल कल्याण विकास योजना :** एकूण महिला समुह गट यांनी (१) खडू बनविणे, (२) झाडू बनविणे,(३) संकरीत जनावरे कोणतेही कर्ज न घेता व्यवसाय सुरू केला होता. या मुळे दारिद्र रेषे खालील ३५ महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली होती.

- **जवाहर ग्राम समृद्धी योजना :** यात नाली बांधकाम, रोडचे बांधकाम, सामाजिक वनीकरण, शाळा बांधकाम, पुलाचे बांधकाम इत्यादी विकासात्मक कार्य केले गेले.
- **जवाहर रोजगार योजना २०% निधी :** ग्राम पंचायत कार्यालय/सभागृह बांधण्यात आले. २ लक्ष ९६ हजार रुपयाचे.
- **आश्वासित जवाहर रोजगार योजना :** (पंचायत स्तर) १५% मोठ्या आकाराचा आर.सी.सी. गटार १८५ मी. ८५,००० रुपये, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कोंडवाडा झाडा १,२०,००० रुपये.
- **इंदिरा आवास घरकुल योजना :** प्रती घरकुल ९००० रुपये असे एकूण २७ घरकुले, २८,५०० रुपये. प्रती घरकुल एकूण ४ घरकुले.
- **जीवनधारा विहिर योजना :**यात विहिर बांधन्यात आल्या.
- **राष्ट्रीय उर्जा विकास प्रात्याक्षिक कार्यक्रम :** यात ४ बायोगॅस सयंत्र १९९ निरधुर चुली, ३ सुर्यचुली, १३ सौरउर्जा ट्युबलाईट, ७२ प्रियाग्नी चुली, १२७ गृहलक्ष्मी, १७२ लोखंडी शेगड्या
- **दहणभुमी/दफणभुमी/खळवाडी :** दहणभुमी करीता शासनाने १.२१ आर जमीन उपलब्ध करून दिली, दफणभुमी  करीता शासनाने २.२० आर जमीन उपलब्ध करून दिली, खळवाडी करीता शासनाने ९५ आर जमीन उपलब्ध करून दिली. परंतु जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे ने निधी उपलब्ध करून दिला नाही. अशा विविध योजनां शिवायग्रामपंचायत झाडा येथील सरपंच सभासद, कर्मचारी द्वारे ग्रामपंचायत स्तरावर शासनाच्या विविध कल्याणकारी विकासात्मक योजना राबविल्या त्या खालील प्रमाणे :
- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा एकूण ८२ लोकांना विविध बाबींवर कर्ज व अनुदान देण्यात आले, त्यांनी परतफेड ही केले.
- **ट्रायसेम, ग्रामीण युवकांना स्वयंरोजगार प्रशिक्षण :** ९ दारिद्र रेषे खालील बेरोजगार युवकांना प्रशिक्षण दिले. त्यांनी संपूर्ण कर्जाची परतफेड केली.

- २६ लाभार्थींना इंदिरागांधी वृद्ध पेंशन योजनेचा लाभ दिला.
- ४ लाभार्थींना संजय गांधी योजनेचा लाभ घेतला.
- ११५ लाभार्थींनी ज्येष्ठ नागरिक योजनेचा लाभ घेतला.
- शासनाने झाडा हे गांव सन १९९४ मध्ये अल्पबचत ग्राम म्हणुन घोषित केले आहे.
- **साक्षरता अभियान :** एकूण निरक्षर १०९ होते हे सर्व साक्षर करण्यात आले. त्यात पुरुष ६३ स्त्रीया ४६ होत्या. या सर्व नागरिकांनी १९९९ मध्ये पंचायत समितीने आयोजित केलेल्या इयत्ता चौथीची परिक्षा दिली होती.
- गावाच्या रोडच्या दुतर्फा वृक्ष लागवड व संवर्धन करण्यात आले. तसेच ग्राम पंचायत व संस्था परिसरात वृक्षारोपन संवर्धन करण्यात आले.
- दारिद्र रेषे खालील कुटुंब सर्व्हेक्षण केले असता ४१७ एकूण कुटुंब आहेत त्या पैकी ३४९ कुटुंब हे दारिद्र रेषेखालील आहे. म्हणजे **९८% मागासवर्गीय** आहेत.
- लोकवर्गणीतून मस्झिद ट्रस्ट बी, देवळे, मजिद, बुद्धविहार, वाचनालय हे सर्व बांधले आहेत.

ग्रामपंचायत झाडाद्वारे १९९४-९५ ते २००१-२००२ पर्यंत असे विविध विकासात्मक कार्यक्रम राबविले. आणि विविध स्तरावरील प्रथम पारितोषिक प्राप्त केले. सरपंच श्री. विजयराव राऊत यांचे विकासात्मक कार्य पाहून पुढील ३ काळ म्हणजे १५ वर्षे त्यांची सरपंच म्हणून अविरोध निवड करण्यात आली. पुढे २००२-०३ पासून त्यांनी ग्राम पंचायत झाडासाठी अजुन विकासात्मक कार्य केले. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत परत ग्रामपंचायत झाडा ला प्रथम पारितोषिक मिळाला या काळात त्यांनी वरील विकासात्मक कार्यतर केलेच पण त्याच बरोबरच

- स्वर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजने अंतर्गत बिछायत केंद्राचे बांधकाम, पसायदान स्वयं सहाय्यता महिला बचत गट झाडा (संघटीका श्रीमती छाया दा. गोमासे) करण्यात आले, शौचालय, मुत्रीघर, स्नानगृह, स्टोअर्स रूम इत्यादी.

- २००३ यशवंत ग्राम समृद्धी योजना अंतर्गत सीमेंट कॉंक्रीटचे रोड बांधण्यात आले. त्यात ८,५०,००० अनुदान व १,५०,००० लोकवर्गणी केली.
- जिल्हा परिषद अमरावती सेस फंड अंतर्गत झाडा येथील एस.टी.बी.टी. रोड बांधण्यात आला.
- २००६ ते २०१० पर्यंत झाडा गावातील संपूर्ण नाली बांधकाम करण्यात आले.
- २००८ मध्ये यशवंत ग्राम समृद्धी योजना अंतर्गत कॉंक्रीट रोड ८,५०,००० अनुदान १,५०,००० लोकवर्गणी
- २००४-०५ पथदर्शी प्रकल्प जलकुंभ ७५ हजार लीटर, सोनोरा ते झाडा ५ कि. मी. पाईप लाईन.
- **२००६-२००७** वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान गावातील उद्योग

  (१) शेती प्रमुख पिके, व त्यासाठी पाणी व्यवस्था कोरडवाहू जमिनी साठी

  **(२) गृह उद्योग :** विविध बचत गटाच्या माध्यमातून

  **(३) दुकाने व व्यापार :** १९ दुकाने, व्यापारात पिठ गिरण्या २, कांडप केंद्र, बिछायत केंद्र, आठवडी बाजार दर गुरूवारी, दाल मिल, तिखट मसाले, हळद, शेवळी, पापड उद्योग, प्रिकास्टींग, दरवाजे, खिडक्या, पोल, शेळी पालन व्यवसाय, सायकल दुकाने २, भाजी केंद्र नळ कोळांडे व्यवस्था ४९, शोषखड्डे, स्थानिक कारागिरांनी युनिसेफच्या व जमानालाल बजाज फाऊंडेशन च्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली शोषखड्डे तयार केले.

ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत गावात गेल्या तीन वर्षात (२००६-२००७) एक ही फौजदारी गुन्हा घडला नाही, गुटखाबंदी व दारूबंदी केली आहे. शासनाने नेमुन दिलेल्या एकूण १७ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे व त्यात महिला व मागासवर्गीय निकषाप्रमाणे प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे.

मागासवर्गीयांसाठी गावात विविध योजना राबविण्यात आल्या, वर्षभर ग्राम सभा घेण्यात आली. १००% अतिक्रमण हटविण्यात आले. गावात सुवर्ण जयंती स्वयं रोजगार

योजना अंतर्गत एकूण ३० स्वयं सहाय्यता बचत गटची स्थापना करण्यात आली. २३० लोकांना रोजगार, नेत्रदान, रक्तदान, धान्यपेढी योजना राबविल्या गेली. सार्वजनिक, उपक्रम, सांस्कृतिक, सामाजिक कार्यात महिला युवक-युवती, विविध संस्था, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यात आला. महात्मा जलभुमि अभियानात बंधारे बांधलेली आहे. गाव समृद्धी योजनेतून वृक्षलागवड व ४१८ क्यु मिटर लांबीचे सिमेंट काँक्रीटचे कामे पूर्ण केले.

झाडा या गावात १००% कोरडवाहू शेती आहे. भविष्यात उर्ध्व वर्धा धरणातुन गावाच्या शेतीला पाणी उपलब्ध होणार आहे. पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन पिक नियोजन पद्धती बाबत ग्रामसभेने निर्णय घेवून शेतकऱ्यांची महात्मा फुले पाणी वापर पर्यावरण संस्था काढलेली आहे. प्रती व्यक्ती ४० लिटर पाणी उपलब्ध करून दिले गेले. पाण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत परीक्षण करून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुचनेनुसार कार्यवाही केल्या गेली. लिकेजेस् होणार नाही, याची दखल झाल्यास ग्राम पंचायती द्वारे त्वरीत दुरूस्ती, दैनंदिन पाण्याचे क्लोरीनेशन करणे, जलकुंभ महिन्याच्या ३० तारखेला साफ करणे इत्यादी पाण्याच्या शुद्धीकरणासाठी कार्य करण्यात आले. क्लोरीनेशन करतांना ग्राम पंचायत मध्ये ठेवलेल्या संबंधित नोंदवही वर उपस्थित नागरिकांच्या साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. १९८९ नंतर झाडा गावाला साथीचे रोग उद्‌भवले नाही. नळकोंडाळे मधील वाहणारे पाणी गुरांना पिण्यासाठी वापरले जाते. उर्वरित पाणी नाल्या द्वारे गावाच्या शेवटी असलेल्या सार्वजनिक शोषखड्यात सोडून जलपुनर्भरण केले, पाण्याचे स्त्रोत व पाईप लाईन गटारापासून ३ मिटर अंतरावर ठेवण्यात आल्या. घनकचरा सार्वजनिक ठिकाणी, सेंद्रीय खत तयार करण्या करिता वापरण्यात आला. वैयक्तिक घराचा कचरा सेंद्रीय खत तयार करण्याकरिता वापरण्यात आला. १००% प्लॅस्टिक बंदी घालण्यात आली, ग्राम सभेने हा निर्णया घेतला. ग्राम पंचायतने गांडुळ खत निर्मितीचा प्रकल्प उभारला, हागणदारी मुक्त गाव करण्यात आले. त्याबद्दल फलक लावण्यात आले. घर तेथे शौचालय अशी व्यवस्था करण्यात आली. यासाठी सरपंच श्री. विजयराव उगले व ग्रामपंचायतचे सदस्य यांना अथक परिश्रम करावे लागले. निर्मल गाव योजनेचा लोकांनी विरोध केला. १५% लोक गोदरीत जायचे योगायोगाने गावात बिबट्या आला १ माणूस व २ जनावरांना त्यानी मारले संध्याकाळी वनविभागाची आमसभा झाली आणि ते

सहज बोलले की निवांत ठिकाणी एकट्यात बसणाऱ्या व्यक्तीला बिबट्या पकडू शकतो. हा योगायोग होता त्या नंतर कोणीही बाहेर गेल नाही. लोक म्हणायचे मरायच आहे का आणि गाव १००% हागणदारी मुक्त झाला आणि निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाला. बायोगॅस संयत्र निर्माण केले, वृक्ष तोडणे बंद, करण्यात आले.

अशा प्रकारे श्री. विजयराव उगले सरपंच यांच्या १५ वर्षाच्या कालखंडात त्यांनी ग्राम पंचायतच्या माध्यमातून ग्रामसक्षमीकरणासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या व प्रथम पारितोषिक अनेक वेळा प्राप्त केले. त्याची यादी या लघुशोध प्रकल्पामध्ये जोडलेली आहे.

यानंतर सरपंच श्री विजयराव उगले म्हणाले की आता पर्यायी नेतृत्व तयार करा मी सरपंच राहणार नाही आणि त्यांनी सल्ला दिला की महिला कार्यकारिणीची निवड करू या. आपण सर्व गावकरी मंडळी यावर विचार करा, सर्व गावकरी मंडळीनी विचार करून निर्णय घेतला आणि सांगितले की तुमच्या घरच्या बाईंनाच सरपंचा करू या, म्हणजे सरपंच पद पुन्हा अप्रत्यक्ष पणे माझ्याचकडे आले. असे श्री. विजयराव उगले मुलाखत घेतांना म्हणाले. पुन्हा गावाच्या विकासासाठी आम्ही सर्वांनी महिलांची अविरोध निवड केली ग्राम सेवक पदी महिलाच होती व सौ. रेखाताई विजयराव उगले यांची अविरोध सरपंच पदी निवड करण्यात आली. या आदर्श ग्राम पंचायत ने सतत अविरोध सरस्यांची व सरपंचाची निवड करून एक अजुन आदर्श लोकांन समोर ठेवला.

आदर्श ग्राम पंचायत झाडा येथे सरपंचाची निवड केल्या नंतर एकतासाचा ध्वजारोहण चा कार्यक्रम होतो, यात ईश्वर चिठ्ठी ने लहान मुलगा एक चिठ्ठी काढतो ज्याचे नाव निघेल तो ध्वजारोहण करतो अशी पद्धती त्यांनी विकसित केली आहे. नंतर सौ. रेखाताई उगले यांच्या कारकिर्दीत परत विकासाचा ध्येय या गावाने घेतला आणि संपूर्ण योजना वरील प्रमाणे पुन्हा राबविण्यात आल्या. ग्रामपंचायत येथे रोज संध्याकाळी सामुदायिक प्रार्थना या गावात घेतली जाते. आज ही ती परंपरा सुरू आहे. सौ. रेखाताई उगले यांनी आपले पती श्री विजयराव उगले यांच्या पाऊला वर पाऊल ठेवून संपूर्ण झाडा गावाचा विकास केला व विविध पारितोषिके २००९-२०१० पर्यंत प्राप्त करून दिले. त्यांना संपूर्ण ग्राम पंचायत सदस्य, कर्मचारी व गावकरी

नागरिकांचे सहकार्य लाभले. अशा प्रकारे ग्राम सक्षमी करणात ग्रामपंचायत (झाडा) याची भूमिका महत्वपूर्ण दिसून येते.

त्या शिवाय मॉ जिजाऊ रंगमंच विचारपीठ ग्राम पंचायत झाडा येथे बांधण्यात आले. २००५-२००६ ला गप्पी मासे संवर्धन टँक जे की कुठल्या ही ग्राम पंचायत मध्ये दिसून येत नाही. गांडूळ खत प्रकल्प, दफनभूमीला वॉल कम्पाँड केल, कोंडवाडा करिता कुटी भंडार बांधण्यात आला.

सनियंत्रण समिती अंगणवाडी झाडा (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) या अंतर्गत हसत-खेळत, अनौपचारिक शिक्षण देण्यात आले. लहान मुलांचे वजन नियमित घेण्यात आले, लसीकरण गर्भवती स्त्री व लहान मुले, पोषण आहार संबंधी सुचना, कुपोषण मुक्त ग्राम अभियान २०११-२०१२ या कालावधीत राबविले गेले. (० ते ६ वयोगटातील मुले साधारण श्रेणीत आणणे) दिनांक १४ नोव्हेंबर २०११ राष्ट्रीय बालदिन पासून तर ७ एप्रिल २०१२ जागतिक आरोग्य दिनापर्यंत संपूर्ण वर्ष भर गर्भवती महिला बालक यांच्या आरोग्याची काळजी घेण्या करिता विविध कार्यक्रम, लसीकरण, पोषणयुक्त आहार, गोळ्या, वजन, त्यांना मार्गदर्शन, आरोग्य तपासणी प्रौढ सासु सासऱ्यांशी चर्चा अनिष्ट चालीरिती वर मार्गदर्शन इत्यादी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जागरूकता करून राजमात जिजाऊ, कुपोषण मुक्त ग्राम अभियान राबविण्यात आले. आणि प्रथम पारितोषिक प्राप्त केले. तसेच शाळा स्वच्छता अभियान ही येथे राबविण्यात आले व प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. समानता निर्माण करने, दलित वस्ती सुधार योजना इत्यादी विविध योजना राबविण्यात येऊन त्या कामाला पूर्णत्वास नेऊन प्रथम पुरस्कार सर्व गावकरी मंडळी व ग्राम पंचायत सदस्य ग्राम विकास अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रयत्नाने प्राप्त झाला.सौ. रेखाताई उगले यांनी सरपंच पदाचा कार्यकाल ५ वर्षे पाहिला, त्यानंतर ४ वर्षा पर्यंत श्री अतुल कोंबळे सरपंच होते, नंतर श्री. विलासराव भेले ने ५ महिने सरपंच पदाचे कार्य पाहिले, त्यानंतर श्री. कैलाश जयसिंगपुरे यांनी ५ महिने सरपंच पदाचे काम पाहिले. वर्तमान काळात १७-०५-२०१५ पासून सौ. शुभांगी गजानन चौधरी ह्या सरपंच पदावर आहेत. सन २०१५-१६ साली त्यांनी ग्रामपंचायतच्या सामान्य फंडातून ३% अपंगांना टीन वाटप केल्या (११ अपंगाना) तसेच २०१६-१७ या वर्षी अपंगांना १८ ते २० हजार

पर्यंत त्यांच्या इच्छेनुसान सामान देण्याचे ठरविले आहेत. पण श्री. विजयराव उगले व सौ. रेखाताई उगले यांनी गावाच्या विकासाचा जो ध्यास घेतला होता. तो नंतर दिसून येत नाही. त्यांच्या काळात तालुका, जिल्हा, राज्य स्तरीय, इत्यादी सर्व प्रकारचे पारितोषीक झाडा ग्राम पंचायतला मिळाले.

आदर्श यशवंत ग्राम झाडा संबंधी विस्तृत माहिती प्राप्त व्हावी, त्यांनी आदर्श ग्राम निर्माण करण्याकडे कशी वाटचाल केली, यात कोणा-कोणाचा सहभाग मिळाला, या संबंधी माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून गावकरी मंडळींची मुलाखत घेऊन प्राप्त करण्यात आली. त्यांच्याद्वारे व्यक्त विचारांना पुढील प्रकरणात प्रस्तुत केले आहेत.

# 'झाडा' ग्रामसक्षमीकरण कार्यात बचत गट व सहकारी संस्थाची भूमिका

भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश असून आज सुद्धा जवळपास ६७% लोक ग्रामीण भागात राहतात. आपली अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबून असून एकूण लोकसंख्ये पैकी ६८% लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. म्हणजेच शेती हा भारताचा आत्मा आहे. हजारो वर्षापासून शेती ने भारतात लोकांचे आचार-विचार दृष्टीकोण व संस्कृतीची जडण-घडण केली आहे. शेतीचे पंरपरागत उत्पादन तंत्र, पारंपारिक पीक पद्धत, प्रभावी विपणन संस्थेचा अभाव, अपुरा वीज पुरवठा, जलसिंचनाच्या अपूर्ण सोयी इत्यादीमुळे उत्पन्न कमी होते, त्यामुळे ग्रामीण भागाची परिस्थिती बिकट असून ग्रामीण भाग पूर्णपणे विकसित होऊ शकला नाही. आज खेडी स्वावलंबी बनविण्यासाठी नागरिकांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागली पाहिजे. त्यासाठी आज केंद्र सरकारच्या ग्रामीण रोजगारच्या विविध योजना अत्यंत उपयुक्त आहेत.

आधुनिक वैज्ञानिक युगात संपूर्ण जग जवळ आले आहेत. पण माणसाने अशी संस्कृती निर्माण केली की, शेजारी कोण राहते हे माहिती नाही त्यामुळे लोक एकमेका पासून दुरावले गेले आहेत. अशा समाजात बंधुभाव, एकता, सामाजिक मुल्ये दिसून येत नाही. म्हणून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्वयंशासन, परस्पर सहकार्य इत्यादी मुल्यांची जपवणूक करावयाची असेल तर छोट्या-छोट्या वसाहतींचे संघटन असणे आवश्यक आहे. यासाठी लोकांची इच्छा व सहभाग असल्या शिवाय तो यशस्वी व परिणामकारक होत नाही. व विकासाचे प्रयत्न अयशस्वी ठरतात.

ग्रामीण लोक संघटित होवून योग्य नेतृत्वाखाली, अर्थोत्पादनाचा आत्मविश्वास जागृत करतांना दिसतात. १९९१-९२ मध्ये नाबार्डने स्वयंसहाय्यता गटांच्या प्रतिमानांना वित्तीय क्षेत्रात कायदेशीर मान्यता देऊन स्वयंसहाय्यता गटाचे रूपांतर चळवळीत करण्यास प्रारंभ केला. या चळवळीचा धडा घेऊन पद्मश्री जया अरूणाचलम यांनी नाबार्डच्या माध्यमातून आंध्रप्रदेश, तामिळनाडू, अरूणाचलम येथे बचत गट सुरू केले. भारतात आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, केरळ या राज्याचे नामोल्लेख सतत केला जात आहे. परंतु महाराष्ट्रात १९४७ मध्ये अमरावती जिल्ह्यात स्वयंसहाय्यता बचत गट वेगळ्या स्वरुपात स्थापन झाल्याचा पुरावा

दाखल आहे. १९८८-९९ पासून प्रत्येक केंद्रीय अंदाज पत्रकात स्वयंसहाय्यता गटाबाबत तरतुदी केल्या आहेत.

महाराष्ट्रात मार्च २००५ अखेर स्वयंसहाय्यता गटाची बँक संलग्नता करण्यात आली. स्वयंसहाय्यता बचत गटाना बळकटी मिळावी म्हणून शासकीय धोरणात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी केली जात आहे.

- ❖ बचत गटांना बँकांकडून ७% व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- ❖ बँकांकडून कर्ज घेतांना स्टँम्प ड्यूटी रद्द करण्यात आली आहे.
- ❖ अंगणवाडी केंद्रांना खिचडी वाटप व शिजविण्याचे कार्य स्वयंसहाय्यता गटांना देण्यात येत आहे.
- ❖ स्वस्त धान्य दुकाने स्वयंसहाय्यता गटांना चालविण्यास दिली आहेत.
- ❖ स्वयंसहाय्यता गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना विक्री जागा, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती आवारे, ग्रामपंचायती आवारे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे परिसर, द्रुतगती मार्गावर थांब्यांच्या परिसरात जागा, नगरपालिका, महानगरपालिकांच्या हद्दितीलगावे, शालेय, महाविद्यालय या परिसरात जागा देण्याचे निर्णय घेतलेले आहेत.
- ❖ फळबाग विकास आणि वनौषधी विक्रीचा परवाना देण्यात आला आहे.
- ❖ राष्ट्रीय सहकार विकास निगमाच्या आर्थिक सहाय्याने निर्मिती झालेल्या सहकारी कुक्कुटपालन संस्थांचे मार्केटिंग व विक्री करण्याचे काम देण्यात येत आहे.
- ❖ निर्मल ग्राम योजनेतर्गंत गटांना शौचालय बांधण्यासाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येत आहे.
- ❖ बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने सावित्री क्रेडिट कार्ड देण्यात येत आहेत.
- ❖ गावोगावी गटांमार्फत वाचनालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- ❖ महिला स्वयंसहाय्यता गटांना विमा संरक्षण देण्यात येत आहे.
- ❖ शासना मार्फत स्वयंसहाय्यता गटांना विविध व्यवसायांचे मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

इत्यादी विविध धोरण शासनाद्वारे केले गेलेत. आदर्श यशवंत ग्राम पंचायत झाडा या गावाच्या विकासात, गांव सक्षमीकरण करण्यात बचत गटाचीही महत्वाची भूमिका दिसून येते. झाडा या गावात बचत गट ३३ येवढे निर्माण करण्यात आले होते. आणि या बचत गटांच्या माध्यमातून विविध उद्योगधंधे सुरू करण्यात आले आणि गाव सक्षमीकरणात महत्वाची भूमिका या विविध बचत गटांनी बजावली ते बचत गट पुढील प्रमाणे :-

**बचत गट :**

१. पसायदान स्वयंसहाय्यता महिला बचत गट यात १२ सदस्य आहेत. या बचत गटाद्वारे आवळा मुरब्बा, आवळा सुपारी, आवळा किस हे गृह उद्योग चालविले जायचे, प्रमुख उद्योग या गटाचे बिछायत केंद्राचे आहे, ते वर्तमान काळातही सुरू आहे.
२. सावित्रीबाई फुले स्वयंसहाय्यता बचत गट सदस्य सदस्यसंख्या - १२ या गटाद्वारे बटाटे वेफर्स, फराळी चिवडा, चिंचेचे लोणचे, प्रमुख उद्योग ॲग्रोबेस इन्डीस्ट्रीज.
३. अहिल्यादेवी होळकर स्वयंसहाय्यता बचत गट सदस्य संख्या - १२, या गटाद्वारे निंबू लोणचे व प्रमुख उद्योग दालमिल प्रक्रीया.
४. वै. मुर्ती संत गाडगे बाबा स्वयंसहाय्यता आदिवासी महिला बचत गट सदस्य संख्या - १२ - बीसी प्रक्रिया.
५. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वयंसहाय्यता पुरूष बचत गट सदस्य संख्या -११, या गटाद्वारे मसाला शेंगदाना, मसाला शेव, व प्रमुख उद्योग शेळी पालन.
६. श्री हरी स्वयंसहाय्यता पुरूष बचत गट सदस्य संख्या ११, या गटाद्वारे प्रिकॉस्टींग युनिट.
७. भगवान महावीर स्वामी स्वयंसहाय्यता युवा बचत गट सदस्य संख्या - ११.
८. छत्रपती शिवाजी महाराज स्वयंसहाय्यता युवक बचत गट सदस्य संख्या - १५, धान्यपेढी लघु उद्योग.
९. तथागत भगवान गौतम बुद्ध स्वयंसहाय्यता पुरूष बचत गट सदस्य संख्या - १३.
१०. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - ११.
११. मातोश्री रमाबाई आंबेडकर स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - ११.
१२. पूज्य साने गुरुजी स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १३.

१३. सदगुरु श्री संत लहानुजी महाराज स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १३.

१४. संतश्रेष्ठ गोरखा मेळा स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १३.

१५. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - ११, या गटाद्वारे हर्बल उटने, हर्बल शिकेकाई हा गृहद्योग चालविला जायचा.

१६. स्वामी विवेकानंद स्वयंसहाय्यता अपंग बचत गट सदस्य संख्या - ७.

१७. महात्मा कबीर स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १२.

१८. जगतगुरू श्री संत तुकाराम महाराज स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १२.

१९. महम्मद पॅगम्बर स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - ११.

२०. संत सावता माळी स्वयंसहाय्यता महिला बचत गट सदस्य संख्या - १२.

२१. भूमिपुत्र स्वयंसहाय्यता बचत गट मक्तानी शेती घ्यायचे आणि करावयाचे (ठेके).

या शिवाय १२ बचत गट अजुन होते. पण त्या संबंधी माहिती उपलब्धनसल्याने त्यांची नावे इथे सांगण्यात आली नाही. ज्या बचत गटाने गृह उद्योग चालविले नाही त्यांनी बीसी योजना चालविली. तसेच पसायदान बचत गट, अहिल्यादेवी बचत गट, सावित्रीबाई फुले बचत गट, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बचत गट, श्री हरी बचत गट, या पाच बचत गटांनी मिळून शेती घेतली. व उत्पन्नातून जो पैसा मिळतो ते आप-आपसात वाटून घेतात.

छत्रपती गटानी धान्यपेढी हा लघु उद्योग केला यासाठी कास्तकारांनी आपले शिल्लक धान्य आणून गोडाऊन मध्ये ठेवणे आणि ज्या व्यक्तीला अडचण भासेल तो व्यक्ती यातून धान्य घेईल व बँकेच्या व्याजाच्या हिशोबानी तो ते धान्य परत करी. उदा. ४ पायली धान्य नेल्यास परत करतांना तो ५ पायली धान्य देत होता.

अशा प्रकारे गावात सुवर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत एकूण ३० स्वयं सहाय्यता बचत गटाची स्थापना करण्यात आली होती. अन्य तीन बचत गटाची गट वेगळे. त्या माध्यमातून विविध गृह उद्योग चालविल्या जायचे. या योजनेमुळे एकूण २३० बेरोजगारांना रोजगार मिळाला व २०० कुटुंबे स्वयंपूर्ण झाली. वर्तमान काळात पसायदान महिला बचत गटाचे कार्य सुरू आहे. बाकी बचत गट संपुष्टात आले.

**सेवा सहकारी सोसायटी :**

'एकामेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' हा सहकाराच मुल मंत्र आहे. समान गरजा आणि समान हित असलेल्या समाजातील अनेक व्यक्ती एकत्रित येऊन एक संघटन तयार करतात त्याला सहकारी संस्था असे म्हणतात. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी विकासाचे अनन्य साधारण महत्व असून ग्रामीण भागातील ६८ टक्के जनता ही शेती व शेतीपुरक उद्योगाशी निगडीत आहे. तोट्यात चाललेला शेती व्यवसाय आणि कुटीर उद्योगाचा ऱ्हास यामुळे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस येऊन ग्रामीण जनता कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेली होती त्यांना उन्नतीचा मार्ग सहकार ने दाखविला. सहकारी चळवळीला अधिक गतिमान करण्याचे काम स्वातंत्र्य प्राप्ती नंतर झाले. महाराष्ट्रात १९६० पासून सहकारी चळवळ गावपातळीवर पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या चळवळीत राजर्षी शाहू महाराज, नामदार गोखले, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील व शरदचंद्र पवार या सारख्या कर्तृत्ववान नेतृत्वाचा मोठा वाटा आहे.

ग्रामीण कृषी क्षेत्रीय वित्तीय गरज पूर्ण करण्याकरीता सहकारी पतपुरवठा संस्थांचा महत्वाचा वाटा आहे. त्याचबरोबर सहकारी खरेदी-विक्री संस्थाचे योगदान ही महत्वपूर्ण मानता येईल. शेतकऱ्यांची सावकाराच्या हातातून सुटका करून देण्यासाठी या सहकारी संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची व्याप्ती बरीच मोठी आहे. महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रात आघाडीवर असलेले देशातील एक प्रमुख राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात विशेषतः ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला सहकारी चळवळीने मोठा हातभार लावला आहे. अगदी सुरूवातीला ही चळवळ कृषी पतपुरवठा क्षेत्रापुरतीच मर्यादीत होती परंतु पुढील काळात तिचा विविध क्षेत्रात विस्तार झालेला आहे.ग्रामसक्षमीकरणात या सहकारी चळवळीने महत्वाची भूमिका बजावली आहे. ग्रामीण परिवर्तनास मोठा हातभार लावला आहे.

'झाडा' या गावाच्या विकासामध्ये सेवा सहकारी सोसायटीचे मोठे योगदान आहे. प्राथमिक पतपुरवठा संस्था आणि शेती व्यवसायाला पतपुरवठा करणाऱ्या अन्य सहकारी संस्था यांनी शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी कमी व्याज दराने अल्प व दीर्घ मुदतीची कर्ज उपलब्ध करून दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचे सावकारावरील अवलंबून थोडे तरी कमी झाले. झाडा या

गावात सेवा सहकारी संस्था १९६० साली रजिस्टर झाली. याचे सभासद गावातील शेतकरी असतात आष्टा आणि झाडा गांव मिळून ही सेवा सहकारी सोसायटी आहेत. सुरूवातीला १० रु. शेअर्स व ०१ रु. प्रवेश फी अशी होती. मग ५० रु. प्रवेश फी केली, २०० सभासद होते.

या सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष मागील ४५ वर्षापासून श्री विजयराव उगले आहेत. वर्तमान काळात या सोसायटीचे २६५ सदस्य आहेत. शेतकरीला कर्ज वाटप या सोसायटीच्या माध्यमातून केले जाते. २०१४-२०१५ पर्यंत वार्षिक ९-१० लाख पर्यंत कर्ज वाटप केले. २०१६-२०१७ ला ३२ लक्ष्य कर्ज वाटप केले. असे सोसायटी च्या अध्यक्षांनी सांगितले परंतु त्यानंतर शेतीचे उत्पन्न कमी झाल्याने कमी कर्ज वाटण्यात आले. शेतकरी कर्ज माफी ची मागणी करीत आहेत. २००रु. शेअर्स हे जे जमा केले ते फीक्स डिपाजीट बँकेत केले त्यामुळे त्याचे जे व्याज प्राप्त झाले त्या व्याजात आम्ही २१ हजार चौ. फुट जागा घेतली व त्या जागेवर सोसायटीचे कार्यालय बांधले हे कार्यालय बांधण्यात श्री पाठक इंजिनियर होते त्यांनी १रु. न घेता काम केले. असे श्री विजयराव उगले (अध्यक्ष) यांनी सांगितले कार्यालय शिवाय दोन गोडाऊन पण त्या जागेवर बांधले. आज सोसायटी ची ७५ लाख एफ.डी. आहे. त्यामुळे आडिट वर्ग अ (A ग्रेड = समृद्ध) मध्ये ही सोसायटी येते. अ वर्ग मध्ये अमरावती जिल्ह्यात दोनच सोसायटी आहेत एक झाडा गावाची आणि दूसरी नेर पिंगळीची सोसायटी.

सेवा सहकारी सोसायटी च्या माध्यमातून सहकारी विपणनात शेतमालाची विक्री करतांना अनेक मध्यस्थांना टाळणे शक्य झाले. व सहकारी संस्थेच्या मदतीने शेतमाल जास्त काळापर्यंत साठवून ठेवता येतो. त्यामुळे योग्य भावाची शेतकऱ्याला हमी मिळते. कृषी उत्पादनाच्या विपणनात सहकारी संस्थंचे सुधारणा + बदल + विकास या त्रिसुत्रीचे योगदान महत्वाचे ठरते.

# प्रश्नावली, मुलाखती चे विश्लेषण

प्रस्तुत लघु शोध प्रबंधात उद्देश्यपूर्ण निदर्शन प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. या प्रणाली अंतर्गत प्रश्नावली पद्धतीद्वारा संशोधन कार्याला वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीचा आधार दिला आहे. 'झाडा' या गावातील ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरून (नमुना निवड पद्धतीचा वापर करून) त्यामध्ये काही स्त्री, पुरूष, ग्रामपंचायतीतील सर्व सदस्य, बचत गटचे प्रमुख, सेवा सहकारी संस्थांचे प्रमुख, काही तरूण मुले, मुली, नोकरी करणारे लोक असे एकूण ५० लोकांची प्रश्नावलीच्या माध्यमातून मुलाखत घेण्यात आली. त्या प्रश्नावलीच्या आधारावर अध्ययन करुन विश्लेषण करण्यात आले.

प्रस्तुत संशोधनाचा विषय 'ग्राम सक्षमीकरणात ग्रापंचायतीची भूमिका एक विश्लेषात्मक अध्ययन" (विशेष संदर्भ आदर्श गांव झाडा, ता. धामणगांव रेल्वे) हा आहे. झाडा ग्राम पंचायतद्वारा केलेले कार्य आणि त्याला "आदर्श यशवंत ग्राम" म्हणून जे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहे. त्यासाठी ग्रामस्थानी केलेले कार्य व योगदान याची माहिती सर्वांना मिळावी, अन्य गावातील ग्राम पंचायतीनी त्यातून प्रेरणा घ्यावी इत्यादी विविध उद्दिष्ट्ये समोर ठेवून ही प्रश्नावली तयार करण्यात आली. उत्तरदात्यांच्या या माहितीवरूनसंशोधकाला संशोधन विषयासंबंधी अनेक निष्कर्ष काढता येतात. प्रश्नावलीच्या माध्यमातून जेव्हा झाडा गावाच्या लोकांची मुलाखत घेण्यात आली तेव्हा प्रश्नांचे उत्तर देतांना त्याच्यात अत्यंत उसाह दिसून आला. संबंधित प्रश्नावलीत झाडा या गावाच्या विकासाला कशी सुरवात झाली तेव्हा पासून तर आदर्श याशवंत ग्रामचा व अन्य विविध पुरस्कार प्राप्त झाल्या नंतर पुढील वाटचाल कोणती ? इत्यादी विविध प्रश्न त्यांना विचारण्यात आले आणि त्यांनी दिलेल्या उत्तराच्या आधारावर पुढील प्रमाणे विश्लेषण करण्यातआले आहे. प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्न लोकांना विचारून त्या आधारावर लोकांचे मत घेऊन झाडा या ग्रामपंच्यायतीसंबंधी सम्पूर्ण विश्लेषण करण्यात आले आहे. सामाजिक अध्ययन करतांना त्या अध्येयन क्षेत्रात येणाऱ्या उत्तरदात्यांचे वय लक्षात घेणे आवश्यक आहे.कारण वयानुसार व्यक्तीच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेत परिपक्वता येत असते. बौद्धिक विकास घडून येतो, बौद्धिक विकासामुळे निर्णय निर्धारणात गती येवून त्याचा

फायदा ग्रामीण भागाच्या विकासासाठी होत असतो. नेतृत्व विकासात वयाला त्यामुळेच महत्वाचे स्थान आहे.

प्रश्नावली भरुन घेतांना उत्तर दात्यांना प्रश्न क्र. १ मध्ये नाव व पत्ता विचारला आणि प्रश्न क्र. १.२ मध्येत्याचे त्याचे वय विचारण्यात आले ते पुढील प्रमाणे तक्तात क्रमांक १.२ मध्ये विश्लेषण केले आहे.

**प्रश्न क्र. १.२** **सारणी क्रमांक १.२**


**उत्तरदात्यांचे वय दर्शक तक्ता**

| अ. क्र. | वयाची वर्गवारी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १८ ते ३० | १० | २०% |
| २ | ३० ते ५० | २५ | ५०% |
| ३ | ५० व त्याच्यावर | १५ | ३०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

(स्त्रोत : प्रश्नावलीच्या आधारे)

**आलेख क्रमांक १**

**उत्तरदात्यांचे वय दर्शक तक्त्याचा आलेख**



वरील सारणी क्रमांक १.२ मध्ये असे स्पष्ट होते की, झाडा या गावातील लोकांची प्रश्नावली भरुन घेतांना. १८-३० वयोगटातील तरूण लोक २०%, ३० ते ५० वयोगटातील ५०% लोक व ५० - व त्यापेक्षा वरील वयाचे लोक ३०% होते. ज्यांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले. प्रश्न विचारतांना त्यांच्यात प्रत्यक्षात येवढा उत्साह दिसून येत होता (वय ३० ते ५० ते त्यावरील) की, असे वाटत होते, प्रत्यक्षात आताच ते सर्व कार्ये करीत आहेत.

**प्रश्न क्र. १.३**


**सारणी क्रमांक १.३**

**शैक्षणिकस्तर**

| अ. क्र. | शिक्षण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | १० | २०% |
| २ | माध्यमिक | १७ | ३४% |
| ३ | उच्च माध्यमिक | १० | २०% |
| ४ | पदवीधर | १३ | २६% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

**आलेख क्रमांक २**

**उत्तरदात्यांच्या शैक्षणिक स्तराचा आलेख**



प्रस्तुत सारणी क्रमांक १.३ मध्ये प्राथमिक शिक्षाप्राप्त व्यक्ती २० % आहेत, माधमिक शिक्षण घेतलेले ३४% व्यक्ती आहेत, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले २०% आहेत आणि पदवीधर २६% आहेत. म्हणजे झाडा ग्राम पंचायत या क्षेत्रात शिक्षणाचे महत्व दिसून येते. म्हणून हे गांव १०० % साक्षर असलेले दिसून येते.


**प्रश्न क्र. १.४** **सारणी क्रमांक १.४**

**नोकरी व्यवसाय शिक्षण संबंधी**

| **अ. क्र.** | **कार्य** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | १२ | २४% |
| २ | शिक्षण | १० | २०% |
| ३ | शेती, व्यवसाय | २८ | ५६% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

**आलेख क्रमांक ३**

**नोकरी व्यवसाय शिक्षण संबंधीत आलेख**




कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास हा शिक्षणाप्रमाणे त्यांच्या व्यवसायावर सुद्धा निर्भर असते. व्यक्तिमत्व विकासातून व्यक्तिमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होत असते.

सामाजिक जाणीवेतून समाजाच्या समस्या व शासनाकडून होत असलेले प्रयत्न या संबंधीचे ज्ञान प्राप्त होत असते. म्हणजे राजकीयजागृकता हे व्यवसायावर सुद्धा निर्भर असते. वरील तक्ता क्रमांक १.४ मध्ये दिसून येते की, झाडा या छोट्याशा गावात नोकरी करणारे २४ %, शिक्षण घेणारे २० % व शेती आणि व्यवसाय करणारे ५६ % लोक यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**प्रश्न क्र. १.५** **सारणी क्रमांक १.५**

**कायम वास्तव**

| **अ. क्र.** | **वास्तव्य** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | बाहेरगावी | ९ | १८% |
| २ | झाडा | ४१ | ८२% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

सारणी क्रामांक १.५ मध्ये दिसून येते की, काही नोकरी, व्यवसाय करणारे १८ % लोक सध्या झाडा गावात कायम राहत नाही, तर १८% लोक झाडा या गावाला वास्तव्य करीत आहेत.

प्रश्न क्र. १.६ मातृभाषा, उत्तरदात्यांची मातृभाषा ही मराठी आहे (१००% लोकांची).

संशोधन कर्त्यांनी पुढील प्रश्न विचारला की ग्राम झाडा येथे ग्राम पंचायतची स्थापना झाली तेव्हा पासून गावाचया विकासाला सुरवात झाली का ?

**प्रश्न क्र. २** **सारणी क्रमांक २**

**गावाच्या विकासाची सुरवात**

| **अ. क्र.** | **विकल्प** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | हो | ०५ | १० % |
| २ | नाही | ४५ | ९० % |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना ९०% लोकांनी नाही असे उत्तर दिले म्हणजे स्थापने पासून झाडा या गावाचा विकास झाला नाही १०% लोकांनी हो असे उत्तर दिले. या नंतर संशोधकानी

पुढील प्रश्न केला की, ग्राम पंचायतमुळे तुमच्या गावाचा विकास झाला हे तुम्ही मान्य करता काय ?

**प्रश्न क्र. ३** **सारणी क्रमांक ३**

**ग्राम पंचायत मुळे गावाचा विकास झाला**

| **अ. क्र.** | **विकल्प** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | हो | ५० | १०० % |
| २ | नाही | - | - |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाच्या उत्तरात १००% लोकांनी सांगितले की ग्रामपंचायत मुळेच आमच्या गावाचा विकास झाला. गावाच्या विकासात ग्रामपंचायतचे फार मोठे योगदान आहे असे दिसून येते.

यानंतर पुठचा प्रश्न विचारण्यात आला की 'आदर्श ग्राम पुरस्कार'प्राप्त होण्याच्या आधी आपल्या गावची परिस्थिती काय होती ?

**प्रश्न क्र. ४** **सारणी क्रमांक ४**

**आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त होण्याच्या आधिची परिस्थिती**

| **अ. क्र.** | **विकल्प** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | अत्यंत बेकार | ४७ | ९४ % |
| २ | बरी होती | ०३ | ६% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नांचे उत्तर देतांना ९४% लोकांनी सागितले की, आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त होण्याच्या आधीची आमच्या गावाची परिस्थिती फारच वाईट होती रस्ते ,लाईट, नव्हते पाण्याची शुध्दता नाही फार बेकार परिस्थिती गावाची होती. ६% लोकांनी सांगितले की बरी होती, म्हणजेच झाडा या गावात आधी कोणती ही सुविधा नव्हती असे दिसून येते

पुढील प्रश्न संशोधकांनी विचारला की आपल्या गावाचा विकास व्हावा याचा ध्यास, पुढाकार कोणी घेतला.

**प्रश्न क्र. ५** **सारणी क्रमांक ५**

**गावाच्या विकासाचा ध्यास कोणी घेतला**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ध्यास कोणी घेतला | ५०<br>विजयराव उगले | १०० % |
| २ | -- | - | - |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना १००% लोकांनी एकमताने सांगितले की, गावाच्या विकासाचा ध्यास, पुढाकार सर्व प्रथम विजयराव उगले यांनी घेतला. आपल्या नेतृत्वशैली, व कार्यकरण्याची लालसा यामुळे त्यांनी विकासासाठी पुढाकार घेतला असे लोकांनी सागितले

पुढील प्रश्न संशोधकानी विचारले की, गावाच्या विकासाची खरी सुरवात झाली त्या वेळी सरपंच कोण होते ? आणि त्यांनी लोकांना कसे तयार केले.

**प्रश्न क्र. ६** **सारणी क्रमांक ६**

**सरपंच कोण आणि त्यांनी लोकांना कसे तयार केले.**

| अ. क्र. | विकल्प | सरपंच | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | लोकांचे मानसिक परिवर्तन केले व विकासाचे महत्व पटवून दिले | श्री. विजयराव उगले | ४५ | ९० % |
| २ | आधीपासून विकासाला सुरवात झाली | श्री. विजयराव सरपंच होण्याआधी | ०५ | १०% |
| **एकूण** | | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना ९०% लोकांनी सांगितले की, श्री. विजयराव उगले जेव्हा सरपंच झाले तेव्हा पासून म्हणजे (सन १९८९) पासून विकासाची खरी सुरवात झाली. त्यांनी गावाच्या लोकांना एकत्रित करुन, विकासासाठी उद्‌बोधन करुन त्याचें मानसिक परिवर्तन केले. लोकांना विकासाचे महत्व पटवून सांगितले, तर त्या विरुद्ध १०% लोकांनी संगितले की, श्री विजयराव उगले सरपंच व्हायच्या आधी गावाच्या विकासाला सुरवात झाली होती.

ग्रमीण विकास चांगल्याप्रकारे करावयाचा असेल तर उत्कृष्ट व राजकीय, सामाजिक अनुभव असणाऱ्या व्यक्तीला निवडून देणे आवश्यक आहे, कारण हा अनुभव जनतेच्या विकासासाठी अत्यंत महत्वाचा असतो आणि वरील तक्ता क्रमांक - ६ मध्ये राजकीय अनुभवाने कसा विकास होतो हे दखविण्यात आले आहे.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आला की, गावाच्या विकासासाठी सर्व नागरिकांनी सहयोग दिला का ? की कोणी विरोध ही केला.

**प्रश्न क्र. ७** **सारणी क्रमांक ७**

**गावाच्या विकासासाठी सर्व नागरिकांचा सहयोग**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावाच्या विकासासाठी सर्वांचा सहयोग मिळाला. | ४५ | ९० % |
| २ | विरोध | ०५ | १०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक - ७ मध्ये दिसून येते की, झाडा गावाच्या विकासासाठी ९०% लोकांनी सांगितले की, सर्वांचा सहयोग मिळाला, काही विरोधक प्रत्येक ठिकाणीच असतात तसेच गावात ही होते. पण ते अत्यंत कमी होते १०% लोकांनी विरोध केला हे वरील तक्त्यात दिसून येते. अन्यथा सर्व ग्रामस्थांनी विकासासाठी सहकार्यच केले.

पुढील प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला की, विकासाची सर्वप्रथम सुरवात कोणत्या कामाने झाली ?

**प्रश्न क्र. ८** **सारणी क्रमांक ८**

**विकासाला सर्वप्रथम सुरवात कोणत्या कामाने झाली**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावाची स्वच्छता, नाल्यांची साफ-सफाई, रस्ते खडीकरण इत्यादी कामाने | ४५ | ९० % |
| २ | -- | ०५ | १०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील तक्त्यात दिसून येते की, ९० % लोकांनी या प्रश्नाचे उत्तर देतांना सांगितले की, सर्वप्रथम विकासाच्या कामाची सुरवात गावाच्या स्वच्छता मोहिमेने झाली. नाल्यांची साफ सफाई, गावाची साफ सफाई रस्ते खडीकरण इत्यादी हे कार्य लोकांनी मिळून केले. आणि गावाची सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

संशोधकाद्वारे पुढील प्रश्न विचारण्यात आला की, श्रमदानाद्वारे गावाचा कोणता विकास केला ?

**प्रश्न क्र. ९** **सारणी क्रमांक ९**

**श्रमदानाद्वारे गावाचा कोणता विकास**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दारुबंदी, वृक्षलागवड साफ सफाई, रस्ते तयार करणे इत्यादी | ४७ | ९४ % |
| २ | -- | ०३ | ०६% |
| एकूण | | ५० | १००% |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना ९४ % लोकांनी (तक्ता क्र. ९) मध्ये दाखविल्या प्रमाणे सांगितले की, गावातील प्रत्येक कुटूंबातील १ व्यक्ती महिन्यातुन १ दिवस, ग्रामपंचायतने ग्रामसभेत निश्चित केलेल्या कामावर श्रमदान करतील. ही प्रक्रीया सन १९८९ पासून सतत सुरू होती. या शिवाय सामुहीक श्रमदान ग्राम पंचायत वेळोवेळी आयोजीत करवयाची त्यामध्ये नागरीक, विद्यार्थी, युवक, महिला व कर्मचारी यांचा सहभाग असायचा, यातूनच गावाची साफ - सफाई, रस्ता - निर्माण, सोबतच, दारुबंदी यासाठी महिलांनी पुढाकार घेतला. वृक्ष लागवड, गावात ट्युबलाईट लावण्यात आले इत्यादी विविध विकासात्मक कामे श्रमदानातून झाले.या विरुद्ध ६ % लोक काहीच बोलत नाही.

पुढील प्रश्न ग्रामस्थांना विचारला की, विकास कामाकरिता पंचायत समिती, विधीमंडळ, लोकसभा या क्षेत्रामध्ये कामकरणाऱ्या लोकप्रतिनिधींचा सहभाग मिळाला का ? आणि हो तर कश्या प्रकारे.


**प्रश्न क्र. १०** **सारणी क्रमांक १०**

**लोकप्रतिनिधींच्या सहभागा बाबत**

| **अ. क्र.** | **लोकप्रतिनिधी** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | आमदार, त्या त्या काळातील खासदार पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांनी शासकीय योजनांच्या मध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला | ३७ | ७४ % |
| २ | लोकांना माहित नाही | १३ | २६% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

**आलेख क्रमांक ४**

**लोकप्रतिनिधींच्या सहभागा बाबतचा आलेख**




वरील प्रश्नांचे उत्तर देतांना ७४ % ग्रामस्थांनी सांगितले की, त्या काळातील, खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष व सदस्य, पंचायत समिती सदस्य यांनी शासकीय

योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला व त्या माध्यमातून, शाळेचे बांधकाम, कंपाऊंड, रस्ते बाधकाम, नाली बांधकाम, घरकूल योजना, अंगणवाडीच्या माध्यमातून विविध कार्ये करण्यासाठी निधी या लोकप्रतिनिधीद्वारे देण्यात आले. २६ % लोकांनी माहिती नाही असे उत्तर दिले. या वरुन दिसून येते की, लोक प्रतिनिधींचा गावाच्या विकासामध्ये मोठे योगदान असते. सर्व लोकप्रतिनिधींनी गाव सक्षमीकरणासाठी शासकीय योजनांचा लाभ गावा-गावा पर्यंत मिळवून द्यावा अशी अपेक्षा त्यांच्याकडून आहे.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आला की, आपल्या गावात बचत गट किती कार्यरत आहेत? व त्या माध्यमातून किती लोकांना रोजगार प्राप्त झाला.

**प्रश्न क्र. ११** **सारणी क्रमांक ११**

**बचत गटाची संख्या व त्यामध्यमातून प्राप्त रोजगार**

| **अ. क्र.** | **बचत गट संख्या व प्राप्त रोजगार** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | आधी २००९-१० पर्यंत ३३ वचत गट कार्यरत होते. यात ३० लोकांना रोजगार प्राप्त झाला. वर्तमानामध्ये एकच बचत गट कार्यरत आहे. पसायदान स्वयंसहायता महिला बचत गट तया माध्यमातून २३० लोकांना रोजगार प्राप्त झाले होते. | ५० | १०० % |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना १०० % गावकऱ्यांनी सांगितले की, आमच्या गावात आधी ३३ वचत गट कार्यरत होते. आणि या बचत गटाच्या माध्यमातून विविध गृह उद्योग जसे बटाटे वेफर्स, सुपारी, पापड, लोणचे, धान्यपेढी, दालमील, कांडण यंत्र इत्यादी विविध गृह उद्योग चालविल्या गेले व बचत गटांच्या माध्यमातून २३० बेरोजगारांना रोजगार प्राप्त झाला होता व २०० कुटूंब या योजने मुळे स्वयंपूर्ण झाले होती. पण ३३ बचत गटांपैकी वर्तमानामध्ये एकच बचतगट कार्यरत आहे. तो म्हणजे पसायदारन स्वयंसहायता महिला बचत गट कोणते ही कार्य

करीत असतांना सातत्य असणे आवश्यक आहे. आज या गावात एकच बचतगट कार्यरत असणे म्हणजे लोक निष्क्रिय झाल्याचे दिसून येते.

पुढील प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला की, आपल गाव १०० टक्के साक्षर झाल आहे का ?

**प्रश्न क्र. १२** **सारणी क्रमांक १२**

**झाडा गाव १००% साक्षर झाले का ?**

| **अ. क्र.** | **विकल्प** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | हो | ५० | १०० % |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

सारणी क्र. १२ मध्ये दिसून येते की, झाडा हे गाव १०० % साक्षर आहे आणि प्रौढ व निरंतर शिक्षणाच्या माध्यमातून ते साक्षर करण्यात आले होते. संशोधकाद्वारे

पुढील प्रश्न विचारण्यात आला की, शैक्षणिक दृष्ट्या आपल्या गावाची मोठी उपलब्धी कोणती.

**प्रश्न क्र. १३** **सारणी क्रमांक १३**

**शैक्षणिक दृष्ट्या मोठी उपलब्धी**

| **अ. क्र.** | **शैक्षणिक मोठी उपलब्धी** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रपतीद्वारे आदर्श शिक्षक पुरस्कार आणि विभागीय स्तरावरील पुरस्कार मराठी व सेमी इंग्रजी शाळा १ ते ८ | ३५ | ७० % |
| २ | -- | १५ | ३०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नांचे उत्तर देतांना ७० % ग्रामस्थ म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात मोठी उपलब्धी हे की, मुख्याध्यापक श्री. सुनील विनायकराव रोंघे यांना आदर्श शिक्षकाचा पुरस्कार प्राप्त झाला राष्ट्रपती यांच्या द्वारे त्यांना सन्मानित करण्यात आले. विभागीय स्तरावर सावित्रीबाई फुले शैक्षणिक ५१ हजारचा पुरस्कार आदर्श यशवंत ग्राम झाडाच्या शाळेला प्राप्त झाला. आमच्या शाळेतून नवोदय विद्यालयामध्ये अनेक विद्यार्थी शिकायला गेले. मराठी व सेमी इंग्रजी वर्ग १ ते ८ सुरू आहे. शाळा डिजीटल झालेली आहे. जुन्या इमारतीचे नुतनीकरण करण्यात आले. अमरावती जिल्ह्यातील पहिली डबल मजली (२००२ ते २००७ या काळात) इमारत झाली. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आली होती. वर्तमान काळातही झाडा या गावाच्या शाळेला भेट दिली असता असे दिसून आले की, शाळा विकासाकडे अग्रेसर आहे. ३० % लोकांनी काहीच उत्तर दिले नाही.

पुढील प्रश्न विचारण्यात आला क, अरोग्याच्या दृष्टीने प्राथमिक उपचार पद्धती गावात उपलब्ध आहे का ?

**प्रश्न क्र. १४** **सारणी क्रमांक १४**

**प्राथमिक उपचार पद्धती गावात उपलब्ध आहे का?**

| अ. क्र. | प्राथमिक उपचार पद्धती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही प्राथमिक आरोग्य केंद्र गावात असावे, गावात आशा वर्कर आंगणवाडी सेविका आहे. आठवड्यातून एक दिवस डॉक्टर येतात. | ४५ | ९० % |
| २ | -- | ०५ | १०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील तक्ता क्र. १४ मध्ये दिसून येते की, ९० % लोकांनी या प्रश्नाचे उत्तर नाही असे दिले. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र गावात असावे अशी आमची इच्छा आहे. त्या दिशेनी आम्ही प्रयत्न करीत आहोत, जेणेकरुन ग्रामवासियांना आरोग्य विषयक सोयी वेळेवर उपलबध होईल,

पुढे ते म्हणाले की, वेळो वेळी लसीकरणाला आठवड्यातून एक दिवस जवळच्या गावातून डॉक्टर येतात. तसेच गावात, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. १०% लोकांनी आपले मत प्रकट केले नाही. आरोग्याच्या दृष्टीने एक उपकेंद्र प्रत्येक छोट्या गावात असायला पाहिजे असे यातून दिसून येते, जेणे करुन गावांतील लोकांना प्राथमिक उपचार प्राप्त होऊ शकेल.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आला की, महिला सक्षमीकरणात ग्राम पंचायतची भूमिका कोणती ?

**प्रश्न क्र. १५** **सारणी क्रमांक १५**

**महिला सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका**

| **अ. क्र.** | **ग्राम पंचायतची भूमिका** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | सन २००५ - ०६ ते २००९ - १० पर्यंत ग्राम पंचायतचे सर्व सभासद महिलाच होत्या. (उपसरपंच वगळून) सरपंच सौ. रेखा विजयराव उगले ग्राम सचिव कु. वैजयंती ध. चव्हाण या शिवाय महिला बचत गट/ गृह उद्योग सुरू केले होते. | ३८ | ७६ % |
| २ | -- | १२ | २४% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उततर देतांना ७६ % ग्रामवासियांनी सांगितले की, महिला सक्षमीकरणसाठी ग्राम पंचायतीची महत्वपूर्ण भूमिका आहे. सन २००५ - २००६ ते २००९ - २०१० पर्यंत ग्राम पंचायतीचे सर्व सभासद (उपसरपंच वगळून) सर्व सभासद ह्या महिला होत्या सरपंच सौ. रेखा विजयराव उगले या होत्या आणि ग्रामसचिव पदावर कु. वैजयती धनसिंग चव्हाण ह्या होत्या. इतर सभासद महिलाच होत्या. त्यांचा कार्यकालात झाडा या ग्रामपंचयातीला बहुसंख्य पारितोषीक प्राप्त झाले. या शिवाय स्वयसहायता महिला बचत गटाच्या माध्यमातून

महिलांचे गृह उद्योग सुरू करुन त्यांचे सक्षमीकरण करण्यात आले. आणि गावाच्या विकासात सर्व महिला व पुरूषांचा सहभाग लाभला. २४% लोकांनी काहीच उत्तर दिले नाही.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आल की, आपले गाव हागणदारी मुकत गाव झाले का ?

**प्रश्न क्र. १६** **सारणी क्रमांक १६**

**झाडा गाव हागणदारी मुक्त झाले का ?**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हो | ५० | १०० % |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

या प्रश्नाचे उत्तर १०० % लोकांची हो असे दिले की, २००९-१० पर्यंत आमचे गाव १०० % टक्के हागणदारी मुक्त झाले. पुढे ते म्हणाले की, लोकांची मानसिकता बदलण्यासाठी खुब प्रयत्न करावे लागले. त्यासाठी उद्‌बोधन वर्ग - दृश्य माध्यमे इत्यादीद्वारे लोकांची मानसिकता बदलावी लागली. नंतर योगागोगानी गावात विबट्या आला त्यांनी माणस व २ जनावर मेली, फॉरेस्टच्या लोकांनी बोलतांना सहज सांगितले की, निवांत ठिाणी एकट्या बसल्यावर व्यक्तीला बिबट्या पकडू शकतो. त्यानंतर कोणी ही बाहेर गेले नाही आणि गाव १०० % हागणदारी मुकत झाले. लोकांना विचारले की, बाहेर का जात नाही तर म्हणाले आम्हाला मरावयाचे आहे का? भीतीमुळे गाव त्या वेळी हागणदारी मुक्त झाले. पण पुढे हे सातत्य कायम राहिले नाही.

पुढचा प्रश्न विचारण्यात आला की, आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर आता पुढील वाटचालकोणती ?


**प्रश्न क्र. १७** **सारणी क्रमांक १७**

**पुढील वाटचाल कोणती**

| अ. क्र. | पुढील वाटचाल कोणती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य उपकेंद्र | २५ | ५०% |
| २ | तरुण तडफदार युवा नेतृत्व तयार करणे | १२ | २४% |
| ३ | पुन्हा गावाच्या सर्वांगीण विकास करणे | १३ | २६% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

**आलेख क्रमांक ५**

**पुढील वाटचाल कोणती ते दर्शविणारा आलेख**




सारणी क्र. १७ मध्ये दिसून येते की, ५०% लोकांनी मत प्रकट केले की, आमच्या गावात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र निर्माण व्हायला पाहिजे त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहेत. २५% लोकांनी सांगितले की, तरूण तडफदार युवा नेतृत्व तयार करावयाचे आहेत आणि २५% लोकांनी मत व्यक्त केले की, पुन्हा गावाचा सर्वांगीण विकासा व्हावा या करिता वाटचाल करणे.

पुढील प्रशन विचारण्यात आला क, गावाच्या विकासाच्या कालखंडात लोक प्रतिनिधी कोण कोण होते ?

**प्रश्न क्र. १८** **सारणी क्रमांक १८**

**गावाच्या विकासाच्या कालखंडात लोकप्रतिनिधी**

| **अ. क्र.** | **लोकप्रतिनिधींची नावे** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | खासदार श्री. रामचंद्रजी धंगारे, आमदार श्री. अरूणभाऊ अडसड, श्री. रामदासजी निस्ताने, आमदार विरेंद्रजी जगताप, सरपंच विजराव उगले, सौ. रेखाताई उगले इत्यादी | ५० | १००% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना १०० % लोकांनी सांगितले की, त्या-त्या वेळी जे खासदार आमदार होते त्यांनी गावाच्या विकासाला शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत केली ते म्हणजे खासदार श्री. रामचंद्र धंगारे, आमदार श्री. अरूण भाऊ अडसड, श्री. रामदासजी निस्ताने (जिल्हा परिषद सदस्य, शिक्षण व बांधकाम सभापती) आमदार विरेंद्रभाऊ जगताप, सरपंच श्री. विजयराव उगले, सौ रेखाताई विजयराव उगले इत्यादी लोक प्रतिनिधी होते व या सर्वांच्या सहकार्यामुळे 'झाडा' या गावाचे सक्षमीकरण झाले.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आले की, आदर्श ग्राम झाडा च्या विकासामध्ये आपले सहाकार्य कोणते ? (अ) वैचारिक दृष्ट्या (ब) आर्थिक दृष्ट्या इत्यादी मदत कार्य.

**प्रश्न क्र. १९** **सारणी क्रमांक १९**

**आदर्श ग्राम झाडाच्या विकासात आपले सहकार्य**

| अ. क्र. | गावातील लोकांचे सहकार्य वैचारिक, आर्थिक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वैचारिक दृष्ट्या विकासासाठी पूर्ण मदत केली व पूर्ण समुहाने कार्य पुर्णत्वास नेले. आर्थिक दृष्ट्या, आत्महत्याग्रस्त शेतकरीला मदत, गावाकऱ्यांनी निधीगोळा करुन पाण्याची टाकी वृक्षारोपण व श्रमदान केले. | ४५ | ९०% |
| २ | -- | ०५ | १०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाच्या उत्तरात ९०% लोकांनी सांगितले की आमच्या गावाचे सक्षमीकरण (विकास) साठी गावाच्या चांगली प्रगती साठी आम्ही सर्वानी एकत्रीत येऊन गावाच्या सक्षमीकरणात मदत केली. कारण हे येवढे मोठे कार्य आहे की यात एकटा माणूस काहीही करू शकत नाही समुहानेच हे कार्य पूर्णत्वास जाऊ शकते हे आमच्या लक्षात आले आणि आम्ही त्या दिशेने वाटचाल केली व काम पूर्णत्वास नेले.आर्थिक इत्यादी मदत कार्य ग्राम पंचायत झाडामध्ये गुलाबराव ठाकरे ते थोडे मानसिक रूग्ण असून ही त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने आम्ही नोकरीला लावले तसेच आत्महत्या ग्रस्त शेतकरी त्याच्या (२) विधवा पत्नींना नोकरीला लावले व त्यांच्या मुलांना पण नोकरीला लावले असे माजी सरपंच श्री विजयराव व सौ. रेखाताई उगले यांनी सागितले ग्रामस्थांनी सागितले की, आम्ही निधी जमा करून पाण्याची टाकी त्या शिवाय श्रमदान वृक्षारोपण इत्यादी द्वारे विकास कार्याला मदत केली.

पुढील प्रश्न संशोधकानी ग्रामस्थांना विचारला की ग्रामपंचायतच्या माध्यामातून जनतेचा सर्वांगीण (सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,बौद्धिक इत्यादि) विकास झाला का ?

**प्रश्न क्र. २०** **सारणी क्रमांक २०**

**ग्राम पंचायतच्या माध्यमातून जनतेचा सर्वांगीण विकास**

| अ. क्र. | जनतेचा सर्वांगीण विकास? | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हो सर्वांगीण विकास झला गृहउद्योग बचत गटाच्या माध्यमातून निर्माण झाले, रोजगार मिळाला,१००%लोक साक्षर झाले. | ५० | १००% |
| २ | -- | - | - |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाच्या उत्तरात १००% लोकांनी हो असे उत्तर दिले आणि सांगितले की, दिले सर्वांगीण विकास ग्राम पंचायतच्या माध्यमातून झाला, स्वयंसहायता बचत गटच्या माध्यमातून गृह उद्योग निर्माण झाले त्या मुळे अनेक लोकांना रोजगार प्राप्त झाला. १००% लोक साक्षर झाले. स्वच्छतेचे महत्व गावातील लोकांना कळले समाजाप्रति, गावाप्रति आपली काही जबाबदारी आहे, याची जाणीव ग्रामपंचायतच्या माध्यमातून झाली. असे लोकांनी चर्चा करतांना सांगितले.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आले की, नवीन नेतृत्व निर्माण करण्यास ग्राम पंचायत मुळे मदत झाली का ?

**प्रश्न क्र. २१** **सारणी क्रमांक २१**

**नवीन नेतृत्व निर्माण करण्यास ग्रामपंचायतमुळे मदत**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ७०% |
| २ | उत्तर दिले नाही | १५ | ३०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील प्रश्नाचे उत्तर देतांना तक्ता क्रमांक २१ % मध्ये असे दिसून येते की, ७० % लोकांनी सांगीतले की, ग्रामपंचयायत मुळे नवीन नेतृत्व निर्माण होण्यास मदत झाली. बचत गट, आंगनवाडी, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इतयादी संस्थांच्या माध्यमातून अनेक नेतृत्व तयार झाले त्यांना कार्य करण्याची संधी प्राप्त झाली. ३० % लोकांनी उत्तर दिले नाही. यावरुन दिसून येते की, ग्राम पंचायत हा पंचायत राज व्यवस्थेमधील गावाचा कणा आहे. गावाचे नेतृत्व, सत्ता विकेंद्रीकरण लोकांना राजकीय शिक्षण देणे इत्यादी महत्वाचे कार्यासाठी ग्राम पंचायतची स्थापना करण्यात आली आणि हा उद्देश्य इथे पूर्ण होतांना दिसतो.

पुढील प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला की, लोकांना ग्रामपंचायत मुळे अधिकार आणि कर्तव्याची जाणीव झाली का ?


**प्रश्न क्र. २२** **सारणी क्रमांक २२**

**अधिकार आणि कर्तव्याची जाणीव**

| **अ. क्र.** | **विकल्प** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ७०% |
| २ | उत्तर दिले नाही | १५ | ३०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

**आलेख क्रमांक ६**

**अधिकार आणि कर्तव्याची जाणीव दर्शविणारा आलेख**



वरील तक्ता क्र. २१ मध्ये दिसून येते की, ७० % लोकांनी हो मध्ये उत्तर दिले की, ग्राम पंचायत मुळे लोकांना अधिकार आणि कर्तव्याची जाणीव झाली, हे माहिती करुन देण्याचे कार्य उचित नेतृत्वामुळे झाले. आम्हाला नेतृत्वाच्या (सरपंच) माध्यमातून आमचे अधिकार कोणते आणि कर्तव्य काय हे सांगितल्या गेले व त्या मुळे ते गावाच्या विकासा करिता सहाय्यक ठरले.

पुढीलप्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आला की, लोकांना ग्राम सक्षमीकरणाचे महत्व, कायदे व सरकारी योजना इत्यादी माहिती प्राप्त करुन देण्यास ग्राम पंचायत सहाय्यक ठरली का?

**प्रश्न क्र. २३** **सारणी क्रमांक २३**

**ग्रामसक्षमीकरणाचे महत्व, कायदे, सरकारी योजना**

**माहिती देण्यास ग्राम पंचायत सहाय्यक**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ८०% |
| २ | उत्तर दिले नाही | १० | २०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

वरील सारणी क्र. २३ मध्ये दिसून येते की, ८० % लोकांनी हो म्हणून उत्तर दिले की, लोकांना ग्रामसक्षमीकरणाचे महत्व, कायदे व सरकारी योजना इत्यादी माहितीप्राप्त करुन देण्यास ग्राम पंचायत सहाय्यक ठरली, सरपंच श्री. विजयराव उगले, अन्य ग्राम पंचायत सदस्य, कर्मचारी यांनी सम्पूर्ण गावाच्या लोकांना एकत्रीत करुन बौद्धिक सत्राद्वारे सक्षमीकरण म्हणजे काय, गावाचा विकास कसा करावयाचा त्याचे महत्व काय हे,सांगितले व या विकासाच्या कार्याच्या माध्यमातून पुढे आम्हाला शासनाचे विविध कायदे व योजनांची माहिती प्राप्त झाली, त्याचा फायदा आम्ही गावाच्या विकासासाठी करुन घेतलाअसे गावकऱ्यांनी सांगितले २० % लोकांनी उत्तर दिले नाही.

पुढील प्रश्न संशोधकाद्वारे विचारण्यात आला की, ग्रामपंचायत मुळे स्थानिक लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव मिळाला का ?

**प्रश्न क्र. २४** **सारणी क्रमांक २४**

**स्थानिक लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव मिळाला का ?**

| अ. क्र. | विकल्प | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ८०% |
| २ | उत्तर दिले नाही | १० | २०% |
| **एकूण** | | **५०** | **१००%** |

सारणी क्र. २४ मध्ये दिसून येते की, वरील प्रश्नाचे उत्तर देतांना ८०% लोकांनी हो म्हणून उत्तर दिले. आणि सांगितले की, ग्राम पंचायतच्या माध्यमातून अनेक योजना, कार्यान्वित झाल्या, स्वयं सहाय्यता बचत गट च्या माध्यमातून अनेक गृह उद्योगांना चालना मिळून बऱ्याच प्रमाणात आर्थिक समस्यांचे निराकरण झाले. सोबतच लोकांच्या कला गुणांना वाव मिळाला. त्यांच्यातील उपक्रमाशीलता दिसून आली. लोक उत्साहाने कार्य करु लागले. अनेक लघु उद्योगांना चालना मिळाली. २०% लोकांनी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

ग्राम सक्षमीकरणात ग्रमापंचायतची भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ आदर्श गांव 'झाडा' ता. धामणगांव रेल्वे) हा लघुशोध प्रबंधाचा विषय असल्यामुळे संशोधकाद्वारे 'झाडा' ग्रामपंचायत ने विकासाकडे गांव सक्षीमकरणाकडे कशी वाटचाल केली? हे करीत असतांना विविध शासकीय योजना व कार्यक्रम अमलात आणले ? या कार्यात कोणा कोणाचे सहकार्य लाभले इत्यादी विविध प्रश्न झाडा गावातील ग्राम पंचायतीच्या विकासा संबंधी गावकरी मंडळींना, लोक प्रतिनिधींना विचारले आणि त्यांच्याद्वारे व्यक्त करण्यात आलेल्या विचारांना संशोधकाने यथेचित स्थानावर प्रस्तुत केले आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर टक्केवारी सह वर्णन या प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले. मुलाखत घेतांना संशोधकाला प्रकर्षाने ही बाब जाणवली की, कुशल नेतृत्व जर प्राप्त झाले तर त्याला सहकार्य करायला सर्व लोक तयार होतात. 'झाडा' या गावात श्री. विजयराव उगले सौ. रेखाताई उगले (माजी सरपंच) यांच्या रुपाने उत्तम नेतृत्व मिळाले व त्यानी एकत्रीत रूपाने विकासाकडे वाटचाल केली. त्यामुळे विविध

स्तरातील पारितोषिक प्राप्त करता आले आणि झाडा या गावाला आदर्श यशवंत ग्रामचा दर्जा प्राप्त झाला.

संशोधकाद्वारे या लघु संशोधन प्रकल्पासाठी प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत घेण्यात आली. त्यासाठी धामणगांव रेल्वे, नागपूर, अमरावती, झाडा, चांदुर रेल्वे इत्यादी विविध ठिकाणी जाऊन माजी आमदार, सरपंच, माजी जिल्हा परिषद सदस्य, शिक्षण सभापती, ग्रामस्थांनाशी भेट घेऊन त्या आधारावर निष्कर्ष काढण्यात आले. माजी सरपंच श्री. विजयराव उगले व सौ. रेखाताई उगले, ग्राम पंचायत कर्मचारी श्री. रमेशराव गावंडे झाडा या शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुनीलराव रोंघे २००५ - २००६ ते २००९ - २०१० या काळात झाडा गावात कार्यरत असलेल्या ग्रामसचिव कु. वैजयंतीमाला चव्हाण, वर्तमान सरपंच सौ. शुभांगी गजानन चौधरी, वर्तमान झाडा गावाचे ग्रामसचिव श्री. दिपक शिकारे, ग्राम पंचायत सदस्य, वचत गटाचे सदस्य, कर्मचारी, गावातील नागरीक, तरुण मुले-मुली इत्यादींनी आदर्श यशवंत ग्राम पंचायत झाडाचा विकास कसा झाला या संबंधी महत्वपूर्ण माहिती दिली. यांच्याशी चर्चा करतांना असे वाटत होते की, सर्व कार्ये दृश्य स्वरुपात आपल्या समोरच होत आहेत. इतक्या उत्साहानी या लोकांनी आपली अविस्मरणीय कार्ये सांगितली. या सर्वांनकडून जी माहिती प्राप्त झाली. संशोधकाने वस्तुनिष्ठ विश्लेषण करुन मांडली आहे. त्या आधारावर निघालेले निष्कर्ष पुढील प्रकरणात मांडण्यात आले आहेते.

# निष्कर्ष

निष्कर्ष हा संशोधनाचा प्राण असतो, विषयाच्या सर्वांगीण अध्यापनातून अंतिम जो सार निघतो त्या सारालाच निष्कर्ष म्हणतात. हे निष्कर्ष वस्तुनिष्ठ अध्ययनाची फलश्रुती असते. त्यामुळे संशोधनात निष्कर्षाला अतिशय महत्व आलेले आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय "ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका", एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ आदर्श गाव झाडा, ता. धामणगांव रेल्वे) हा आहे.

प्रस्तुत विषयांशी संबधित संशोधन कार्य केल्यानंतर निघालेले निष्कर्ष पुढील बिंदुमध्ये मांडण्यात आले आहे.

- ❖ उद्दिष्टांचे मूल्यमापन
- ❖ संशोधकाद्वारे ठेवण्यात आलेले गृहितकृत्ये (उपकल्पना) त्या गृहितकृत्यांची पडताळणी
- ❖ विषयाशी संबंधित प्रश्नावली द्वारा प्राप्त तथ्यांमधून निघालेले निष्कर्ष
- ❖ इतर पुरक निष्कर्ष
- ❖ शिफारशी

**उद्दिष्टांचे मूल्यमापन :**

भारतीय लोकशाही विकेंद्रीकरणात ग्रामपंचायतची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. विकासाभिमुख शासनाच्या दृष्टिने विकेंद्रीत प्रशासन आणि लोकसहभाग प्रक्रिया महत्वाच्या ठरतात. विकेंद्रीकरण यशस्वी होण्यासाठी विकेंद्रीत संस्थाची रचना, निर्वाचित नेतृत्व आणि शासकीय वरिष्ठ संवर्गाचे अधिकार पर्याप्त अर्थपुरवठा व कार्याचे स्वरूप हे पाच घटक महत्वाचे आहेत. ग्राम सक्षमीकरणासाठी, समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी आर्थिक विकास घडवून आणणाऱ्या योजनांकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे. ग्राम पंचायतच्या माध्यमातून हे सर्व विकास कार्ये केले जाते. प्रस्तुत संशोधानाचा उद्देश्य किती प्रमाणात यशस्वी झाला. तसेच संशोधन कार्याच्या पूर्वी संशोधनाची जी उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत ते कितपत पूर्ण झालेली आहे. याची पडताळणी करण्यासाठी उद्दिष्टांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

१. **ग्राम सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारने केलेल्या योजना महत्वपूर्ण आहेत :** ग्राम सक्षमीकरणासाठी शासकीय योजनांची भूमिका व योगदान लक्षात घेता गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला साकार करून गांधीवादी समाजवाद निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने झालेला दिसून येतो. "ग्रामीण विकास म्हणजेच देशाचा विकास" यावर विश्वास असणाऱ्या आणि त्यासाठी समर्पण भावनेने झटणाऱ्या अनेक व्यक्ती भारतात होऊन गेल्या. त्यांनी सुद्धा भारतातील ग्रामसक्षमीकरणासाठी राजकीय योजनांच्या निर्मितीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. ग्राम पंचायत झाडा या गावाला आदर्श यशवंत ग्राम बनविण्यासाठी विविध शासकीय योजनांचा हातभार लागला आहे. ग्राम सक्षमीकरणात शासकीय योजनांची भूमिका जीवनदायीनी ठरली आहे. शासकीय योजनांमुळे ग्रामीण जनता आधुनिक समाजातील मुख्य प्रवाहात सामील होत आहेव गावांचा सर्वांगीण विकास घडून ग्रामसक्षमीकरणाची संकल्पना साकार होत आहे. शासकीय योजनांमुळे आदिवासी, मागासवर्गीय यांच्या जीवनाचा स्तर उंचावत आहे. ग्रामीण विभागात राहणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विषयक विकास साधण्यात यश प्राप्त होत आहे. विविध शासकीय योजनेच्या अमंलबजावणीमुळे शेती, पशुपालन, आरोग्य, शिक्षा, पेयजल, स्वच्छता, सिंचन, कुटीरउद्योग, रस्ते इत्यादी क्षेत्रात क्रांती घडून आली. झाडा गावातील लोकांशी चर्चा करीत असतांना प्रश्नावलीच्या माध्यमातून ८०% लोकांनी सांगितले की, ग्रामसक्षमीकरणात शासकीय योजनांचे महत्वाचे स्थान आहेत.

२. **ग्राम पंचायत व पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून जनतेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक विकास साध्य करणे :** एकोणीसाव्या शतकात अनेक विचारवंतांनी व्यक्ती निष्ठासोडून समाजनिष्ठेकडे वळविणाऱ्या विचारांचा पुरस्कार केला. समाजातल्या तळागाळात असलेल्या तसेच सर्व सामान्य नागरिकांच्या जीवनाचा विकास व्हावा यासाठी सामूहिक विकासाची संकल्पना पुढे आली. सामूहिक विकासाच्या प्रक्रियेत समाजात राहणाऱ्या लोकांचेराहणीमान उंचावण्याचे प्रयत्न आणि संपूर्ण सामाजिक, आर्थिक इत्यादी प्रगतीसाठी कार्य करण्यात येते. अशा प्रयत्ना मध्ये ग्रामीण जनतेची परंपरागत जीवन पद्धती बदलून आधुनिक जीवन पद्धती स्वीकारण्याचा प्रयत्न केल्या जातो. आदर्श यशवंत ग्राम

झाडा येथे संशोधना अंतर्गत असे दिसून आले की, ग्राम पंचायत व पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून जनतेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक विकास झालेला आहे. सामाजिक दृष्ट्या अंधश्रद्धा दूर करण्यात ग्राम पंचायतची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. तसेच ७० टक्के लोकांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून सांगितले की, आमचे गाव सामाजिक दृष्ट्या सक्षम आहेत. बहुतांश अंधश्रद्धा दूर झाली आहे. लोक प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन लसीकरण करीत आहे, त्याचा फायदा घेत आहे. आर्थिक दृष्ट्या पण गाव सक्षम झाले आहेत. २३० लोकांना बचत गटाच्या माध्यमातून रोजगार प्राप्त झाले. अशा प्रकारे आर्थिक दृष्ट्या ही गाव सक्षम झाले आहे. शैक्षणिक दृष्ट्या, बौद्धिक दृष्ट्या ही पाहिले तर गाव १०० टक्के साक्षर झाले आहे. असे प्रश्नावलीच्या माध्यमातून १०० टक्के लोकांनी उत्तर दिले.

३. **स्थानिक नेतृत्वाला चालना आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे :** लोकशाही व्यवस्था आणि प्रक्रिया स्थानिक पातळीवर रूजविणे हे स्थानिक स्वशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी स्थानिक पातळीचे नेतृत्व स्थानिक नेतृत्वानेच करणे आवश्यक असते. लोकांचा विकास कार्यात सहभाग वाढविणे, त्या मधून विकास कार्यास त्यांची मान्यता मिळविणे, स्थानिक पातळी वरील संस्था त्यांची विहित कार्ये सक्षमतेने पार पडतील अशा दृष्टीने त्यांना सहाय्य करणे. हे कार्य करीत असतांना समाजामधील दलित व मागास वर्गातील लोकांचे जीवनमान सुधारून त्यांच्या पर्यंत विकास कार्याचे लाभ पोहचतील हे पाहणे, ही ग्रामीण विकास नेतृत्वा कडून अपेक्षा आहे.

ग्राम पंचायत 'झाडा' या गावाला १९८९ पासून श्री. विजयराव उगलेच्या रूपाने उत्तम नेतृत्व प्राप्त झाले असे ९० टक्के गावातील लोकांनी सांगितले आणि त्यांनी समाजातील, दलित व मागास वर्गीय लोकांकरीता ही उत्तम कार्य केले. त्यांनाही विकास कार्यात समाविष्ट केले असे लोकांनी चर्चेच्या माध्यमातून प्रश्नावली भरतांना सांगितले. श्री. विजयराव उगले व त्या नंतर सौ. रेखाताई उगले यांच्या नेतृत्वामुळेच आम्ही आमच्या गावाचा विकास करू शकलो असे लोकांद्वारे सांगण्यात आले. अर्थात नेतृत्वात जे गुण असायला पाहिजे ते श्री विजयराव उगले यांच्यात पाहायला मिळतात.

४. **जनतेला स्वतःच्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव करून दिली :** ग्रामसक्षमीकरणाच्या दिशेने वाटचल करीत असतांना 'आदर्श यशवंत ग्राम झाडा' येथील नागरिकांना स्वतःचे हक्क आणि कर्तव्य याची जाणीव करून देण्यात आली. आपले अधिकार कोणते आहेत? आपण त्याचा उपयोग करून गावाचा विकास कसा करू शकतो? या संबंधी तज्ञांद्वारे त्यांना माहिती करून देण्यात आली व त्याच बरोबर आपले कर्तव्य समाजाप्रती, गावाप्रती कोणते आहेत. आपण या अधिकार आणि कर्तव्यांचा उपयोग करून विकासाकडे कसे अग्रेसर होऊ शकतो? याची जाणीव त्यांना झाली.

५. **नवीन राजकीय नेतृत्व निर्माण करणे :** ग्रामपंचायतच्या माध्यमातून नवीन नेतृत्व समोर आलेले दिसून येतात. पंचायत राज व्यवस्था अमलात येण्यापूर्वी सर्वत्र शहरी नेतृत्वाचीच सत्ता होती. त्यामध्ये ग्रामीण जनतेला किंवा नेतृत्वाला विशेष महत्व नसल्याचे दिसून येत होते. परंतु पंचायत राजव्यवस्थेच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण केले व ग्राम स्तरावरील ग्रामपंचायती व ग्रामसभांना जास्त अधिकार मिळाले परंतु प्रत्यक्षात ही सत्ता ग्रामस्थांना मिळाली की नाही आणि मिळाली असेलच तर त्या व्यवस्थांमध्ये ग्रामसंस्थांचा सहभाग कसा आहे. हे जाणून घेण्यासाठी झाडा या गावातील लोकांशी चर्चा केल्या नंतर ७० टक्के लोकांनी मान्य केले की झाडा ग्रामपंचायतीच्या अनेक ग्रामस्थांना उत्कृष्ट असे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. बचत गट, अंगनवाडी, ग्रामपंचायत इत्यादी विविध माध्यमातून त्यांनी नेतृत्व केले. या वरून स्पष्ट होते की, झाडा या ग्राम पंचायतच्या माध्यमातून नवीन राजकीय नेतृत्व निर्माण झाले.

६. **ग्रामसक्षमीकरणाचे महत्व, कायदे, विविध सरकारी योजना इत्यादी बाबी संबंधी लोकांना माहिती मिळवून देणे :** 'आदर्श यशवंत ग्राम झाडा' येथील गावकरी नागरिकांशी चर्चा करीत असतांना ग्रामस्थांनी सांगितले की, गावाच्या विकास कार्यात आम्ही सर्व सहभागी झालो आणि त्यामुळे आम्हाला गावांचा विकास कसे करायचा हे माहित झाले व ग्राम सक्षमीकरणाचे महत्व कळले. तसे शासनाचे कायदे व विविध योजनांची माहिती झाली. कारण प्रत्यक्षात आम्ही त्यात काम केले आणि विकास घडवून आणला. हे वरील उद्दिष्ट सत्य ठरले आहे असे म्हणता येईल.

७. **स्थानिक लोकांच्या उपक्रमशिलतेला वाव देणे :** ग्रामपंचायतच्या माध्यमातून लोकांच्या उपक्रमशिलतेला वाव मिळाला का? असे प्रश्न ग्रामस्थांना विचारले असता ८० टक्के गावकरींनी सांगितले की, हो ग्रामपंचायतीमुळे आमच्या गावातील अनेक लोक समोर आले त्यांची बरीच प्रमाणात आर्थिक समस्या सुटण्यास मदत झाली. अंगणवाडी, बचत गट, ग्रामपंचायत ने राबविलेल्या अनेक शासकीय योजना यांच्या माध्यमातून अनेक स्थानिक लोकांच्या कला गुणांना वाव मिळून गावात अनेक छोटे-छोटे गृह उद्योग आम्ही सुरू केले होते. त्या माध्यमातून लाभ प्राप्त केले व लोकांच्या उपक्रमशिलतेला वाव मिळाला. म्हणजे ग्रामपंचायतच्या (पंचायत राज व्यवस्था) माध्यमातून स्थानिक लोकांच्या उपक्रम शिलतेला वाव मिळाला हे उद्दिष्ट सत्य ठरले आहे.

**संशोधकाद्वारे ठेवण्यात आलेले गृहितकृत्ये :**

संशोधन कार्य करण्याकरिता गृहितकृत्ये (Hypothesis) चे महत्वाचे योगदान आहे. उपकल्पनेमुळे संशोधनास ध्येय प्राप्त होते व संशोधनाला दिशा प्रदान करते. हे संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी संशोधकाद्वारे काही गृहितकृत्ये समोर ठेवण्यात आली होती ते खालील प्रमाणे आहे. -

१. ग्राम सक्षमीकरणामुळे समाजात नवी सत्तास्थाने निर्माण झालीत त्यांनी आपल्या नेतृत्व गुणामुळे ग्रामीण भागाच्या राज्य कारभावर आपली पकड बसविली.

२. ग्राम सक्षमीकरणाच्या कार्यात ग्रामपंचायतीतील प्रत्येक सामान्य नागरिकांचा हातभार लागला व ग्रामीण जनतेला आपल्या अधिकार, कर्तव्यांची जाणीव झाली.

३. सक्षमीकरणाच्या या विविध योजनेमुळे ग्रामीण जनतेच्या मानसिकतेत महत्वपूर्ण बदल झाला.

४. प्रत्येक निर्णयात पारदर्शकता आली, परिणाम स्वरूप भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली.

५. ग्रामसभेद्वारा तंटामुक्ती समिती निर्माण केल्या जात असल्यामुळे गाव पातळीचे निर्णय न्याय, व्यवस्था व अमंलबजावणी गाव पातळीवर होण्यास मदत झाली.

६. महिलासक्षमीकरण होण्यास सुरूवात झाली.

**गृहितकृत्यांची पडताळणी :**

ग्रामपंचायत झाडाचे ग्रामसक्षमीकरण्यात योगदान या संदर्भात वरील ६ उपकल्पना निष्पक्ष रूपाने समोर आणण्यासाठी उपलब्ध साहित्य या संशोधन कार्याला पूर्ण करू शकत नाही. म्हणून ग्राम पंचायतीचे ग्रामसक्षमीकरणात काय योगदान आहेत. ही संपूर्ण माहिती प्राप्त करून घेण्याच्या उद्दिष्टाने संशोधकाद्वारे 'प्रश्नावली' चा उपयोग केला आणि नमुना निवड पद्धतीचा वापर करून एकूण ५० लोकांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याद्वारे दिल्या गेलेले प्रश्नांचे उत्तर संशोधकानी निष्पक्ष रूपाने मांडले आहेत. पहिली उपकल्पना (गृहितकृत्ये) ही ठेवली होती की :-

१. **ग्राम सक्षमीकरणामुळे समाजात नवी सत्तास्थाने निर्माण झालीत. त्यांनी आपल्या नेतृत्वगुणामुळे ग्रामीण भागाच्या राज्यकारभारावर आपली पकड बसविली :** ही उपकल्पना१०० टक्के खरी असलेली दिसून येते. मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे. समाजातच मानवाचा संपूर्ण विकास शक्य आहे. समाजच मानवाला या योग्य घडवितो की, तो आपल्या पाया वर उभा राहू शकेल. पण मानव आत्मनिर्भर झाल्या बरोबर हे विसरूनच जातो की समाजाप्रती माझे काही देणे लागते. त्याचा परिणाम समाज व्यवस्थेवर होतांना दिसतो, म्हणून मनुष्याचे कर्तव्य आहे की, ज्या समाजानी मला घडविले. पायावर उभे केले, आत्मनिर्भर केले त्या समाजाप्रती माझे ही काही कर्तव्य आहे. तेव्हाच संपूर्ण समाज आणि राज्याचा विकास संभव आहे.

आदर्श ग्राम झाडा येथे ग्रामसक्षमीकरणाच्या कार्यात नवीन नेतृत्वाचे महत्वाचे योगदान दिसून येते. ग्रामीण विभागाचे आर्थिक व सामाजिक विकास नेतृत्वाच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असते. सरकार आणि ग्रामीण लोक या दोघांमध्ये असलेली दरी कमी करणे आणि विकास कार्यात ग्रामीण लोकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करणे हे नेतृत्वाचे कार्य आहे. त्यातूनच उद्याचे राज्य व राष्ट्रपातळी वरील प्रभावी नेतृत्व निर्माण होते. ज्या माणसाकडे संघटनात्मक कौशल्य, मनमिळवण्याची कला, भाषण चातुर्य आणि तितकेसे शिक्षण आहे. तो पंचायत राज्य व्यवस्थेत यशस्वी नेता होऊ शकतो.

झाडा या गावात श्री विजयराव उगले यांना १९८९ मध्ये जेव्हा सरपंच पदावर निवडण्यात आले आणि नवीन नेतृत्वामुळे तसेच त्यांच्यावर शिक्षणाचा प्रभाव ते एम. एस.

सी (अग्रीकल्चर) आहेत. त्यांनी आपल्या सोबत गावातील अनेक लोक, तसेच नेतृत्व उदयाला आणून संपूर्ण झाडा गावाचा विकास करण्यात योगदान दिले. त्यांच्या कारकिर्दीत (सरपंच पदावर १५ वर्षे) अनेक पारितोषिक झाडा ग्राम पंचयातला प्राप्त झाले. चांगल्या नेतृत्व गुणामुळे सतत १५ वर्षे त्यांना सरपंच पदावर अविरोध निवडण्यात आले. त्यांनी आपल्या नेतृत्व गुणांमुळे ग्रामीण भागाच्या राज्यकारभारावर आपली पकड बसविली त्यांच्या कार्यकाळात मिळालेले पारितोषिकेकांचीयादी मागे संलग्नित आहे.

सतत १५ वर्षे सरपंच पदावर काम केल्यानंतर त्यांनी गावातील लोकांना सांगितले की, नवीन नेतृत्व गावात तयार करा मी आता सरपंच पदावर राहात नाही तर सर्व गावकरी नागरीकांनी २००५ पासून सौ. रेखाताई विजयराव उगले यांची अविरोध निवड केली म्हणजे पुन्हा सरपंच पद श्री. विजयराव उगले यांच्याच घरी आले आणि परत विकासाचा ध्यास घेऊन सौ. रेखाताई उगले यांनीही गावाला विविध पुरस्कार प्राप्त करून दिले. त्यांच्या नंतर गावात अनेक नवीन नेतृत्व उदयास आले पण जसा सरपंच श्री. विजयराव उगले व सौ. रेखाताई उगलेनी गावाच्या विकासाचा ध्यास घेतला होता तसा काही घेतला नाही. वर्तमान काळात झाडा या गावाच्या सरपंच सौ. शुभांगी गजाननराव चौधरी ह्या आहेत त्यांची मुलाखत घेतली असता त्यांनी सांगितले की, या गावातून प्रत्येक छोट्या-छोट्या कामासाठी मंगरुळ दस्तगीर या गावात जावे लागते पण बस येत नाही बसेस बंद झाल्या बस वाले सांगतात की खाजगी वाहनामुळे आम्हाला त्या प्रमाणात प्रवासी मिळत नाही. प्रत्येक छोट्या-छोट्या कामासाठी बाहेर जाण्याकरिता निधी पण खूप लागतो तरी आम्ही गावाच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील आहोत. सन २०१५-२०१६ या काळात ग्रामपंचायतच्या सामान्य फंडातून ३ टक्के अपंगांना (११ लोकांना) टीन वाटप केले. आणि २०१६-२०१७ या वर्षी अपंगांना त्यांच्या इच्छेनुसार १८ ते २० हजार पर्यंत सामान देणार आहोत. गावात आरोग्याच्या दृष्टीने उपकेंद्र असावे. यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. प्रश्नावलीच्या माध्यमातून ९० टक्के लोकांनी सांगितले की, विजयराव उगले यांच्या नेतृत्वामुळेच गावाच्या विकासाला चालना मिळाली. म्हणजे नेतृत्वकरिता कर्तव्य, जिद्द, कार्यशैली हे तीन्ही गुण असले तर ते नेतृत्व सफल होते आणि या नेतृत्व गुणांमुळेच

ग्रामसक्षमीकरणात नवीन सत्तास्थाने निर्माण झाली व ग्रामीण भागाच्या राज्य कारभारावर आपली पकड बसविली. संशोधकद्वारे दूसरी उपकल्पना ही ठेवण्यात आली होती.

२. **ग्राम सक्षमीकरणाच्या कार्यात ग्राम पंचायतीतील प्रत्येक सामान्य नागरिकांचा हातभार लागला व ग्रामीण जनतेला आपल्या अधिकार, कर्तव्यांची जाणीव झाली :** वरिल उपकल्पना (गृहितकृत्ये) पण बहुतांश खरी झालेली दिसुन येते. झाडा या गावच्या सक्षमीकरणासाठी गावातील प्रत्येक सामान्य नागरिकांचा व ग्रामपंचायतचे सदस्य व कर्मचारी यांचासर्वंचा हातभार आप-आपल्या परीने लागला आणि ग्रामीण नागरिकांना (सामान्य जनतेला) आपल्या अधिकार आणि कर्तव्याची जाणिव झाली त्यांनी सर्वांनी एकत्रीत येऊन संकल्प केलाकी, आम्हाला आमच्या गावाचा विकास, सक्षमीकरण करावयाचे आहेत आणि श्रमदानाची तयारी दाखविली येवढेच नाही तर लोकवर्गणी, करुन विविध विकासाची कामे गावात केली.पसायदान ग्रामीण महिला मंडळ कार्यालयाच्या बांधकामाकरिता पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत लोकवर्गणी, गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानासाठी व गावाला मुख्यप्रवेशद्वार बांधण्यासाठी,वाचनालय इमारत बांधकामाकरिता निधी गोळा केला. त्याशिवाय सरपंच/उपसरपंच/ग्राम पंचायत सदस्य यांनी सभेचा भत्ता, देणगी म्हणुन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे बचत खात्यात लोकवर्गणी म्हणुन जमा केलेला आहे. झाडा गावच्या विकासात गावातील प्रत्येक नागरिकांचा हातभार लागला. तसेच प्रत्येक विकासाचे कार्य करीत असतांना जनतेला आपले अधिकार आणि कर्तव्याची जाणिव झाली. आपल्या गावाकरिता समाजाकरिता आपले ही काही देणे लागते अशी जाणीव त्यांना झाली. मुलाखत घेतांना असे अनेक नागरिकांनी बोलुन दाखविले आणि पुढे ही आम्ही आमच्या गावाच्या विकासासाठी कार्य करु असे त्यांनी सांगितले. म्हणजे ही दुसरी उपकल्पना पुर्ण पणे सत्य ठरली आहे. संशोधकाद्वारे तिसरी उपकल्पना ही ठेवली होती की.

३. **सक्षमीकरणाच्या या विविध योजनेमुळे ग्रामीण जनतेच्या मानसिकतेत महत्वपूर्ण बदल झाला :** ग्रामीण विकासांचा मूलाधार असलेल्या राज्य शासनाने अनेक विकासात्मक कामे केली, नेहमीच, उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेला ग्रामीण भाग आता, शासनाच्या नवनवीन

योजनांमुळे विकासाकडे अग्रेसर होत आहे. ही कामे करीत असतांना विशेष लक्ष ग्रामीण भागाकडे दिले असल्याचे दिसून येते. मग त्यात ग्रामीण विद्यार्थ्यांचे शिक्षण असेल, ग्रामस्थाचे आरोग्य असेल किंवा गावातील स्वच्छता असेल अशा विविध सकारात्मक बाबी ग्रामीण समाजाच्या विकासासाठी आहेत असे म्हणता येईल. या विविध योजनांपैकी एक प्रमुख ग्रामीण विकास योजना म्हणजे ग्रामच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने राबविलेली "आदर्श ग्राम योजना" आहे. ही योजना १९९२ साली महाराष्ट्र शासनाने गावांचा परिपूर्ण विकास व्हावा पर्यायाने महात्मा गांधीजीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार व्हावे हा उद्देश्य डोळ्यासमोर ठेवूनच निर्माण केली. अशा विविध योजना ग्राम सक्षमीकरणासाठी  शासनाने राबविल्या आहेत या विविध योजनेच्या सहाय्याने झाडा या गावाच्या नागरिकांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातून आपल्या गावाला सक्षम बनविले, आणि आपण आपल्या गावाचा विकास सगळे मिळून चांगल्या पद्धतीने करू शकतो. अशी मानसिकता गावाच्या नागरिकांची झाली. ही मानसिकता तयार करण्यामध्ये तत्कालीन सरपंच श्री. विजयराव उगले व श्री सा. मा. महाजन यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी लोकांची मानसिकता बदलण्याचा सतत कसोशीने प्रयत्न केला आणि गावाची जनता विकास करण्यासाठी तयार झाली. ८० टक्के लोकांनी सांगितले संशोधकाने ठेवलेली ही वरील उपकल्पना पण खरी ठरली आहे. पुढील उपकल्पना ठेवण्यात आली होती की.

४. **प्रत्येक निर्णयात पारदर्शकता आली, परिणामस्वरूप भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली :** माजी सरपंच श्री. विजयराव उगले यांची मुलाखत घेतांना त्यांनी सांगितले की, आम्ही जेही विकासाचे व आर्थिक कार्य केले त्या सर्व कार्यांमध्ये पारदर्शकता ठेवली, किती रुपये कोणत्या कामावर खर्च करण्यात आले आहे, ग्राम पंचायतचे उत्पन्न किती आहे, किती खर्च झाले. विकासाचे कोण-कोणते कार्य केले याची पूर्ण पणे नोंद घेवून पारदर्शी स्वरूपात ते पूर्ण गावकरी लोकांना सांगण्यात यायचे म्हणून गावातील जनतेचा विश्वास बसला. आमच्या ग्रामपंचायतचे उत्पन्न वर्षाचे ११ लक्ष व खर्च ९ लक्ष येवढे होते. त्यामध्ये सर्वात जास्त उत्पन्न कोंडवाड्याचे आहेत. आम्ही कोंडवाड्यात गाय आणल्यानंतर १५ रू. दंड गायीचा, ३००रू. खावटी व ४००रू. डिपॉजीट घ्यायचे. हे डिपॉजीट १ वर्षानी

परत करावयाचे जर ढोर दुसऱ्यांदा आले नाही तर ठोक स्वरूपात ही रक्कम परत करीत होतो. कोंडवाडा संबंधी विशेष दंडाची व्यवस्था मी स्वतः उच्च न्यायालयात जाऊन विशेष आदेशानी करवून आणली होती.

या शिवाय ११२ पारितोषिकांचे १ कोटी ८८ लक्ष (बक्षिस) आम्हाला प्राप्त झाले. तसेच सेवा सहकारी सोसायटीद्वारा प्रत्येकी सभासदचे २००रु. शेअर्स हे बँकेत फिक्स डिपॉजीट ठेवले व ७५ लाख एफ. डी. झाली. अशा प्रकारे पूर्ण व्यवहार पारदर्शी ठेवण्यात आला. परिणामस्वरूप भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली.अशा प्रकारे संशोधकाद्वारे ठेवण्यात आलेली वरील उपकल्पना १०० टक्के खरी ठरली. पुढील उपकल्पना होती :

५. **ग्रामसभेद्वारा तंटामुक्ती समिती निर्माण केल्याजातअसल्यामुळे गाव पातळीचे निर्णय, न्याय व्यवस्था व अंमलबजावणी गाव पातळीवर होण्यास मदत झाली :** झाडा या गावात २००५ ला तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री. विजयराव उगले होते. २०१० ला श्री. विजयराव नंतर श्री अतुलराव कोंबे हे अध्यक्ष झाले. आणि २०१५ पासून श्री. विलासराव भेले हे तंटामुक्तीचे अध्यक्ष आहे. या तंटामुक्ती समितीच्या माध्यमातून गाव पातळीवर जेही छोटे-मोठे वाद होतात ते सोडविण्याचे कार्य या समितीच्या माध्यमातून केले जातात. त्यामुळे न्यायीक कार्य व त्याची अंमलबजावणी गाव पातळीवर होण्यास मदतच झाली आहे. ही उपकल्पना संशोधका द्वारे जी ठेवण्यात आली होती ती १०० टक्के खरी ठरली आहे. संशोधकाद्वारे पुढील उपकल्पना ठेवण्यात आली होती की :

६. **महिला सक्षमीकरण होण्यास सुरूवात झाली :** ग्राम पंचायतीच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाले. ही उपकल्पना महिलांच्या बाबतीत झाडा या गावाचे अध्ययन केल्या नंतर १०० टक्के खरी ठरली आहे. ग्रामपंचायत व स्वयंसहाय्यता बचत गट मुळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण झालेले दिसून येते. ७३ वी घटना दुरूस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षण व नंतर ५० टक्के आरक्षण प्राप्त झाल्यामुळे स्त्रिया मोठ्या संख्येने घरआंगण सोडून, निवडणुकांमध्ये यश संपादन करून जबाबदारीच्या जागांवर कार्यरत आहेत. झाडा या आदर्श ग्राममध्ये श्री. विजयराव उगले यांनी सरपंच पदाचा कारभार पूर्ण केल्यानंतर (सतत ३ कार्यकाळ) झाडा गावातील नागरिकांनी सर्व महिलांच्या

हातात (२००५ते २०१०) झाडा या ग्रामपंचायतचा कारभार सोपविला ग्राम सेवक या पदावर पण महिलाच होती महिलांची कार्यकारिणी पुढील प्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. रेखाताई वि. उगले | सरपंच |
| २. | श्री. साहेबराव मा. महाजन | उपसरपंच |
| ३. | सौ. निर्मला वा. चौधरी | ग्रा. पं. सदस्य |
| ४. | कु. वैजयंती चव्हाण (आडे) | ग्राम सेवक |
| ५. | सौ. ज्योती अ. मांदळे | ग्रा. पं. सदस्य (सहयोगी सदस्य) |
| ६. | सौ. भाग्यश्री दि. काळे | ग्रा. पं. सदस्य |
| ७. | लतीफा शे. करीम | ग्रा. पं. सदस्य |
| ८. | श्रीमती. छाया दा. गोमासे | ग्रा. पं. सदस्य (सहयोगी सदस्य) |
| ९. | श्रीमती. कमला आ. खंडारे | ग्रा. पं. सदस्य |
| १०. | सौ. सखुबाई मा. मोकरकार | ग्रा. प. सदस्य |

अशा प्रकारे एक ग्रामपंचायत सदस्य पुरुष सोडले तर सर्व महिला सदस्य ग्राम पंचायत झाडा येथे निर्वाचित झाल्या आणि दोन सहयोगी सदस्य घेण्यात आले. यांनी पुढील ५ वर्षाच्या काळात ग्रामपंचायत झाडाला अनेक पुरस्कार प्राप्त करून दिले. त्याची यादी या लघु संशोधन प्रकल्पात लावलेली आहे. कधीही सत्तेचा गंध नसलेल्या स्त्रियांना पंचायतराज व्यवस्थेमध्ये सत्ता मिळाल्यानंतर त्या सत्तेचा वापर कसा करावयाचा? हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर होता, कोणताही अनुभव नसल्यामुळे सक्तीने काही गोष्टी त्यांच्याकडून करवून घेणे असे प्रकार देशभर काही प्रमाणत घडले. पण झाडा या गावात गावकरी नागरिकांनी स्वतः हून सत्ता महिलांच्या हातात सोपविली हे इथे विशेष उल्लेखनीय आहेत. जिथे असे म्हटले जाते की, गावातील लोक मागासलेले विचारसरणीचे असतात त्याला अपवाद झाडा हे गाव दिसून येते आणि या संधिचा महिलांनी पुरेपुर लाभ घेऊन गावाचा विकास केला. शिक्षण, स्वच्छता, आरोग्य, दलितवस्ती सुधार, पाणी पुरवठा, नाली बांधकाम, रोड बांधकाम इत्यादी अनेक उपक्रम राबविण्यात आले. भूतपूर्व राष्ट्रपती स्व. डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते आदर्श

यशवंत ग्राम 'झाडा'ला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. सरपंच सौ. रेखाताई उगले यांनी तो पुरस्कार स्वीकारला. महाराष्ट्र शासनाचे ग्राम स्वच्छता अभियानही स्त्रियांच्या सक्रीय सहभागाचीच फलश्रुती म्हणता येईल. ही राजकीय जाणीव, जागृती आणि राजकीय कृतीशीलता याचे उदाहरण म्हणावे लागेल. ह्या बाबी महिलांच्या सबलीकरणासाठी उपयुक्त सिद्ध झाल्या आहेत. म्हणून संशोधकानी समोर ठेवलेली उपकल्पना की, ग्रामपंचायत द्वारे महिला सक्षमीकरण होण्यास सुरूवात झाली. यात सत्यता दिसून येते.

**विषयाशी संबंधित प्रश्नावली द्वारे प्राप्त तथ्यांन मधून निघालेले निष्कर्ष :**

उपकल्पना (गृहितकृत्ये) मधुन जे निष्कर्ष निघाले त्या शिवाय संशोधनाचे कार्य करीत असतांना 'आदर्श यशवंत ग्राम पंचायत झाडा' या संबंधी प्रश्नावली च्या माध्यमातून जी माहिती प्राप्त झाली त्या आधारावर जे निष्कर्ष निघाले ते पुढील प्रमाणे :

१. गावाच्या विकासासाठी उत्कृष्ट नेतृत्व असणे आवश्यक आहे, गावकरी नागरिकांशी प्रश्नावली भरतांना जी चर्चा झाली त्याने या गोष्टी वर लोकांनी जास्त भर दिला.

२. तसेच हे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांजवळ उच्च शैक्षणिक पात्रता असेल तर ग्रामीण जनतेला आपले विचार तो पटवून सांगु शकतो. खेड्यातील ग्रामपंचायतीचा सरपंच शिक्षित असेल तर तो पंचायतसमिती व जिल्हा परिषदेमध्ये जावून आपल्या गावासाठी चांगल्या पद्धतीने विकास योजना राबवू शकतो. व प्रत्येक कार्य कायद्याच्या माध्यमातून करु शकते. लोकांचा विकास कसा होईल त्याकडे लक्ष त्यांचअसते.

३. नवयुवकांना नेतृत्व करण्याची संधी दिल्यास विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून समाज अधिक प्रगतीशील करण्यास मदत होते.

४. जातीयतेचे वैमनस्य कमी करुन मागास वर्गीय लोकांना विकास कार्यात सहभागी करावयास पाहिजे.

५. नेता हा निस्वार्थी असावा. अन्यथा नेते व्यक्तिगत स्वार्थातून सत्तेचा वापर करू शकतात. शासनाच्या लोककल्याणकारी योजना व्यक्तिहितासाठी वापरू शकतात.

६. निष्कलंक चारित्रशील व्यक्तिमत्व असायला पाहिजे. नेता खऱ्या अर्थाने सामान्य जनतेला विधायक दृष्टी देणारा मार्गदर्शक असतो. ही लोकशाही मध्ये नेत्याकडून अपेक्षा असते.

म्हणून चांगल्या नेतृत्वासाठी निष्कलंक व चारित्रशील व्यक्तिमत्व असणे आवश्यक असते. नेतृत्व म्हणजे समुहाला प्रभावीत करण्याची क्रिया आहे. आपल्या समुहाला मार्ग दाखविण्याचे, त्यांचा विकास करण्याचे व त्या द्वारे आपले प्रभुत्व निर्माण करण्याचे सामर्थ्य म्हणजे नेतृत्व आहे.

वरील सर्व कसोटीवर श्री. विजयराव उगले यांचे नेतृत्व खरे उतरले आहे. त्यांनी गावाची समस्या जाणून घेवून त्यावर उपाययोजना शोधल्या आणि गावाला आदर्श यशवंत ग्राम चा पुरस्कार प्राप्त करून दिला त्यानंतर त्यांच्या पत्नी सौ. रेखाताई उगले यांनीही आपल्या पतीच्या पाऊला वर पाऊल ठेवून गावाच्या विकासासाठी सतत प्रयत्न केले. पण नंतरच्या काळात उचित नेतृत्व न मिळाल्यामुळे आणि इच्छा शक्तीच्या अभावामुळे गावाचा विकास खोळंबलेला दिसून येतो, कारण की कोणते ही कार्य करीत असतांना प्रबळ इच्छा शक्ती पाहिजे. सरपंच श्री. विजयराव उगले मध्ये ती पहायला मिळाली लोकांनी मुलाखत घेतांना सांगितले की, श्री. विजयरावांनी सरपंच असतांना संपुर्ण वेळे गावाच्या विकासासाठी कामी आणला. माजी सरपंच सौ. रेखाताई उगले यांच्याशी चर्चा करतांना त्यांनी सांगितले की, तरूण नेतृत्व गावाच्या विकासासाठी तयार करावयाचे आहेत जेणे करून गाव पुढील विकासाकडे वाटचाल करेल.

वर्तमान काळात आदर्श यशवंत ग्राम झाडाचा विचार केला, तर वाटत नाही की या गावाने ११२ पुरस्कार प्राप्त केले आहे. आज हे पुन्हा अविकसित गावा सारखे दिसून येते. थोडक्यात असे म्हणता येईल की, पंचायत राज योजनेमुळे ग्रामीण नेतृत्वाचा विकास झाला. मात्र ग्रामीण पुनर्निर्माणात ती योजना अपयशी ठरली कारण ग्रामीण नेतृत्व हे ही इतर नेतृत्वाप्रमाणे संकुचित विचाराचे, स्वार्थी, स्वहितासाठी तत्पर आहे. नेते आणि कर्मचारी यांच्या ठिकाणी कार्याची तळमळ जिद्द नाही. आणि सामान्य जनता भोळी भाबडी असल्यामुळे ती कोणत्याही योजनेच्या बाबतीत अज्ञानी व उदासीन असते. ह्या अज्ञानाचा फायदा स्वार्थी नेतृत्व घेतांना दिसून येते, तसेच इच्छाशक्तीच्या अभावामुळेही विकासाकडे दुर्लक्ष होते. कारण सामुदायिक विकास योजनेचा लाभ आपल्या गावाला मिळावा ह्यासाठी नेता वर्ग कार्यतत्पर

असतो. त्यामुळे ग्रामीण जनतेची प्रगती होते. म्हणजेच नेतृत्व व विकास कार्य हे परस्पर संबंधित आहे असे म्हणता येईल.

प्रश्नावली च्या माध्यमातून झाडा या गावातील नागरिकांशी चर्चा केली असता, अशी माहिती प्राप्त झाली की, सरपंचा सौ. रेखाताई उगले च्या कार्यकाळा (२००९-१०) पर्यंत एकूण ३३ बचत गट येथे कार्यरत होते आणि या बचत गटाच्या माध्यमातून २३० बेरोजगारांना रोजगार प्राप्त झाले होते. या बचत गटाच्या माध्यमातून अनेक लहान मोठे गृहउद्योग आदर्श यशवंत ग्राम झाडा येथे उदयास आले होते. बचत गटाद्वारे जे गृहद्योग सुरू करण्यात आले. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली व लोकांचे जीवनमान उंचावले. बँकेशी बरेचदा संपर्क करावा लागल्याने बँकींग कार्याबद्दल माहिती मिळाली. स्वयंसहाय्यता समूहात सहभागी झाल्यामुळे महिलांच्या आर्थिक परिस्थितीत चांगला बदल झाला. त्यांची बचत वाढली, सावकारावर अवलंबूण राहणे संपले. सामाजिक परिवर्तन होऊन महिलांना समाजात व कुटुंबात मानाचे स्थान मिळाले. महिला सक्षमीकरण झाले, महिला मध्ये निर्णय क्षमता वाढली, चांगले नेतृत्व तयार झाले, ग्रामीण महिलांचा, पुरुषांचा आत्म विश्वास वाढला, ते आत्मनिर्भर झाले, ग्रामीण महिला व पुरुषांच्या कला गुणांना वाव मिळून त्यांना लहान व्यवसाय सुरू करता आले. या स्वयं सहाय्यता बचत गटामुळे ग्रामीण स्तरावरील सर्व क्षेत्रांमध्ये विकासात्मक कार्य घडून आले. इत्यादी विविध कार्य या स्वयंसहाय्यता बचत गटांनी केले. झाडा येथील बचत गटाला ही उत्कृष्ट कार्यासाठी पारितोषिक प्राप्त झाले होते.

परंतु झाडा या गावातील नागरिकांशी चर्चा करतांना संशोधकाला कळले की, वर्तमान काळात ३३ बचत गटांपैकी फक्त एकच गट कार्यरत आहे ते म्हणजे 'पसायदान महिला स्वयंसहाय्यता बचत गट' व हे बचत गट बिछायत केंद्र चालवित आहे. बाकी उरलेले ३२ बचत गट संपुष्टात आले. पुन्हा 'जैसेथे' ही परिस्थिती निर्माण झाली आहे. आज शासनाद्वारे विविध योजना या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी राबविण्यात येत आहे. परंतु झाडा या गावात आज एकच बचत गट शिल्लक आहे जो कि कार्यरत आहेत, गावातील लोकांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. जो पर्यंत कोणी त्यांच्याशी जबरदस्तीने कार्य करून घेतात तो पर्यंत ते कार्य करतात. एकदा नेतृत्व बदलले आणि नवीन नेतृत्वाने पाठ पुरावा केला नाही तर पुन्हा पुर्वीची

परिस्थिती निर्माण होते. म्हणजे, सतत गावातील नागरिकांच्या मागे लागून त्यांच्याशी कार्य करवून घेणारे त्यांच्यात मानसिक बदल करणारे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. हे यातून दिसून येते.

तसेच १०० टक्के यशवंत आदर्श ग्राम झाडा १९८९ ते २००९-१० पर्यंत साक्षर व हागणदारी मुक्त करण्यात आले. त्या काळात यासाठी सरपंच व ग्राम पंचायत मंडळीना अथक परिश्रम करावे लागले आणि अमरावती जिल्ह्यातील एकमेव गाव 'झाडा' हे हागणदारी मुक्त गाव झाले होते. व निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाला. राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील द्वारे पण प्रत्येकी २५ लाख असे ३ पुरस्कार या गावाला प्राप्त झाले. झाडा गावातील शाळेला २००५-०६ साली (साने गुरुजी स्वच्छ शाळा) पुरस्कार प्राप्त झाला. येथील शाळा डिजीटल झाली आहे.

वर्तमान परिस्थितीत झाडा या गावाची शाळा वर्ग १ ते ८ अत्यंत उत्कृष्ट आहे. आजहीया शाळेने पूर्वीचे आपले अस्तित्व कायम ठेवले. पण झाडा या गावात आता हळूहळू साक्षरतेचे प्रमाण कमी होतांना दिसत आहे. हे गाव हागणदारी मुक्त राहिले नाही लोकांनी बाहेर जायला सुरूवात केली. गावकरी मंडळींशी बोलतांना संशोधकाला वरील माहिती प्राप्त झाली.

आरोग्याच्या दृष्टीने पाहिलेतर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र निर्माण व्हावे त्यासाठी प्रयत्न सुरू आहे असे वर्तमान काळातील सरपंच सौ. शुभांगीताई चौधरी म्हणाल्या. कारण प्राथमिक उपचारासाठी या गावात कोणती ही व्यवस्था नाही बाहेर गावी जावे लागते, वेळेवर आरोग्य सोयी उपलब्ध व्हावी. यासाठी प्रयत्न सुरू आहे. आशा सेवीका, अंगणवाडी सेविका आणि वेळोवेळी लसीकरणासाठी डॉक्टर आठवड्यातून एकदा येतात पण प्राथमिक उपचार केंद्राची व्यवस्था नाही. या करिता सर्वांनी सामुहिक वाटचाल करणे आवश्यक आहे.

**इतर पुरक निष्कर्ष**

कोणते ही कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी त्या कार्याप्रती पूर्ण आत्मसमर्पित झाल्या शिवाय ते कार्य पूर्ण होवू शकत नाही. आदर्श यशवंत ग्राम 'झाडा'ला गावाचा सर्वांगीण दृष्टीने विकसित करण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी, सरपंच श्री विजयराव उगले व सौ. रेखाताई उगले यांच्या रूपाने उचित नेतृत्व प्राप्त झाले आणि त्यांनी गावातील सर्व लोकांच्या सहकार्याने हे काम पूर्ण केले. पण आज अगदी अल्पकाळातच जर झाडा गावाकडे पाहिले तर झाडा या गावाला आदर्श

यशवंत ग्राम पंचायत आणि इतर विविध पुरस्कार प्राप्त झाले, असे वाटत नाही कारणआज या गावातील रस्ते पूर्ण खराब झाले आहेत. सुरूवातीला बस दररोज या गावात यायची पण आज बसची व्यवस्था या गावात नाही. महाराष्ट्रमंडळाची बस येथे येत नाही. खाजगी वाहन (ऑटो) येथे चालतात. मुलाखत घेतांना संशोधकानी विचारले की, गावातील मुले ८ वी नंतर कुठे शाळेत जातात तर त्यावर गावकरी म्हणाले की बस नसल्यामुळे, मंगरूळ दस्तगीर येथे, काही मुले सायकलने जातात तर काही १० वी पर्यंत शिकून शाळा सोडतात. अधिकांश मुलींनी दहावी व बारावी नंतर शिक्षण सोडले, ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ते आपल्या मुलांना भाड्याने रूम करून मंगरूळ येथे ठेवतात, तर काही म्हणाले की आम्हाला परवडत नाही. आमच्या गावात बसची व्यवस्था व्हायला पाहिजे, आम्हाला येथूनबाहेर गावी जायला त्रास होतो. महाराष्ट्र मंडळच्या बसेसची व्यवस्था या गावात होणे अत्यंत आवश्यक आहे. आपले गाव, विकसित झाले आहे (सक्षम) असे आपण म्हणतो. मग ही परिस्थिती विकासाच्या विपरीत दिसून येते. ही बाब प्रकर्षाने या गावात जाणवते.

झाडा या गावात गप्पी माश्याचे प्रकल्प सुरू होते. ही अमरावती जिल्ह्याची एकमेव ग्राम पंचायत अशी होती की, जिथे गप्पी माश्याचे प्रकल्प होते आणि वर्तमान काळात प्रकल्प नाही.

सेवा सहकारी सोसायटी आदर्श यशवंत ग्राम झाडा येथे व्यवस्थित रूपाने कार्यरत आहे. या सोसायटीचे अध्यक्ष श्री. विजयराव उगले हे असुन त्यांचा उद्देश विकास आणि विकास हाच आहे. या गावात त्यांनी धान्य पेढी सुरू आहे.

वर्तमान सरपंच सौ. शुभांगी गजाननराव चौधरी यांच्याशी मुलाखत घेत असतांना त्यांनी सांगितले की, आता पूर्वी सारखी मानसिकता गावाच्या लोकांची राहिली नाही. त्यामुळे विकास कामाला अडथळा निर्माण होतो, आता सर्व नागरिकांची एकत्रित येण्याची तयारी नाही. पण एक महिला सरपंच असून ही त्या आपल्या परी ने जसे होईल तसे विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत आहे. झाडा या गावात सहकार्याची भावना दिसून आला, संशोधकाद्वारे अभ्यासाच्या दृष्टीने गावकरी मंडळीची मुलाखत घेत असतांना सर्वांनी अत्यंत मना पासून मदत केली. याचा अर्थ त्यांच्यात सहकार्य भावना असल्या शिवाय हे शक्य नाही. पण त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री अण्णा हजारे यांच्या पदस्पर्शाने पावन

झालेली ही भूमी पुन्हा विकासाकडे अग्रेसर होईल प्रत्येक व्यक्तीच्या मनात जेव्हा ही भावना रूजविली जाईल की, आमच्या गावाचा पुन्हा तसाच विकास व्हायला पाहिजे. जो ७-८ वर्षापूर्वी झाला होता. तर या गावाच्या विकासाला वेळ लागणार नाही पण त्यामध्ये सातत्य असणे ही आवश्यक आहे. जर भारताला महाशक्ती होण्याकडे वाटचाल करावयाची आहे तर त्यात प्रत्येक ग्रामीण भागातील सर्व नागरिकांचा सहयोग मिळणे आवश्यक आहे.

पंचायती राज आणि विकासाचा संबंध सतत जोडला जातो, विकासाचा विचार करतांना सातत्याने भौतिक विकासाचा विचार होत असतो; परंतु हा विचार एकांगी आहे. भौतिक विकास म्हणजे विकास हे पूर्ण सत्य नाही, रस्ते केले, धरणे बांधली, कारखाने उभे केले, उंच-उंच इमारती बांधल्या म्हणजे विकास झाला काय? काही प्रमाणात झाला पण पूर्ण नाही.

भौतिक विकासा सोबतच समाजाच्या मानसिक विकासावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. विकासाच्या दृष्टीने गावातील लोकांमध्ये एकोपा, एकात्मतेची  भावना, बंधू भावाचे वातावरण आणि विषमतारहित समाज उभा राहणे आवश्यक आहे. लोकांचा सहभाग गावाच्या कार्यक्रमात वाढला तर सामुहिक आरोग्य, समाजाचे शिक्षण, समाजासाठी  उपयुक्त ठरणाऱ्या सर्व योजना अमलात आणणे सहज शक्य होईल. आदर्श गाव योजनेत गावात नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी आणि श्रमदान यांना महत्व प्राप्त झाले पाहिजे. या मधून गावात चांगले वातावरण निर्माण होऊ शकेल. नसबंदी मुळे वाढत्या लोकसंख्येला आळा बसेल (ही योजना झाडा ग्राम पंचायतीत यशस्वी पणे राबविल्या गेली) नशाबंदी मुळे, आरोग्याच्या समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होतील. चराईबंदी व कुऱ्हाडबंदी मुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल, श्रमदानामुळे गावात कोणता ही प्रकल्प हाती घेतल्यास तो प्रत्यक्षात आणणे सहज शक्य होईल. आमच्या असंख्य चुका होतील, आम्हाला ठेच लागेल, पण तरी ही आम्ही त्यातुन शिकू अशी जर भावना सर्वांमध्ये निर्माण झाली तर मग ग्राम सक्षमीकरणास वेळ लागणार नाही. आदर्श ग्राम पंचायत निर्माण करण्याचा ध्यास व त्यासाठी प्रयत्नशील असणे महत्वाचे आहे. यासाठी गावातील प्रत्येक माणूस विकासाचा केंद्रबिंदू झाला पाहिजे. त्याच बरोबर गावातील लोकांनीही ग्राम पंचायतींना साथ दिली पाहिजे. ग्राम पंचायत 'आपली आहे' हे गाव 'आपले आहे' याची जाणीव गावकऱ्यांना होणे आवश्यक आहे. तसेच

स्त्रियांना ही या विकास कार्यामध्ये बरोबरीने सहभागी करून घेणे जरूरी आहे. त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळाला तर अनेक विकासाची पाऊले त्या उचलतात. मागील कालखंडात झाडा गावाने याचा अनुभव घेतलेला आहे. या सक्षमीकरणाच्या कार्यात अनेक समस्या निर्माण होतात पण त्याचा पाढा वाचत बसण्यापेक्षा त्या दुर कशा करता येतील याचा विचार सामान्य नागरिकांपासून ते तज्ञ, अभ्यासक, व नेतृत्वापर्यंत व्हायला पाहिजे.

ग्रामसक्षमीकरणासाठी जितका जास्त जनतेचा सहभाग वाढेल त्या प्रमाणात त्या गावाचा, तालुक्यांचा, पर्यायाने राज्यांचा व देशाचा विकास होण्यास मदत होईल. पंचायत राज्याच्या माध्यमातून ग्राम सक्षमीकरण होण्यास निश्चितच मदत झाली आहे आणि होईल. तेव्हाच कुठे 'गाव बळकट तर देश बळकट' ही उक्ती प्रत्यक्षात येऊ शकेल व सर्व सामान्यांचे सबलीकरण होईल.

**शिफारसी**

ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ आदर्श गाव झाडा, ता. धामणगाव रेल्वे) या विषयाची निवड लघु शोध प्रकल्पासाठी करण्यात आलेली आहे. संशोधकाने सदर विषयाचे सखोल व विस्तृत अध्ययन केल्यानंतर प्राप्त झालेल्या निष्कर्षाच्या आधारे पुढील प्रमाणे शिफारशी करणे आवश्यक वाटते.(ठरते).

१. स्थानिक नेतृत्वाला प्राधान्य देणे, तरुण नेतृत्व तयार करणे.

२. विकास कामात सातत्य असणे आवश्यक आहे.

३. लोकांची साधारण (आम) समस्या सोडविण्यासाठी ग्राम पंचायतला पर्याप्त अधिकार आणि साधन प्रदान करण्यात यावे.

४. लोकांच्या मानसिकतेत परिवर्तन करणे आवश्यक (मानसिक रूपाने सक्षम) आहे.

५. स्थानिक स्वशासनात जनतेचा सहभाग वाढेल यासाठी प्रयत्न करणे.

६. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकशाही संस्थाचे मित्र, पथ प्रदर्शक, म्हणून पुढे यावे, त्यांचे कार्य सकारात्मक प्रवृत्तीचे असावेत.

७. गावात संचार साधनांची व्यवस्था सरकारने नियमित करावी जेणे करून गावाचा, शैक्षणिक, सामाजिक इत्यादी विकास होण्यास मदत होईल व गावातील मुले-मुली त्या अभावी शिक्षण पासून वंचित राहणार नाही.

८. निर्वाचित प्रतिनिधीला शिक्षित केले पाहिजे.

९. नियम आणि कार्य असे असावे की, सामान्य माणुस सुद्धा त्याला समजु शकेल.

१०. शेतीला पुरक उद्योगधंदे, शेतीला विकसित करण्याच्या सर्वव्यापी कार्याकडे लक्ष पुरविणे.

११. लोकांची साधारण समस्या सोडविण्यासाठी पंचायतींना पर्याप्त अधिकार आणि साधन प्रदान करण्यात यावे.

१२. उमेदवार निश्चित करतांना जात, धर्म इत्यादी गोष्टींना प्रोत्साहन देऊ नये.

१३. महिलांना जागरूक करून प्रशिक्षित करावे, त्यांनी स्वतः निर्णय घ्यावे.

१४. भ्रष्टाचार पासून स्वतःला दूर ठेवावे.

१५. पंचायत समितींना व ग्राम पंचायतला विकास कामासाठी पुरेसा निधी द्यावा.

१६. निर्वाचित प्रतिनिधींनी आपसातील कटुता (वैमान्यसता) बाजुला ठेवून समाज सेवेचे व्रत घेऊन कार्य करावे.

१७. गावातील जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात यावे जेणे करून त्यांना अधिकार आणि कर्तव्यांची जाणी व होईल.

१८. ग्राम पंचायतच्या सभासदांच्या भत्यात व प्रवास भत्यामध्ये शासनाने वाढ करावी जेणे करून हे सभासद विकास कामासाठी पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि विविध ठिकाणी जाऊन विकास कामे आणु शकतील.

**प्रश्नावली**

**ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका**
**एक विश्लेषणात्मक अध्ययन**
**(विशेष संदर्भ आदर्श गांव 'झाडा' ता. धामणगांव रेल्वे)**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत मी, डॉ. विभा प्रवीण देशपांडे, लघुसंशोधन करीत आहे. माझ्या लघु संशोधनचा विषय "ग्राम संक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन" (विशेष संदर्भ आदर्श गांव 'झाडा' ता. धामणगांव रेल्वे) हा आहे.

या अध्ययना करिता 'झाडा' या गावाला आदर्श गांव पुरस्कार प्राप्त झाला, तसेच तो पुरस्कार मिळविण्यासाठी, गावाच्या विकासासाठी कोणा-कोणाचे सहकार्य लाभले. इत्यादी सर्व माहिती प्राप्त करण्याच्या हेतु ने, अभ्यासाच्या दृष्टीने मी ही प्रश्नावली तयार केली आहे. मला या प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती देण्याची कृपा करावी ही विनंती.

**संशोधक**
**डॉ. विभा प्र. देशपांडे**
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
ता. तिवसा, जि. अमरावती

## व्यक्तीगत माहिती

**प्र. १ नाव व पत्ता ..........................................**

..........................................

स्त्री ( ), पुरूष ( )

२ वय – १८,३० ( ), ३०-५०( ), ५० ते त्यापेक्षा वरील ( )

३ शिक्षा :

(अ) प्राथमिक ( ), (ब) माध्यमिक ( )

(क) उच्च माध्यमिक ( ), (ड) पदवीधर ( )

४ व्यवसाय :

(अ) व्यवसाय ( ), (ब) धंदा ( )

(क) नोकरी ( ), (ड) सामाजिक कार्यकर्ते ( )

(इ) पत्रकार ( )

५ कायम वास्तव्य : ------------------------------------------------------

------------------------------------------------------

६ मातृभाषा : ------------------------------------------------------------

प्र. २ ग्राम पंचायतची स्थापना झाली तेव्हा पासून तुमच्या गावच्या विकासाला सुरवात झाली का ?

(अ) हो ( ), (ब) नाही ( )

प्र. ३ ग्राम पंचायत मुळे तुमच्या गावाचा विकास झाला हे तुम्ही मान्य करता ?

(अ) हो ( ), (ब) नाही ( )

प्र. ४ आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त होण्याच्या आधी आपल्या गावाची परिस्थिती काय होती?

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

प्र. ५ आपल्या गावाच्या विकास व्हावा याचा ध्यास कोणी घेतला, या संबंधी पुढाकार कोणी घेतला.

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

प्र. ६ गावाच्या विकासाची खरी सुरवात झाली त्या वेळी सरपंच कोण होते? आणि त्यांनी लोकांना कसे तयार केले ?

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

प्र. ७ गावाच्या विकासासाठी सर्व नागरिकांनी सहयोग दिला का? की कोणी विरोध ही केला?

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

प्र. ८ विकासाची सर्वप्रथम सुरवात कोणत्या कामाने झाली?

प्र. ९ श्रमदाना द्वारे गावांचा कोणता विकास केला.

प्र. १० विकास कामा करिता पंचायत समिती, विधिमंडळ लोकसभा या क्षेत्रामध्ये काम करण्याऱ्या लोक प्रतिनिधींचा सहभाग मिळाला का? हो तर कश्या प्रकारे.

प्र. ११ आपल्या गावात बचत गट किती कार्यरत आहेत ? व त्या माध्यमातून किती लोकांना रोजगार प्राप्त झाला.

प्र. १२ आपल गांव १०० अक्के साक्षर झाक्षर झाल आहे का?

प्र. १३ शैक्षणिक दृष्ट्या आपल्या गावाची मोठी उपलब्धी कोणती?

प्र. १४ आरोग्याच्या दृष्टीने प्राथमिक उपचार पद्धती गावात उपलब्ध आहे का?

प्र. १५ महिला सक्षमिकरणात ग्राम पंचायतची भूमिका कोणती ?

प्र. १६ आपल गांव हागणदारी मुक्त गांव झाले का ?

प्र. १७ आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर आत्ता पुढील वाटचाल कोणती?

प्र. १८ गावाच्या विकासाच्या कालखंडामध्ये लोकप्रतिनिधी कोण-कोण होते.

प्र. १९ आदर्श ग्राम झाडाच्या विकासामध्ये आपले सहाकार्य कोणते?

(अ) वैचारिक दृष्ट्या : ---------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

(ब) आर्थिक इत्यादी मदत कार्य : ------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

प्र. २० नवीन नेतृत्व निर्माण करण्यास ग्राम पंचायत मुळे मदत झाली का?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

प्र. २१ ग्राम पंचायतच्या माध्यमातून जनतेचा सर्वागीण (सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक इत्यादी) विकास झाला का ?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

प्र. २२ लोकांना ग्रामपंचायत मुळे अधिकार आणि कर्तव्याची जाणीव झाली का ?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

प्र. २३ लोकांना ग्रामसक्षमीकरणाचे महत्व, कायदे व सरकारी योजना इत्यादी माहिती प्राप्त करुन देण्यास ग्रामपंचायत सहाय्यक ठरली का ?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

प्र. २४ ग्रामपंचायत मुळे स्थानिक लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव मिळाला का?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

दिनांक :

स्थळ : उत्तरदात्याची सही

# प्रश्नावली भरुन देणाऱ्या ग्रामस्थांची यादी

| अ. क्र. | उत्तरदात्याचे नावा | पद |
|---|---|---|
| १. | श्री. दीपक पांडुरंग शिकारे | ग्राम सचिव |
| २. | प्रफुल्ल शेषरावाजी धवस | |
| ३. | कु. मयुरी संजयराव महाजन | |
| ४. | कु. शितल विठ्ठलराव कोपरे | |
| ५. | सचिन अंबादासजी कराईत | |
| ६. | श्री. तेजेश पंडितराव राठोड | |
| ७. | श्री. विजयराव नामदेवराव उगले | माजी सरपंच |
| ८. | सौ. रेखाताई विजयराव उगले | माजी सरपंच |
| ९. | श्री. रमेश आनंदराव गावंडे | |
| १०. | श्री. सुनील विनायकराव रोंघे | मुख्याध्यापक |
| ११. | श्री. रामदास तुकारामजी चौधरी | माजी पोलीस पाटील |
| १२. | श्री. रमेश गुलाबराव कोम्बे | |
| १३. | विठ्ठल नागोरावजी कोपरे | |
| १४. | सौ. सवीता की. गोमासे | |
| १५. | श्री. श्रावण किसनाजी कांबळे | |
| १६. | श्री. दिनेश शंकरराव पाटील | |
| १७. | श्री. सुर्यकांत कृष्णाजी मिठे | |
| १८. | सौ. कल्पना ज्ञानेश्वर राऊत | |
| १९. | श्री. हंसराजजी भगवानजी जाधव | |
| २०. | कु. वैजयंतीमाला धनसिंग चव्हाण | ग्राम सचिव (मिर्चापूर तरोडा) |
| २१. | कु. शुभांगी गजाननराव चौधरी | वर्तमान सरपंच |
| २२. | सौ. छाया दादाराव गोमासे | |
| २३. | श्री. धीरज ज्ञानेश्वरराव राऊत | |
| २४. | सौ. शारदा प्रदीपराव महाजन | |
| २५. | सौ. कांता मा. कोल्हे | |
| २६. | सौ. कल्पना भा. गोमासे | |
| २७. | सौ. प्रतिभा सं. महाजन | |
| २८. | सौ. मयुरी सुभाषराव कांबळे | |
| २९. | श्री. विवेक हरिदासजी ठाकरे | |
| ३०. | चंद्रशेखर श्रीरंग भटकर | |
| ३१. | श्री. गजानन दामोधरराव चौधरी | |
| ३२. | श्री. कैलास सितारामजी जयसिंगपुरे | |

| | | |
|---|---|---|
| ३३. | श्री. विकास रामदासजी भेले | |
| ३४. | कु. अलका चावरे | |
| ३५. | सौ. तृप्ती नंदकिशोर मुन | |
| ३६. | श्री. सुभाषराव कांबळे | |
| ३७. | श्री. भास्करराव गोमासे | |
| ३८. | श्री. पुंडलिकराव खंडारे | |
| ३९. | श्री. विलासराव जंगले | |
| ४०. | श्री. प्रफुल्ल रोकडे | |
| ४१. | श्री. दिनेशराव वाघाडे | |
| ४२. | श्री. शंकरराव नागपुरे | |
| ४३. | श्री. सुभाषराव आडे | |
| ४४. | श्री. प्रवीणराव डुकरे | |
| ४५. | श्री. नरेशराव कराळे | |
| ४६. | श्री. रवि चावरे | |
| ४७. | श्री. अरुणभाऊ अडसड | माजी आमदार |
| ४८. | श्री. रामदासजी निस्ताने | माजी जि. प. सदस्य |
| ४९. | श्री. मनोज तांबेकर | |
| ५०. | श्री. गजाननराव गांजरे | |

**झाडा गावातील ग्रामस्वच्छता अभियानाचे काही छायाचित्रे :**

**झाडा या गावाला प्राप्त पारितोषिकांची यादी :**

## छायाचित्र




**'झाडा' गावाचा नकाशा**




**महामहीम राष्ट्रपती डॉ. अब्दुलजीकलाम यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारतांना आदर्श ग्राम झाडा सरपंचा सौ. रेखाताई विजयराव उगले**



माजी सरपंच श्री. विजयराव उगले यांच्याशी मुलाखत घेतांना
संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे



माजी सरपंच सौ. रेखाताई उगले यांच्याशी मुलाखत घेतांना
संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे



**मुख्याध्यापक श्री. सुनिलराव रोंघे यांच्याशी मुलाखत घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**वर्तमान सरपंच सौ. शुभांगी चौधरीयांच्याकडून प्रश्नावली स्विकारतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**सौ. वैजयंती चव्हाण (ग्रामसचिव, ग्राम मुर्तिजापूर तरोडा) यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**श्री. दिपक शिकारे (ग्रामसचिव, ग्राम झाडा)यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**




**गावकरी महिलांकडून प्रश्नावली स्विकारतांना**
**संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**श्री. रमेशराव गावंडे आणि श्री. कैलास जयसिंगपुरे यांच्याकडून**
**प्रश्नावली भरुन घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**मा. श्री. अरुणभाऊ अडसड (माजी आमदार) यांच्याशी मुलाखत घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**



**श्री. रामदासजी निस्ताने (माजी जि. प. सदस्य) यांची मुलाखत घेतांना संशोधक प्रा. डॉ. विभा देशपांडे**

# संदर्भ ग्रंथ सूची



| अ. क्र. | लेखक | ग्रंथ | प्रकाशन |
|---|---|---|---|
| 1. | Dr. Ahuja B. N. | Panchayat Raj | Pointer Publication, Jaipur |
| 2. | Dr. Ahuja B. N. | Community Development | Pointer Publication, Jaipur |
| 3. | Burns James | Social Science Leadership | Deep Publication |
| 4. | Brown C. & Russell R. V. | Central Proince District Yavatmal District, Valume-A | संचालक, मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन |
| 5. | Chester C. Maxey | Political Philosophies World | Pointer Publication, Jaipur |
| 6. | Gupata U. N. | World Constitutions | Atlantic, New Delhi |
| 7. | Gupta S. | Research Methodology | Deep Publication Rajouri Garden. F-१५९, New Delhi. |
| 8. | Kulkarni N. | Woman & Leadership | Pointer Publication, Jaipur |
| 9. | Lucian W. Pye | Political Culture & Political Deveopment | Ambica Publication New Delhi. |
| 10. | Mamata T. | Child Rights | Discovery Publication House New Delhi. |
| 11. | Dr. Richa Rathore | Public Policy And Administration In India | Makemilin Pub. Delhi,२०१७ |
| 12. | Sankar Subrata | Human Rights | Atlantic, New Delhi. |
| 13. | Thakar D. | Research methodology | Deep Publication Rajouri Garden. F-१५९, New Delhi. |
| 14. | डॉ. अवस्थी ए. बी. | विकास प्रशासन | अग्रवाल प्रकाशन, आग्रा |
| 15. | सत्यंद्र अग्रवाल | विश्व व्यापार एवं ग्रामीण सशक्तीकरण | इशिका पब्लीकेशन, जयपूर, २०१२ |
| 16. | सत्यंद्र अग्रवाल | भ्रष्टाचार और सुशासन | राधा पब्लीकेशन, नई दिल्ली, २०१३ |
| 17. | संतोषकुमार अग्रवाल | भारतमे भ्रष्टाचार और उससे मुकाबला | राधा पब्लीकेशन, नई दिल्ली, २००७ |
| 18. | डॉ. बोधनकर सुधीर | संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे | विद्या प्रकाशन नागपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| 19. | प्रा. भटकर,<br>प्रा. निंबाळकर,<br>प्रा. डॉ. प्रिया बोचे | ग्रामीण विकासाचा मार्ग पंचायत राज | प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव |
| 20. | डॉ. भांडारकर पु. ल. | सामाजिक संशोधन पद्धती | महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ विद्या बुक्स औरंगाबाद १९९९ आवृत्ती - ४ |
| 21. | डॉ. भोगले शांताराम | भारतातील स्थानिक शासन | विद्या प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती, जून १९९० |
| 22. | चौहान घनश्याम | भारतीय सामाजिक प्रशासन | विश्वभारती पब्लीकेशन नई, दिल्ली |
| 23. | चितामन अंकुश | शासकीय योजना | युनिक ॲकेडमी |
| 24. | देव सौ. स. ला. | भारतातील शासन व प्रशासन | विद्या प्रकाशन, नागपूर |
| 25. | डॉ. श. गो. देवगांवकर | पंचायत राज्य आणि सामुहिक विकास | श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर |
| 26. | विजेंद्र सिंह द्विवेदी | भारत की आंतरीक सुरक्षा समस्याएँ | अध्ययन पब्लीकेशन्स् दिल्ली,२०१२ |
| 27. | डॉ. गौतमवीर | लोकप्रशान के मुलआधार | विश्वभारती पब्लीकेशन नई, दिल्ली. |
| 28. | गिरवर सिंह | भारत में पंचायत राज | पंचशिल प्रकाशन, फिल्म कालोनी, चौड रस्ता जयपूर |
| 29. | ओमप्रकाश गाबा | राजनिती विज्ञान विश्वकोश | नॅशनल पब्लीकेशन्स्, दिल्ली, १९९८ |
| 30. | ओमप्रकाश गाबा | विवेचनात्मक राजनिती विज्ञान कोश | मयुर पेपर बॅक नोएडा, २००७ |
| 31. | डॉ. गवई<br>प्रा. प्रशांत विघे<br>प्रा. सुनिल चकवे | महाराष्ट्रातील पंचायतराजची वाटचाल | वेद मुद्रा टोपे नगर, अमरावती |
| 32. | प्रा. जोशी प. ल. | भारतीय शासन व राजकार | विद्य प्रकाशन, नागपूर |
| 33. | राम जगताप | नोटबंदी | डयमंड पब्लीकेशन, पुणे, २०१७ |
| 34. | व्ही. एल. जरारे | जापानकी राजनिती एवं शासन | ए. बी. डी. पब्लीकेशन्स, जयपूर, १९९६ |
| 35. | कर्णावत शशि | पंचायती राजव्यवस्था मे रोजगार | अर्जून पब्लीकेशन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हाऊस नई, दिल्ली |
| 36. | डॉ. कटारीया सुरेंद्र | पंचायती राज संस्थाए | नॅशनल पब्लीकेशन, जयपूर |
| 37. | डॉ. कटारीया सुरेंद्र | लोकप्रशान सिद्धांत व व्यवहार | नॅशनल पब्लीकेशन, जयपूर |
| 38. | डॉ. कवँर राम | भारतीय ग्रामीण व स्थानिक प्रशासन | पंचशील प्रकाशन, जयपूर |
| 39. | प्रा. कवी सौ. माधवी | महिला कल्याण आणि विकास | विद्य प्रकाशन, नागपूर |
| 40. | प्रा. कुलकर्णी बी. वाय. | भारतातील स्थानिक प्रशासन | विद्य प्रकाशन, नागपूर |
| 41. | डॉ. काणे प. सी. | राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचार | पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर |
| 42. | डॉ. काणे प. सी. | राजकीय सिद्धांत | पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर |
| 43. | गंगाधर कराळे | ग्रामीण विकासाचा एकात्मीक दृष्टिकोन | डायमंड पब्लीकेशन्स् , पुणे, २०१७ |
| 44. | खेकरे एन. आर. | राजकीय नेतृत्व | अंशुल प्रकाशन |
| 45. | डॉ. लोटे रा. ज. | ग्रामीण व नागरी समाजशास्त्र | पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर |
| 46. | मल. पी. | पंचायत राज एवं दलित नेतृत्व | पॉईन्ट प्रकाशन, जयपूर (राजस्थान) |
| 47. | महेद्र मल्होत्रा | मिडीया सामाजिक, राजनितीक एवं आर्थिक सरोकार | रावत प्रकाशन, दिल्ली,२०१२ |
| 48. | नरुला बी. सी. | पंचायती राज | अर्जून पब्लीकेशन दरियागंज |
| 49. | डॉ. पिंगळे भीमराव | आदिवासी एवं उपेक्षितजन | विकास प्रकाशन, कानपूर |
| 50. | पटनी चंद्रा | ग्रामीण स्थानिक प्रशासन | रिसर्च पब्लीशन, जयपूर |
| 51. | डॉ. पाटील वा. भा. | संशोधन पद्धती | पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर |
| 52. | डॉ. पाटील वा. भा. | पंचायती राज | विद्या प्रकाशन, नागपूर |
| 53. | डॉ. पाटील व्ही. बी. | महाराष्ट्रातील पंचायतराज | के. सागर पुणे |
| 54. | डॉ. सतिशचंद्र पाण्डेए | भारतीय सुरक्षा चुनौतिया एवं प्रतिक्रीयाएँ | अध्ययन पब्लीकेशन्स्, दिल्ली., २०१२ |
| 55. | प्रा. राजपूत एन. आर.<br>प्रा. साबळे आर. डी. | सामाजिक मानवशास्त्र<br>ब्रिटन, अमेरिका, स्वीस | अशुल प्रकाशन<br>अभय प्रकाशन नांदेड |
| 56. | पी. वी. राजीव | वैश्वीकरण के युग में भारत | राधा पब्लीकेशन्स, नई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दिल्ली, २०१० |
| 57. | डॉ. शर्मा हरिश्चंद्र | भारत का राजनीतीक एवं संवैधानिक इतिहास | विश्वभारती पब्लीकेशन नई, दिल्ली |
| 58. | शर्मा प्रेमनारायण | महिला सशक्तीकरण एवं समग्र विकास | भारत बुक सेन्टर, लखनौ. |
| 59. | डॉ. सिंह निशांत | पंचायती राज व्यवस्था | राधा पब्लीकेशन्स्, नई, दिल्ली |
| 60. | डॉ. साबळे आर. डी. | भारतीय शासन व राजकारण | अभय प्रकाशन नांदेड |
| 61. | प्रा. शिंदे ज. रा. | राजकीय सिद्धांत | नभ प्रकाशन, अमरावती |
| 62. | आनंदकुमार शर्मा | माधवराव सिंधीया व्यक्तीत्व एवम कृतित्व | राधा पब्लीकेशन्स्, नई दिल्ली, २०१० |
| 63. | डॉ. रश्मी शुक्ला | प्रजातांत्रीक विकेन्द्रीकरण में जनसहभाग | एक्सीस पब्लीकेशन्स्, दिल्ली, २००९ |
| 64. | स्वप्नील सारस्वत | समाज राजनिती और महिलाएँ | राधा पब्लीकेशन, नई दिल्ली, २००७ |
| 65. | डॉ. संत दु. का. | संशोधन पद्धती प्रक्रिया | अंतरंग पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे, १९९६ |
| 66. | डॉ. तेलगोटे धर्मेद्र व प्रा. गवई सुभाष | राजकीय सिद्धांत | नभ प्रकाशन, अमरावती |
| 67. | अभिशेक त्रिपाठी | अमेरिकाका स्थानिय शासन | इशिका पब्लीकेशन्स् जयपूर, २०१० |
| 68. | डॉ. ममता मणि त्रिपाठी | भारत की, लोकतांत्रीक यात्रा एवं चुनाव | राधा पब्लीकेशन्स्, नई दिल्ली, २०१२ |
| 69. | प्रा. वराडकर र. घ. | शासन यंत्रना | विद्या प्रकाशन, नागपूर |
| 70. | विरेंद्रसिंह यादव | बदलते परिदृश्यमे नई सहस्त्राब्धी का भात | राधा पब्लीकेशन्स, नई दिल्ली, २०१० |
| 71. | आदर्श यशवंत ग्रामपंचायत झाडा | स्मरणिका | |

**वृत्तपत्रे**

| | | |
|---|---|---|
| **संपादक** | **दै. देशोन्नती** | **अकोला** |
| **संपादक** | **दै. लोकमत** | **नागपूर** |